१८८७०

# क्रांतदर्शी सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विविध
गुणांचें दर्शन घडविणारे दहा निबंध

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध,
सं. क्र. १८२५

संग्राहक
रघुनाथ वर्तक

REFBK-0017745

काळ प्रकाशन, पुणें

१८२५

निबंध

८५२८५
९८।३।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८५२८५ वि: निबंध
क्रमांक १८२५ नों दि: ९८।३।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# क्रांतदर्शी सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या
विविध गुणांचें दर्शन
घडविणारे दहा निबंध

संग्राहक

श्रीधर रघुनाथ वर्तक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८४५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0017745
REFBK-0017745

काळ प्रकाशन, पुणें ३०

प्रकाशन
२८ मे १९७०

मूल्य ३ रुपये

मुद्रक व प्रकाशक
मु. शं. दाते, यशवंत मुद्रणालय
१८३५ सदाशिव पेठ, पुणें-३०

# उपोद्घात

सन १९६८ सालच्या मे महिन्याच्या अखेरीस दादर येथे सावरकर भक्तांचा मेळावा ब्राह्मणसभेच्या सभागृहात भरला होता, त्यात सावरकरांच्या तत्त्वज्ञानाविषयी दिवसभर बरीच चर्चा झाली. रात्रीच्या वेळी करमणुकीच्या कार्यक्रमाची योजना केली होती. त्यात माहिम येथील महिलांच्या साधना वक्तृत्व मंडळाचा कार्यक्रम ठेविला होता. दादर येथील हिंदुसभेचे कार्यकर्ते श्री. केशव विनायक घारपुरे एम्. एड. यांनी त्या मंडळाच्या सभासदांना सावरकरांच्या गुणदर्शनाबद्दल त्यांच्या निरनिराळ्या गुणांसंबंधी टिपणें करून दिलीं होतीं. त्यावरून त्या मंडळातील महिला वक्त्यांनी दहा व्याख्यानांचा संच तयार केला होता. त्यात सावरकरांच्या निरनिराळ्या दहा वैशिष्टयांबद्दल एकेका व्याख्यानातून पुरस्कार केला होता. तो कार्यक्रम जमलेल्या समाजास फारच आवडला. त्या विषयांना धरून सर्व उपलब्ध सावरकर वाङमयाच्या आधारे दहा निबंध तयार करावेत अशी कल्पना संग्राहकाच्या मनात त्या वेळी आली व त्याच अनुरोधाने श्री. घारपुरे यांच्याकडे त्यांनी करून दिलेलीं टिपणें मागितलीं असता त्यांनी त्या टिपणांच्या नकला करून दिल्या व त्या आधारावर सावरकरांसंबंधी उपलब्ध असलेल्या सर्व वाङमयातून जरूर तो पोषक भाग घेऊन काही निबंध तयार केले व काही निबंधांसंबंधी त्यांच्याकडून माहिती घेऊन ती या संग्रहात घातली. त्या कामी श्री. के. वि. घारपुरे आणि प्रा. बाळकृष्ण वामन दातार यांनी फार मोलाच्या सूचना केल्या. या संग्रहातील नाटककार सावरकर हा

निबंध दातार यांनीच लिहून दिलेला आहे. या सर्व संग्रहास जरूर ती प्रस्तावना लिहिण्यासंबंधी प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांना विनंती केली असता त्यांनी मोठ्या प्रेमाने आणि आपुलकीने प्रस्तावना लिहिली. त्यात सावरकरांच्या योग्यतेसंबंधी व भारतीय स्वातंत्र्याकरिता त्यांनी केलेल्या श्रमांचें व स्वार्थत्यागाचें व त्यांच्या सर्व अलौकिक गुणांचें त्यांनी कसें चीज केलें तें पटवर्धनांनी आपल्या प्रस्तावनेत विशद करून दाखविलें आहे. या कामी माझे मित्र श्री. कृ. ब. महाबळ यांनीही अतिशय साहाय्य केलें. सावरकर दिवंगत झाल्यानंतर त्यांच्या हयातीतील कार्य व त्यांच्या गुणांचा प्रभाव याचें हल्लीच्या पिढीस जास्तच कौतुक वाटत आहे. त्या दृष्टीने हल्लीच्या तरुणांना या निबंधांचा जास्त उपयोग होऊन त्यांना खरें राष्ट्रकार्य करण्यास व देशाकरिता झीज सोसण्यास स्फूर्ति मिळेल अशी अपेक्षा आहे.

नाशिक
दि. २८-५-१९७० **श्री. र. वर्तक**

# स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १८८३ | स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर उपाख्य तात्याराव सावरकर यांचा जन्म दि. २८ मे १८८३ भगूर (जि. नाशिक) येथे. प्राथमिक शिक्षणही भगूरलाच झालें. |
| १८९२ | मातुश्रींचें निधन |
| १८९६ | शिक्षणासाठी नाशिकला प्रयाण |
| १८९७ | सावरकरांचे स्फूर्तिदाते हु. दामोदरपंत चापेकर यांनी रँडचा वध केला. दि. २२ जून १८९७ |
| १८९८ | दामोदरपंत चापेकरांना फाशी दि. १८ एप्रिल १८९८. सावरकरांनी ही वार्ता ऐकून घरच्या देवीपुढे स्वातंत्र्यसंग्रामाची शपथ घेतली. |
| १८९९ | वडील दामोदरपंतांचें निधन. |
| १९०० | नाशिक येथे मित्रमेळयाची स्थापना दि. १ जानेवारी १९०० |
| १९०१ | तात्याराव सावरकरांचा विवाह |
| १९०२ | मॅट्रिक परीक्षा पास व फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश |
| १९०४ | अभिनव भारत या गुप्त संघटनेची स्थापना |
| १९०६ | बी. ए. परीक्षा पास. विलायतेस प्रयाण जून १९०६ |
| १९०७ | भारतीय स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ मराठीत लिहिला. |
| १९०९ | भारतीय स्वातंत्र्यसमर या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध. |
| १९०९ | विलायतेत १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा ५१ वा स्मृतिदिन दि १० मे १९०९ |
| १९०९ | तात्यांचे थोरले बंधु बाबाराव सावरकरांना काळेपाण्याची शिक्षा. दि. ९ जून १९०९ |
| १९०९ | मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायलीचा वध केला दि. १ जुलै |
| १९०९ | मदनलालला फाशी १७ ऑगस्ट १९०९. सावरकरांनी त्याचें निवेदन प्रसिद्ध करविलें. |
| १९०९ | नाशिक येथे जॅकसनचा वध दि. २१ डिसेंबर १९०९ |

१९१० बॅ. सावरकर यांना विलायतेत अटक व भारताकडे रवानगी. मार्सेल्स येथे बोट थांबली असता बोटीच्या पोर्टहोलमधून समुद्रात उडी. (दि. ८ जुलै १९१०) फ्रान्सच्या किनाऱ्यावर अटक. पुन्हा भारताकडे रवानगी.

१९१० नाशिक कटाच्या खटल्यात गुंतवलें. जन्मठेपेची शिक्षा दि. २४ ऑक्टोबर १९१०. याच खटल्यातील दुसऱ्या आरोपाखाली दुसरी जन्मठेप शिक्षा दि. ३० जानेवारी १९११. दोन्ही जन्मठेपीच्या शिक्षा एकामागून एक भोगावयाच्या!

१९११ अंदमानला रवानगी. तेथे तुरुंगात शुद्धीकरणाची चळवळ केली. क्रांतिकारकांनी तुरुंगात दिलेल्या लढ्याचें नेतृत्व केलें.

१९२० अंदमानातून परत भारतात. कलकत्ता-मुंबईमार्गे रत्नागिरी तुरुंगात रवानगी.

१९२३ येरवड्याच्या तुरुंगात रवानगी.

१९२४ तुरुंगातून सुटका. रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्धता.

१९२४ नाशिक येथे सावरकरांचा सत्कार. बारा हजारांची थैली समर्पण.

१९२४ रत्नागिरी जिल्ह्यात स्थानबद्धता १९२४ ते १९३७ पर्यंत.

१९३७ बंदी उठली. सार्वजनिक जीवनात प्रवेश. हिंदुसंघटनेचें कार्य करण्यासाठी हिंदुमहासभेत दाखल.

१९३७–४२ हिंदुमहासभेचे अध्यक्ष अहमदाबाद–१९३७; नागपूर–१९३८; कलकत्ता–१९३९; मदुरा–१९४०; भागलपूर–१९४१; कानपूर–१९४२

१९४२ क्रिप्स मिशनला भेट.

१९४३ तात्याराव सावरकरांचा षष्ट्यब्दिपूर्ति समारंभ. दोन लक्षांची थैली समर्पण.

१९४८ गांधीखून खटल्यात अटक व निर्दोष म्हणून सुटका.

१९५२ अभिनव भारत सांगता समारंभ पुण्यात झाला.

१९६० सावरकर मृत्युंजय समारंभ व निधि समर्पण.

१९६६ महानिर्याण दि. २६ फेब्रुवारी १९६६.

---

क्रांतदर्शी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

यांचे

पुण्यस्मृतीस समर्पण

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| प्रस्तावना | ९ ते २४ |
| १ हिंदुराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते सावरकर | १ |
| २ महाकवि सावरकर | १० |
| ३ मृत्युंजय सावरकर | २४ |
| ४ क्रांतिकारक सावरकर | ३१ |
| ५ साहित्यिक व भाषाशुद्धिप्रचारक सावरकर | ४७ |
| ६ राजकारणी सावरकर | ५८ |
| ७ समाजसुधारक सावरकर | ६५ |
| ८ इतिहासकार सावरकर | ७६ |
| ९ वक्ते सावरकर | ८३ |
| १० नाटककार सावरकर | ९६ |

# प्रस्तावना

**" नाही चिराग, नाही पणती "**

## लेखक : वि. मा. दी. पटवर्धन

बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर तथा तात्याराव सावरकर हा एक अवतारी द्रष्टा पुरुष ह्या भारतभूमीत चालू शतकात होऊन गेला. त्याची असावी तशी जाणीव हल्लीच्या तरुण पिढीला नाही. मागच्या पिढीतदेखील काही थोड्या लोकांनाच ती होती. एक वाट चुकलेला धर्मवेडा देशभक्त अशी त्या थोर पुरुषाची संभावना देशातील समकालीन राज्यकर्त्यांनी केली, इतकेंच नव्हे तर या पुरुषसिंहाला त्याच्या ऐन संध्याकालात गांधीहत्येच्या अभियोगात अडकवून त्याचें तेजोवलय विझवून टाकण्याचाही प्रयत्न केला; त्यामुळे या महापुरुषाच्या जीवितकार्याचें अपक्ष मूल्यमापन त्या कार्याच्या जाणकारांकडूनही नीटसें झालेलें नाही. भारताचें स्वातंत्र्य हाच ज्याचा निदिध्यास, परवशतेच्या पाशातून पूर्णतया मुक्त झालेला भारत हाच ज्याच्या जिंदगीचा ध्रुवतारा, तो साध्य होईपर्यंत सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मारता मारता मरेतो झुंजेन हीच ज्याची प्रतिज्ञा, हिंदु संघटन आणि लोकसेवा हीच ज्याचीं स्पंदनें, आणि स्वतंत्रतेचा उद्योग करताना 'तुजसाठी मरण तें जनन' 'तुजवीण जनन तें मरण' हेच ज्याचे श्वास-निःश्वास त्याच्या चरित्रात भारतीय तरुणांची राष्ट्रभावना उद्दीपित करण्याचें आणि देशाकरिता सर्वस्व समर्पण हा त्याचा रक्तपिंड बनविण्याचें एवढें सामर्थ्य आहे याची बरोबर कल्पना आजच्या

लोकाग्रणींना असती तर जेथून सर्व भारतीयांना देशगौरवाचें आणि देशरक्षणाचें स्फुरण सतत मिळत राहील असें सावरकरांचें भव्य स्मारक या देशात आतापावेतो उभारलें गेलें असतें. पण कै. गडकरी यांनी आपल्या एका नाटकात म्हटल्याप्रमाणे "सावरकरांचीं चौऱ्यांशी लक्ष जन्मींचीं संचितें या जन्मी उभीं राहिलीं आणि आकसाने ओथंबलेली उपेक्षा विधात्याने त्यांच्या कपाळी लिहून ठेविली." एरव्ही ज्या स्वातंत्र्यवीराची इहलोकची यात्रा म्हणजे अथपासूनची इतिपर्यंत झुंजच होती, त्याच्या स्वर्गलोकीच्या महायात्रेला साधा सैनिकी शकटसुद्धा शासनाकडून मिळू नये या दैवदुर्विलासाची संगति कशी लावावयाची ?

स्मारक केव्हा उभें राहील तें राहो; पण सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन आजच्या पिढीला जमेल त्या अन्य प्रकारांनी घडविणें ही देखील चालू काळाची गरज आहे. त्यांच्या उपलब्ध चरित्रात, त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे जें अनेक देदीप्यमान पैलू आढळतात, त्यांपैकी काही निबंधांच्या रूपाने संकलित करून माझे मित्र श्री. र. तथा अण्णासाहेब वर्तक यांनी 'क्रांतदर्शी सावरकर' या पुस्तकात प्रकाशित केले आहेत. सावरकरांचे सच्चे अनुयायी, 'अभिनव भारताचे अभिमानी' हिंदुसमाजाचे एक निःस्पृह नि बाणेदार पुढारी या नात्यांनी श्री. वर्तक नाशिककरांना अनेक वर्षं सुपरिचित आहेत. त्यांची देशभक्ति आणि समाजहिताची तळमळ यांविषयी कोणाचेंही दुमत नाही. आयुष्याचा प्रत्येक क्षण लोकसेवा आणि जनजागृति यासाठी वेचावा अशी जिद्द नसती तर पंचाहत्तरीला पोहोचल्यानंतर अशा प्रकारचें पुस्तक प्रकाशित करण्याचा व्याप-संताप वर्तकांनी अंगावर घेतला नसता. साहित्य निर्मितीचा फारसा अनुभव नसताही त्यांनी तो घेतला आणि

“सावरकरांचें हें क्रांतदर्शी जीवनदर्शन” पुढील पिढीच्या हाती दिलें. त्यांना याकरिता धन्यवाद द्यावेत तितके थोडेच !

उच्चस्तरावरून इतकी उपेक्षा होऊनही हा देश सावरकरांना विसरलेला नाही. महाराष्ट्र तर नाहीच ! नवल वाटतें तें ह्या गोष्टीचें अथवा नवल तरी कसलें ? मराठी माणूस हा जात्याच शौर्याचा, पराक्रमाचा आणि प्रज्ञेचा पूजक आहे. अहिंसा आणि सत्याग्रह यासंबंधीचे विचार आपल्या राजकीय पटावर पन्नास वर्षें फर्जी होऊन मिरवीत असले तरी त्यांचें आकर्षण मराठी मनाला कमीच. उलट शौर्य, पराक्रम आणि प्रज्ञा यांचा त्रिवेणी संगम जगात कोठेही दिसला तरी मराठी मन त्याचा जयजयकार करतें. शत्रूच्या हातावर तुरी देण्याकरिता शरीर शृंखलाबद्ध असतानाही बोटीच्या पोर्टहोलची काच तडकावून तात्यारावांनी तुफानी दर्यात ताडकन उडी घेतली आणि वरतून होणारा गोळ्यांचा मारा चुकवीत फ्रान्सचा किनारा गाठला ! एवढा एकच पराक्रम जरी सावरकरांच्या जमेस असता तरी मराठी माणसांनी त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतलें असतें. गोवा मुक्तिसंग्रामातील आघाडीचे रणधुरंधर रानडे परवा लिस्बन येथील पोर्तुगीजांच्या तेरा वर्षांच्या खडतर कारावासातून मुक्त होऊन मायदेशी परत आले तेव्हा नाही का मुंबईचा यच्चयावत् मराठी माणूस आपल्या मोहनच्या दर्शनाला धावला आणि “शूरा मी वंदिलें” या भावनेने त्याला अभिवादन करून धन्यता पावला !

आणि वीर मोहन रानड्यांनी मुंबईत पाय ठेवताक्षणी प्रथम काय केलें ? तर सावरकर सदनात जाऊन तात्यारावांच्या प्रतिमेस पुष्पहार घातला. सावरकरांच्या सहवासात सदा सचेतन राहि-

लेल्या त्यांच्या अचेतन अवशेषांना वीरोचित मानवंदना करताना रानडयांना भडभडून आलें. एका देशभक्ताने दुसऱ्या दिवंगत देशभक्ताला अर्पिलेली ती अश्रूंची श्रद्धांजलि ज्यांनी प्रत्यक्ष पाहिली ते त्रिवार धन्य होत !

वर्तकांनी संपादित केलेल्या या निबंधांवरून वाचकांच्या एक गोष्ट सहज लक्षात येईल. ती अशी की, आपल्या व्यक्तिमत्त्वातल्या प्रत्येक गुणाची जोपासना सावरकरांनी एकच ध्येय डोळयापुढे ठेवून केली होती. मातृभूमीचें स्वातंत्र्य हें तें ध्येय. तें प्राप्त करून घेण्याकरिता लोकांना संघटित करावें, खवळून सोडावें, चढाईच्या मार्गाने पुढे न्यावें आणि त्यांची ताकद वाढवावी या हेतूने त्यांनी आपल्या विचारांना आकार दिला. त्यांचा उच्चार केला आणि आचार घडवून आणला. त्यांच्या अलौकिक प्रतिभेचें, बुद्धिमत्तेचें, कल्पनाशक्तीचें आणि देशभक्तीचें सारें सामर्थ्य त्यांनी या एका ध्येयावर केंद्रित केलें होतें. त्यामुळे तें सगळें भलतेंच दीपक नि दाहक झालेलें आहे. बहिर्गोल भिंगात सूर्याचे किरण एकत्रित करून एका बिंदूवर केंद्रित केले की, त्यांचा चटका सुरुंगाची बत्ती पेटवितो आणि प्रचंड स्फोट घडवून आणतो, तसेंच हें आहे. सावरकरांच्याच शब्दांत थोडा फरक करून म्हणता येईल की, जें जें उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर तें तें देशस्वातंत्र्यास्तव त्यांनी समर्पिलें होतें ! देवदारू फुलतो तो त्याचीं फुलें देवपदी पडावीत म्हणून. तशीं सावरकरांची नवनवोन्मेषशाली प्रतिभा, कथा, काव्य, कादंबरी, नाटक इत्यादि ललित साहित्यात सतत फुलत राहिली ती मातृभूमीच्या विमोचनाकरिता आणि त्या विमोचनाच्या आड जें जें येईल तें तें भस्मसात् करून टाकण्या-

करिता त्याच प्रतिभेतून स्फुलिंगांचा अग्निवर्षावही होत राहिला. म्हणूनच मुंबईस सावरकरांचा नश्वर देह दहनभूमीकडे जात असताना आम्हांला आमच्या कविमित्राच्या पुढील काव्यपंक्ति एकदम आठवल्या.

नका उधळु हो फुलें तयांवर
जन्मभरी जें फुलतचि होतें,
नका तयांना जाळू चितेवर
जन्मभरी तें जळतचि होतें

सावरकरांचा हिंदु राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माननीय श्रीगुरुजी यांना अभिप्रत असलेला हिंदु राष्ट्रवाद यांत थोडा फरक आहे. गुरुजी सांगतात भारत हें हिंदु राष्ट्र आहे. येथे राहणारे अन्यधर्मीय लोक (पारशी सोडून) मूळचे हिंदुच. त्यांनी परत हिंदु धर्मात यावें. पारशी हे अग्निपूजक असल्याने जवळ जवळ हिंदुच. हिंदुधर्म हाच खरा सेक्युलर आहे. त्याचा स्वीकार या लोकांनी केल्यानंतरही त्यांच्या श्रद्धेप्रमाणे उपासना मार्गाचें त्यांना स्वातंत्र्य राहील. हिंदुधर्म हा सहिष्णु आणि उदार असल्यामुळे भिन्न भिन्न उपासना मार्गांनी देवाची आराधना करणारांना आपल्यात सामावून घेतो. भारताच्या परंपरागत सांस्कृतिक जीवन-प्रवाहात हे सर्व लोक समरस झाल्यामुळे शेवटी हें हिंदुराष्ट्र एक-संध आणि अतिसामर्थ्यशाली बनेल.

सावरकरांच्या म्हणण्याप्रमाणे हिंदु हा धर्मवाचक शब्द नसून राष्ट्रवाचक आहे. या देशातील रहिवाशांना प्राचीन कालात हिंदी अशी संज्ञा प्राप्त झाली. आणि देशाचें नांवही हिंद असें पडलें. तेव्हा या देशाला आपली पितृभू आणि पुण्यभू मानणारे सर्व लोक हिंदुच

या अर्थाने हें राष्ट्र हिंदुराष्ट्र म्हणून घोषित करावें. राष्ट्रधर्म म्हणून हिंदुत्वाला मान्यता द्यावी. ज्यांच्या निष्ठा पितृभूमि आणि पुण्यभूमि या नात्याने बाहेरच्या देशांशी निगडित असतील त्यांना हिंदचें पहिल्या नंबरचें नागरिकत्व देऊ नये, मात्र या देशाच्या स्वातंत्र्यात जोवर त्यांचा आचार विचार बाधक नसेल तोवर ते येथे सुखानें राहू शकतील. आपापले जीवनक्रम आणि व्यवसाय चालवू शकतील. आणखी पुढे जाऊन सावरकर सांगत की, जगातील इतर हिंदुराष्ट्रांशी भारताने आपले स्नेहसंबंध योग्य त्या करारांनी अतूट करावेत. भारताबाहेर कोठेही ज्यांची पितृभू अन् पुण्यभू नाही असेच लोक या राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता प्राणपणाने लढतील.

आज Nationalism या शब्दाने जो राष्ट्रवाद आणि Democracy या शब्दांनी जी लोकशाही भारतांत अभिप्रेत आहेत त्याच्याशी सावरकरांचे विचार फारसे जुळणारे नाहीत. Secular democracy च्या कल्पनेत तर ते बसतील की नाही याची शंका वाटते. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या बावीस वर्षांत ज्या राजकीय घडामोडी या देशात झाल्या नि होत आहेत, आणि भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची जी एक प्रकारची सतत कुतरओढ होत आहे त्यांच्या संदर्भात सावरकरांच्या तत्त्वप्रणालीचा विचार करणें अगत्याचें ठरेल.

सामाजिक सुधारणांचे बाबतीत देखील सावरकरांचा एक स्वतंत्र विज्ञानवादी दृष्टिकोन होता. जगात विज्ञानाची वाटचाल किती झपाट्याची आहे याकडे त्यांचें लक्ष असे. सुगम विज्ञानाची अत्यंत आधुनिक पुस्तकें ते नेहमी वाचीत असत. आम्ही भेटलो म्हणजे अलीकडे ते हमखास विचारीत "काय रे, एवढा सायन्सचा प्राध्यापक म्हणवितोस तर चंद्रलोकावर आपला झेंडा नेऊन केव्हा लावणार

आहेस ?" आपल्या धार्मिक रूढि आणि सामाजिक चालीरीती, विज्ञानाचा प्रकाशझोत टाकून तपासल्या पाहिजेत. त्यांतल्या ज्या भोळसट, भ्रममूलक, बुद्धीला न पटणाऱ्या आणि केवळ अंधश्रद्धेवर आधारित असतील त्या कठोरपणे टाकून दिल्या पाहिजेत. त्याशिवाय या अफाट हिंदुसमाजात मानवानेच निर्माण केलेल्या भेदांच्या भिंती भुईसपाट होणार नाहीत. हिंदुसमाज संघटित आणि सामर्थ्यवान् करण्यासाठी हें केलें पाहिजे. कारण या राष्ट्राचें स्वातंत्र्य अबाधित राखण्याकरिता असा संघटित बलशाली हिंदुसमाज एकवटलाच पाहिजे.

अस्पृश्यता निवारणाची मोहीम त्यांनी स्थानबद्ध स्थितीतही जोमाने चालविली होती ती याच दृष्टिकोनातून. " तुम्ही आम्हि सकल हिंदू बंधु बंधु" हे त्यांच्या चळवळीचें घोषवाक्य होतें. राष्ट्ररक्षणाकरिता आवश्यक असेल तर धर्मपरिवर्तन केलें पाहिजे. कारण अखेर राष्ट्र समर्थ असेल तरच त्याचा धर्म जिवंत राहील असें ते म्हणत. असें धर्मपरिवर्तन होऊन उभ्या भारतातील अस्पृश्यता नष्ट होणें हें किती दुरापास्त आहे ही गोष्ट जेव्हा त्यांना डॉ. आंबेडकरांनी पुराव्यासह पटवून दिली तेव्हा ते खिन्नपणानें म्हणाले," ठीक आहे आम्ही हरलो, पण तुम्हांला तुमच्या अनुयायांचें धर्मांतर करायचेंच असेल तर बुद्ध व्हा. त्यामुळे निदान भारतीय संस्कृतीपासून हा समाज दूर जाणार नाही आणि देशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण तो निष्ठेने करील." श्रद्धा, परंपरेचा अभिमान आणि भावना यांपेक्षा सावरकरांच्या वैयक्तिक जीवनात बुद्धिवाद, व्यवहार आणि विज्ञान यांना वरचें स्थान होतें.

देवनागरी लिपीचा पुरस्कार देखील त्यांनी परंपरेच्या अभिमानाने केला नव्हता; तर ती लिपी जगातील इतर लिप्यांपेक्षा

अधिक शास्त्रशुद्ध आहे असा त्यांचा दावा होता. बरें, ती लिपी-देखील त्यांनी जशीच्या तशी स्वीकारली नाही. आधुनिक लोक-व्यवहाराला ती इंग्रजीइतकी सोयीस्कर व्हावी आणि तिचें मुद्रण व टंकलेखन द्रुतगतीने करता यावें म्हणून त्यांनी काही अक्षरें कमी केली आणि कित्येक अक्षरांच्या रचनाही बदलल्या. "काळा-पुढे अक्षर असें काही नाही, त्याच्या गतीचा कायदा आपण पाळ-लाच पाहिजे," असें त्यांचें सांगणें असे.

भाषाशुद्धीबाबत त्यांचा दृष्टिकोन असाच इतर भाषाशुद्धी-वाल्यांपेक्षा काहीसा निराळा होता. भारतावर सैनिकी आक्रमणें करणाऱ्या परकीय जेत्यांनी आपापल्या भाषाही आमच्यावर लादल्या. त्यामुळे कित्येक यावनी आणि इंग्रजी शब्द नि वाक्-प्रचार भारतीय भाषांतून घुसले. परकीयांच्या गुलामगिरीचें जोखड झुगारून देणाऱ्या स्वाभिमानी राष्ट्राने भाषेचीही गुलामगिरी नष्ट केली पाहिजे असें तात्याराव म्हणत. "यावनी वा इंग्रजी भाषेचा वरचष्मा हा एक आपल्या दुर्बलतेचा अवशेष आपल्या राष्ट्रीय जीवनात कायमचा राहता कामा नये. संस्कृतसारख्या अति प्राचीन, वैभवशाली आणि समृद्ध भाषेचा विलोभनीय वारसा आज आपल्या जवळ असताना आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या परिभाषेकरिता आप-ल्याला परक्यांच्या तोंडाकडे पाहण्याचें कारणच काय? महाकवि कालिदास सगळ्या जगाला वंद्य ठरला. मॅक्समुल्लर सारखा जर्मन पंडित हयातभर वेदांचा मंत्रजागर करीत राहिला! संस्कृत भाषा हा आमचा मानबिंदु होय. भाषा ही राष्ट्रीय व्यवहाराची जीवनसरिता असते. ती गंगेप्रमाणे पवित्र आणि निर्मळ राहिली पाहिजे. तिच्यांत परभाषांच्या सांडपाण्याचे प्रवाह मिसळू देता कामा नयेत. विशुद्ध राष्ट्रवादाला तें मारक ठरेल."

इतिहासाचें लेखन आणि संशोधन राष्ट्रीय एकतेबरोबरच भारतीय अस्मिताही डोळ्यांसमोर ठेवून व्हावयास हवें, असा तात्यारावांचा अत्याग्रह असे. संशोधन करताना नवीन काही हाती लागतें पण तें पूर्ण सत्य नसतें. आणखी संशोधनानंतर त्यांत भर पडते, किंवा तें बदलावें लागतें. अशा स्थितीत उपलब्ध इतिहासातले, विद्यार्थ्यांच्यापुढे नेमकें काय ठेवायचें हें तारतम्यानें आधी ठरविलें पाहिजे. इतिहासाचीं जों सोनेरी पानें आणि रुपेरी क्षण विद्यार्थ्यांची राष्ट्रीय अस्मिता जागृत ठेवतील आणि ज्याच्याकरिता प्राणही वेचावे असें राष्ट्राचें चित्र त्यांच्या डोळ्यापुढे उभें करतील तेवढेच त्यांच्या वाचनाकरिता निवडावेत. मेकॉलेच्या इंग्लंडच्या इतिहासापेक्षा ॲबटने लिहिलेलें चक्रवर्ती नेपोलियनचें चरित्र अथवा अलीकडे दुसऱ्या महायुद्धाचा विन्स्टन चर्चिलने लिहिलेला स्मृति ग्रंथ हे विद्यार्थ्यांच्या वाचनाकरिता मला अधिक पसंत आहेत असें सावरकर म्हणत. जोसेफ मॅझिनीचें चरित्र त्यांनी याकरताच मराठीत लिहिलें. १८५७ सालच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा ‘ इतिहास ’ संशोधनपूर्वक संकलित करून त्यांनी प्रथम मराठीत लिहिला व व मग इंग्लंडात त्याचें इंग्रजीत भाषांतर करून घेतलें व तें छापलें. याचें कारण तें असें देत : तो संग्राम आमच्या राष्ट्रीय अस्मितेचा अद्‌भुत आविष्कार होता. आम्ही जिंकले गेलो तरी इंग्रजांचे गुलाम बनलो नव्हतो. आमचें स्वातंत्र्य परत जिंकून घेण्याची आमची ऊर्मि मेलेली नव्हती. आमचीं मनें अपमानाच्या सुडानें धगधगत होतीं. हें साऱ्या जगाला कळावें, म्हणजे भारत हें मृतवत् राष्ट्र आहे अन् ब्रिटिश लोकच त्याचें कल्याण करतील हा त्यांचा भ्रम दूर होईल. याकरिता मी तो ग्रंथ इंग्रजीत केला.

राष्ट्राचा निर्जीव नि निःसत्त्व जीवनप्रवाह बदलून त्याचें भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी क्रांतीसारखा दुसरा उपाय नाही,

असें सावरकरांचें ठाम मत होतें. जुलमी सत्ताधाऱ्यांना सत्ताभ्रष्ट करण्याकरिता राजकीय क्रांतीची आवश्यकता असते. मात्र तिच्यातून अराजक निर्माण होता कामा नये. "या दृष्टीने मला फ्रेंच राज्यक्रांतीपेक्षा इटालियन क्रांति अधिक अनुकरणीय वाटतें." असें ते प्रतिपादीत. समाजात समतेचें वारें सर्वत्र संचरून त्याचें सामर्थ्य वाढावें याकरिता सामाजिक क्रांति हवी. वाङ्मयाच्या द्वारे लोकशिक्षण आणि सुधारणेचा प्रत्यक्ष आचार हीं तिचीं साधनें होत. राजकीय क्रांतीसाठी मात्र सशस्त्र उठाव करून राज्यशकट उलथून टाकणें हा मार्गच त्यांना तरुणपणी फलदायी वाटत होता. पुढे या देशाच्या कारभारात नव्या नव्या राजकीय सुधारणा होत गेल्या आणि त्या राबवून घेऊन लोकशाही मार्गाने रक्तहीन क्रांति होऊ शकली हें प्रत्यक्ष पाहिल्यावर त्यांचा विचार बदलला, पण त्याचा त्यांनी मनापासून स्वीकार केला असावा असें वाटत नाही. कारण "तुम्हांला मिळालेलें स्वराज्य हा मतपेटीचा अलंकार आहे," असें ते हसून म्हणत. "आमची क्रांति पूर्णतया यशस्वी झाली असती तर देशाचे तुकडे पडले नसते. जेवढी झाली तेवढी देखील एकाच गोष्टीमुळे झाली असें म्हणता येणार नाही. लक्षात ठेवा की आपला शत्रू इंग्रज हा माणूस होता. अगदीच असंस्कृत रानरेडा नव्हता. फिरंगी तसा नाही. त्याला हुसकावून द्यायला फौजच पाठवावी लागेल.

स्वराज्याचीं स्वप्नें पाहण्यात सदोदित दंग असलेला देशभक्त हा जबर आशावादी असतो. "माझ्या डोळ्यांना या सप्तसिंधु समावेष्टित सुवर्णभूमीचं तें प्राचीनतम अतिरम्य चित्र नेहमी दिसतं." असें म्हणताना सावरकरांचे डोळे काही एका विलक्षण तेजाने चमकत असत. फणा काढलेल्या नागाप्रमाणे तें दूरलक्षी

आणि मर्मभेदी दिसत. त्यांची चमक पहाणाऱ्यांच्या अंतःकरणाचा थरकाप उडवी. त्यांच्या अभिनव भारताचे शस्त्रागार नुकतेंच नाशिकात एका पुरातन वाड्याच्या भिंतीत सापडलें तेव्हा त्यातील शस्त्रांची त्यांनी अगदी तपशीलवार चौकशी केली. त्या वेळी त्यांची साठी उलटून गेलेली असली तरी स्मरणशक्ति विलक्षण होती. शेवटी त्यांनी विचारलें. "काय केलेंस त्यांचें ?" "सरकार वाड्यात सुपूर्त केली" आम्ही सांगितलें. "कां ? तुला सांभाळावयाचीं नव्हतीं तर आमच्याकडे कां नाही दिलीं ?" त्यांनी रागावून प्रश्न केला. आम्ही म्हणालो, "तात्या इतकी वर्षं धूळ खात पडलेल्या त्या हत्यारांचा आता काय उपयोग ?" "आपली मातृभूमि देखील दीडशे वर्षं धूळ खात पडली होती." ते "त्या" नजरेने माझ्या मनाचा ठाव घेत बोलले आणि पुढे म्हणाले, "पांडवांचीं शस्त्रें शमीवृक्षावर तेरा वर्षं पाऊस पाणी खात होतीं. तरी त्यांनी कौरवांच्या सैन्यावर जय मिळविलाच ना ?" "पण तुमचीं हीं हत्यारं अगदी गंजून झिजून गेलीं होतीं." मी म्हणालो. त्यावर ते त्वेषाने गरजले, "आमचीं हत्यारं गंजलीं असतील. पण मनं अन् मनगट गंजलेलीं नाहीत." या वेळी त्यांच्या डोळ्याचें तें दाहक तेज अवर्णनीय होतें. आम्ही तर घाबरलोच.

पण लगेच आठवलें. यापूर्वी कित्येक वर्षे अंदमानच्या उंबरठ्यावर जन्मठेपेची शिक्षा भोगण्याकरिता पाऊल ठेवताना या तरुण क्रांतिकारकाला जेव्हा तुरुंगाच्या गोऱ्या अधिकाऱ्याने खिजविलें, "लक्षात असू द्या मिस्टर सावरकर, आता पंचवीस दुणे पन्नास वर्षं येथेच काढायचीं आहेत." तेव्हा तीच चमक त्यांच्या डोळ्यांत प्रकटली आणि मनातला दुर्दम्य आशावाद विचारता झाला, "पण साहेब, तुमचं ब्रिटिश साम्राज्य पन्नास वर्षं टिक-

णार काय ? बंदिवासातल्या हाल अपेष्टा आणि यमयातना काही वेळ असह्य होत आणि आत्महत्येने हें जीवन संपवावें असा निराशेचा विचार सावरकरांच्या मनात येई; पण दुसऱ्याच क्षणी मनातला खंबीर आशावाद उसळी मारून म्हणे "छे छे, मना, हा भ्याडपणा आहे. पलायन आहे!" आणि मग निराशा फुंकून टाकून ते परिस्थितीचें आव्हान दुप्पट जोमाने स्वीकारीत. डोळ्यासमोर आ पसरून उभा ठाकलेल्या मृत्यूवर मात करणारा असा मृत्युंजय पुनः या भरतभूमीत केव्हा जन्म घेईल तो घेवो!

सावरकरांच्या राजकारणाविषयी लिहिण्याचा आमचा अधिकार नाही. कारण त्या क्षेत्राचा आम्हांला बिलकुल अनुभव नाही. तरी पण त्यांच्या सान्निध्यात असताना त्यांच्या तोंडून देशाच्या राजकीय धोरणाबाबत वेळोवेळी काही विचारसूत्रें सहज ऐकायला मिळालीं तीं अशीं–

(१) खिलाफत चळवळ हा एक भस्मासुर आहे. निर्मात्याच्या डोक्यावर तर तो हात ठेवीलच, पण या भरतखंडाचेही शतखंड करील. (राष्ट्रीय मुसलमान हा एक नवा संप्रदाय याच चळवळीतून जन्मास आला.)

(२) स्वातंत्र्य चळवळीबाबत जेव्हा बहुसंख्य मुसलमानांचें अडेलतट्टू धोरण स्पष्ट दिसू लागलें तेव्हा सावरकरांनी त्यांना बजावलें, "आलात तर तुमच्यासह, न आलात तर तुमच्याशिवाय आणि विरोधाल तर तुमच्याशी लढून आम्ही स्वराज्य मिळवूच मिळवू.

(३) शत्रूचा शत्रू तो आपला मित्र होय.

(४) हतबल हिंदु हें हिंदुस्थानचें मर्मस्थान ठरेल.

(५) सरहद्दींचें समर्थ संरक्षण करणारी सुसज्ज सेना हा आमच्या योजनेतला पहिला कार्यक्रम असला पाहिजे.

(६) मरतुकड्या शरीरातलें अमर अजिक्य मन हें आडदांड शरीरातल्या मुर्दाड मनापेक्षा शतशः श्रेष्ठ होय. (महात्मा गांधी-विषयी आदर व्यक्त करताना ते वरील वाक्य उच्चारीत.)

(७) भारताचा राजदूत आर्य चाणक्यासारखा "अग्रतः चतुरो वेदान् पृष्ठतः सशरं धनुः" असाच असला पाहिजे. त्याचे शब्द चतुर आणि वाणी विनम्र हवी, पण त्याच्या पाठीशी चतुरंग संरक्षक दल खडें हवें.

(८) लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या.

शेवटचें घोषवाक्य त्यांनी मुंबई येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून महाराष्ट्रीय तरुणांकरिता उच्चारलें होतें. या तरुणांनी हजारोंच्या संख्येने सैन्यात शिरावें, अधिकाराच्या जागा मिळवाव्यात. ती पात्रता येण्याकरता सतत ज्ञानोपासना आणि शरीरसाधना करावी. महाराष्ट्रीय समाजाचें सैनिकीकरण व्हावें आणि महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त व्हावा असा त्यांचा संदेश होता. दुसऱ्या महायुद्धात तशी संधि मिळाली तेव्हा तीनही शस्त्रदलांत शिरा असें महाराष्ट्रीयांना सांगून ते पुढे म्हणाले.

"Today we help them;
Tomorrow. we help ourselves."

या एकाच क्षेत्राचा विचार करताना ते महाराष्ट्राला उद्देशून बोलत. बाकी त्यांच्या कोणत्याही राजकारणात "महाराष्ट्र" नव्हता. तें सारें अखिल भारतीय पातळीवरच चाले. त्यांत प्रांतीय भावना कुठेही नव्हती. पण सैनिकीकरणाच्या बाबतीत ते आम्हांला

म्हणाले, "भारतीय सैन्याचें जितकें महाराष्ट्रीकरण होईल तितकें चांगलें. मराठी माणसाचा रणांगणावर पराक्रम होतो तो पतंग ज्योति न्यायानुसार. ज्योत दाहक आहे, तिने आपले पंख जळणार, हें माहीत असताही पतंग तिच्यावर झडप घालतो. प्राणांची तमा बाळगीत नाही. असला पराक्रम उपाशी पोटी मराठमोळा माव-ळाच करू जाणे! मराठ्यांच्या रोमहर्षक इतिहासात याचे दाखले जागोजाग सापडतील." "सैन्यातील महार पलटण" बरखास्त (disband) करण्याचा निर्णय जेव्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी घेतला तेव्हा याच कारणाकरिता डॉ. आंबेडकरांच्या बरोबरीने सावर-करांनी गदारोळ उडविला आणि तो निर्णय शेवटी मागे घ्याव-यास लावला. मराठी रक्ताचे जे गुणविशेष आहेत ते मुलकी नोकऱ्या किंवा व्यापार धंदे यापेक्षा राष्ट्रसंरक्षणाच्या कारणी अधिक लागावे असें त्यांचें मत होतें.

पराक्रमाचे पवाडे आणि तोफांचे चौघडे ऐकताना ज्यांची प्रतिभा फुलून यावी आणि देशाची दुर्दशा नि दुर्बलता पाहताना ज्यांचें मन शोकावेगाने भरून यावें, त्यांच्या वाणीचें ओज नि सामर्थ्य कसें असेल हें काय निराळें सांगायला हवें? हजारों श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारें, त्यांचीं मनें खवळून पेटवून देणारें, आक्रमक पण बिनतोड युक्तिवादाने प्रतिपक्षाची भंबेरी उडवि-णारें आणि ऐकणाऱ्यांच्या भुजा फुरफुरायला लावणारें भाषण सावरकरांनीच करावें. त्यांचें वक्तृत्व म्हणजे नुसतें तुफान! त्याला दुसरी उपमाच नाही. एखाद्या दुथडी भरून वाहणाऱ्या वेगवान् नदीचा प्रवाह फुफाटत यावा, कड्यावरून कोसळावा आणि धो, धो, धो अशी मेघगर्जना करणारा धबधबा त्यांतून निर्माण व्हावा, मग कधी त्यातून उडणाऱ्या तुषारांवर कोवळे सूर्यकिरण पडून

एकदम इंद्रधनुष्याची शोभा दिसावी, कधी त्या जलाघाताने प्रचंड शिळांचे चूर्ण व्हावें, कधी तो प्रपात नळींच्या " भ्रांतिमत् वारियंत्रावर " पडून त्यांतून विजेचा लखलखाट निर्माण व्हावा तर कधी विजेचा दाहक लोळच जाळपोळ करीत बाहेर पडावा असा त्या वक्तृत्वाचा एकंदर थाट असे. क्वचित् उपरोध अन् उपहासगर्भ विनोद असला तर तो विरोधकाला चारी मुंड्या चीत करणाराच असायचा !

एकदा कर्नाटकात हुबळी येथे त्यांना नगरपालिकेकडून मानपत्र देण्यात आलें. तो समारंभ चालू असताना काही अति उत्साही कन्नडिग "कानडीत बोला" असा ओरडा करू लागले. सभेचा विचका होतो की काय अशी व्यवस्थापकांना भीति पडली. पण सावरकर शांतपणे बोलायला उभे राहिले. प्रारंभी कन्नडिगांची क्षमा मागून ते म्हणाले "मित्रहो, मी सरकारी कृपेनं अंदमानच्या कारागृहात कोंडला गेलो, तेव्हा तिथं क्रांतिकार्याकरिता शिक्षा झालेले अनेक स्वातंत्र्यवीर निरनिराळ्या प्रांतांतून आलेले दिसले. बंगाली होते. त्यांच्याकडून मी बांगला भाषा शिकलो. पंजाबी होते त्यांनी मला गुरुमुखी शिकविली. मद्रासी होते त्यांच्याकडून थोडेबहुत तामीळ शिकून घेतलें. पण माझ्या दुर्दैवाने तिथे कर्नाटकातून कोणीच आलेला नव्हता. त्यामुळे मला कानडी शिकायास मिळालें नाही ! आता पुनः अंदमानात गेलोच आणि तिथं आपल्यापैकी कोणी क्रांतिकारक देशभक्त भेटला तर मोठ्या आनंदानं मी त्याच्याकडून कानडी शिकेन. " ही सलामी ऐकताच जिकडे तिकडे एकदम शांत झालें. आणि तात्यारावांचें मराठी भाषण श्रोत्यांनी तासभर तल्लीन होऊन ऐकलें !

खरोखर सावरकरांचें जीवन ही एक ज्वलंत देशभक्तीची, चिरंतन चैतन्याची, असामान्य प्रतिभेची, अतुल शौर्याची, अदम्य आत्मविश्वासाची, अशरण अस्मितेची, अद्‌भुत पराक्रमाची आणि प्रबल पौरुषाची तेजस्वी गाथाच म्हटली पाहिजे. म्हणूनच तें जीवन निमाल्याबरोबर लोककवि मनमोहनांना पुढील काव्यपंक्ति स्फुरल्या

तें आता दिसणार नाही
की जें निशाणातच नव्हे, प्राणातही
भगवें होतें
तें आता स्पंदणार नाही
कीं जें वेरुळचें शिल्प अंदमानात
घडवीत होतें
तें आता बोलणार नाही
की जें सत्तावन्न नंतरचें खरें
अठ्ठावन्न होतें
तें आता हसणार नाही
की जें अमावास्येची प्रसन्न पुनव
करीत होतें

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

# क्रांतदर्शी सावरकर

## ( १ )

## हिंदु राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते सावरकर

सावरकरांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करताना ते स्वतःला हिंदु संघटक म्हणवून घेत असत. या देशात पुनरपि हिंदुराष्ट्रवादाची स्थापना करणें हेंच त्यांचें अंतिम राजकीय उद्दिष्ट होतें. त्यासाठीच त्यांनी शुद्धीकरणाची चळवळ हाती घेतली होती. अंदमानात असताना त्यांना तेथील पठाण वॉर्डर हिंदु कैद्यांना बाटवीत असल्याचें आढळून आलें, तेव्हा त्यांनी तेथेच त्यांना परत हिंदु करून घेण्याची चळवळ सुरू केली.

रत्नागिरीच्या तुरुंगात असताना त्यांनी हिंदुत्व हा राष्ट्रवादाचा सिद्धान्त मांडणारा मौलिक ग्रंथ लिहिला. त्याला पं. मदनमोहन मालवीय व स्वामी श्रद्धानंद यांनी आपला संपूर्ण व सक्रिय पाठिंबा दिला होता.

या देशाने हिंदुराष्ट्रवादाचा सिद्धान्त स्वीकारावा व त्यास अनुसरून राज्यशासन चालावें म्हणून सावरकरांनी हिंदुसभेचें अध्यक्षपद स्वीकारलें व अखेरपर्यंत खटपट केली. त्यास अद्यापि यावें तसें यश आलें नाही. पण आज ना उद्या तें येईल, व हा हिंदुस्थान देश पुनः पूर्ववैभवाने चमकू लागेल. पूर्वी या देशावर मुसलमानांनी व त्याहीपूर्वी शक-हूणांनी आक्रमणें केलीं असताना तीं सर्व या देशाने परतवून व पचवून टाकलीं आहेत.

आता स्वातंत्र्याच्या काळात तर उरलीं सुरलीं सारीं ख्रिस्ती-मुसलमानांचीं आक्रमणें पचवून टाकण्याची सुसंधि लाभली आहे. त्याला निधर्मी म्हणविणाऱ्या देशी पण परधार्जिण्या राज्यकर्त्यांकडून व स्वतःला भारतीय राष्ट्रवादी म्हणविणाऱ्या प्रादेशिक राष्ट्रवाद्यांकडून अडथळा येत आहे. तो दूर करणें हें आता भावी पिढीचें काम आहे. सावरकरांनी या बाबतीत पूर्वीचा इतिहास व तत्त्वज्ञान सांगून आपलें कार्य केलें आहे.

हिंदुराष्ट्रवादाची विचारसरणी ज्या दिवशी या देशाची शासनसंस्था स्वीकारील त्या दिवशी या देशाला समर्थ, संपन्न व स्वतंत्र वैभवशाली स्वरूप प्राप्त होईल. परंतु जोपर्यंत हा विचार हा देश स्वीकारणार नाही तोपर्यंत या देशात ख्रिस्ती-मुसलमानांचीं आक्रमणें चालूच राहतील व या देशाचें स्वातंत्र्यही सतत धोक्यात राहील.

भारतात बहुसंख्य प्रजा हिंदु असल्यामुळे येथे आता ऐतिहासिक दृष्टया हिंदु राष्ट्र अवतीर्ण झालेंच आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाही. आज प्रधानमंत्री व बहुसंख्य इतर मंत्री व आपल्या चतुरंग सेनेतील बहुसंख्य अधिकारी व जवान हिंदुच आहेत. आपला अशोक चक्रांकित ध्वज आपल्या भारताच्या राजधानीवर आज फडकत आहे. तो हिंदु ध्वजच आहे. या ध्वजातील अशोकचक्र हें योग्य प्रसंगी आक्रमकांविरुद्ध सुदर्शनचक्राचें स्वरूप धारण करून आक्रमकांचा संहार केल्याखेरीज राहणार नाही असें दाखवीत आहे.

आजच्या या कृत्रिम नि बलात्कृत राजकीय विभागणीचा विचार एकीकडे ठेविला तर आपण सर्वजण रक्त, धर्म, नि देश यांच्या

टिकाऊ बंधनांनी अविभाज्य रीतीने एकत्र बांधले गेलो आहोत. काही झालें तरी आपण आपलें ध्येय म्हणून निश्चयपूर्वक घोषित केलेंच पाहिजे की, उद्याचा हिंदुस्थान हा काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत केवळ संयुक्त म्हणूनच नव्हे तर अभिन्न राष्ट्र म्हणून एक नि अविभाज्यच राहिला पाहिजे.

हिंदुस्थानात उगम पावलेल्या कोणत्याही धर्माचा अनुयायी म्हणविणाऱ्या कोणाही मनुष्याला हिंदु म्हणून लेखताना त्या माणसाची हिंदुस्थान ही पितृभूच असली पाहिजे, तरच तो हिंदु म्हणता येईल. सावरकरांनी त्याची सूत्ररूप व्याख्या अशी केली आहे:

आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥

हिंदुराष्ट्र म्हणण्यास अवश्य असलेले एकात्मतादर्शक भाषा, संस्कृति, वंश व धर्म इत्यादि गुण हिंदु लोकांखेरीज इतर कोणत्याच लोकांत एकसमयावच्छेदे करून एकत्र आढळणार नाहीत. एक देश, एक वंश, एक धर्म, एक भाषा या राष्ट्राच्या सर्व कसोट्या हिंदु लोकसमूहास लागू पडतात, म्हणून हें हिंदुराष्ट्र आहे.

## हिंदुराष्ट्राचें पुरातनत्व

वरील व्याख्येतील हिंदु शब्दाचें पुरातनत्व हिंदु शब्दाच्या ऐतिहासिक उत्पत्तीवरून दिसून येईल. हिंदु, हिंदुस्थान, व हिंद या प्राकृत शब्दांचा मूळ उगम ऋग्वेदकालीन 'सप्तसिंधु' या आपल्या स्वतःच्या प्राचीनतम राष्ट्रीय अभिधेतच आहे. हजार वर्षांपूर्वीच्या एका अरब ग्रंथातही आपल्या राष्ट्राविषयी हिंद व हिंदु हीं नांवें गौरवाने उच्चारलीं आहेत. पारसिकांनी अडीच हजार

वर्षांपूर्वीच्या त्यांच्या धर्मग्रंथात आपल्या राष्ट्रास फक्त 'हिंदु' असेंच म्हटलें आहे. हिंदु हा शब्द आपलें राष्ट्रीयत्वच प्रकट करतो.

श्रेष्ठ महाराष्ट्रीय संत श्रीसमर्थ यांची तळमळ याच हिंदु शब्दातून प्रकट झाली आहे. ते म्हणतात की,

"या भूमंडळाचे ठायीं । हिंदु ऐसा उरला नाही."

वर दिलेल्या हिंदु शब्दाच्या इतिहासावरून हें स्पष्ट होतें की, हिंदु शब्द हा मूलतः आणि मुख्यतः देशिक आणि राष्ट्रीय आहे.

हिंदु शब्द हा कोणत्याही विशिष्ट धर्ममताचा निदर्शक नव्हे. यासाठीच हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याही धर्मग्रंथाशी व धर्ममताशीच तेवढी बांधून टाकण्याचे यत्न दिशाभूल करणारे ठरतात. जैन, शीख, आर्यसमाजी, लिंगायत हे सर्व हिंदुच असून या व्याख्येत बसू शकतात. वैदिक कालापासून जैनांच्या पितरांची परंपरागत पितृभू भारतभूमि हीच आहे. त्यांच्या तीर्थंकरादिक धर्मगुरूंनी याच भूमीत आपला धर्म प्रकटविल्यामुळे ही त्यांची पुण्यभू आहे. शिखांचा गुरु नानक याने शीख धर्म प्रथम याच भूमीत प्रकटविल्यामुले त्यांचीही पुण्यभूमि भारतभूमि हीच आहे.

आर्यसमाजीय हिंदु वेद प्रमाण मानणारे आहेत व ते भारत भूमीलाच पुण्यभूमित्वाचा मान देतात. म्हणून ते हिंदुच आहेत. लिंगायत, राधास्वामीय, भिल्ल, संताळ, कोलेरियन यांची देखील परंपरागत पितृभू भारत हीच आहे, व त्यांचा पूजापंथही याच भारतभूमीस पुण्यभू मानीत आलेला आहे. यास्तव तेही हिंदुच होत.

## अस्पृश्यता निवारण व शुद्धि

हिंदुस्थानात हिंदु हे बहुसंख्य आहेत व ते बहुसंख्यच राहिले पाहिजेत असा अट्टहास हिंदूंनी धरला पाहिजे. यासाठी अस्पृश्यता

निवारण आणि शुद्धि हीं दोन साधनें अवश्य उपयोगात आणिलीं पाहिजेत. इतकेंच नव्हे तर त्या दोन गोष्टी हिंदुसंघटनाच्या दृष्टीनेही अत्यंत आवश्यक आहेत. प्रत्येक वर्षी कित्येक लाख हिंदु लोक हिंदुधर्म सोडून ख्रिश्चन-मुसलमान धर्म स्वीकारतात. त्यामुळे त्या धर्मांचे लोक वृद्धिगत होत आहेत. त्यास आळा घालणें अवश्य असून वरील दोन्ही साधनांचा उपयोग करून हिंदुराष्ट्र संख्येने घटू देणार नाही, असा निश्चय व प्रयत्न प्रत्येक हिंदूने करणें अवश्य आहे.

अस्पृश्यता निवारण आणि शुद्धि हीं साधनें जशीं संख्याबळ वाढविण्यास उपयोगी आहेत तशींच हिंदूंची गुणवत्ता वाढविण्यासही तीं अतिशय उपयुक्त आहेत. केवळ संख्याबळ हें अंध आहे, तर केवळ गुणबळ हें पंगु आहे. राष्ट्रीय गुणांत श्रेष्ठांतील श्रेष्ठ प्रवृत्तींत संघटकांची गणना केलीच पाहिजे. ज्या हिंदूंत हिंदुत्व-भावनेने, स्वराष्ट्रभावनेने प्रेरित झालेलें संघटन होत आहे त्यांचें राष्ट्रीय गुणबल वाढत आहे असें समजलें पाहिजे. तसेंच अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीमुळे हिंदुसंघटनाचीं पुरस्कर्तीं माणसें त्या समाजाचें गुणबळ वाढवितात. नगरेंचीं नगरें आणि गावेंचीं गावें आज वरील चळवळी प्रत्यक्ष आचरणात आणून अस्पृश्यांना पूर्ण स्पृश्य करून सोडीत आहेत. यामुळे त्यांची गुणवत्ता वाढीस लागली आहे. अशा रीतीने अस्पृश्यतानिवारण आणि शुद्धि या दुहेरी साधनांनी हिंदु आपलें संख्याबळ आणि गुणबळही वाढवू शकतील असें सावरकरांचें मत होतें.

वास्तविक पाहता कोणाही हिंदूने मुसलमानाचें किंवा ख्रिस्त्याचें अन्न खाल्लें किंवा पाणी घेतलें म्हणजे तो बाटतो ही

कल्पनाच खुळेपणाची द्योतक आहे. सावरकरांनी म्हटलें आहे की, धर्माचें स्थान पोट नसून हृदय आहे.

मुसलमानादिक लोक हिंदूंचें चुकूनच नव्हे तर लुबाडून घेऊन देखील खातात आणि पुनः मुसलमानचे मुसलमानच राहतात. मग मुसलमानांच्या अन्नाने हिंदुधर्मच नष्ट व्हावा इतकी हिंदु-समाजाची पचनशक्ति क्षीण का असावी? आजपर्यंत कोण्या मुसलमानाचा पाण्याचा थेंब तोंडात पडला की, मनुष्य जन्मभरच नव्हे तर पिढ्यानुपिढ्या बाटतो ही खुळी समजूत बद्धमूल झालेली होती. ही खुळी व वेडसरपणाची समजूत नष्ट होणें अत्यंत अवश्य आहे. अलीकडे अन्नोदक व्यवहाराचें काही महत्त्व वाटेनासें झालें आहे, हें आपल्या समाजहितकारक विचारक्रांतीचें निदर्शक आहे. या खुळ्या समजुतीमुळे मुसलमान अगर ख्रिश्चन झालेले हिंदु पुनः शुद्ध करून हिंदु करून घेतले पाहिजेत. त्या शुद्धीकरणाचे संस्कार अगदी सोपे व सहज करता येण्यासारखे असले पाहिजेत. कित्येक वर्षें अहिंदूंत पोसला गेलेला हिंदु संधि सापडताच तुळशीपत्र खाऊन पुनः शुद्ध करून घेता येतो व तो हिंदु होतो, हें पाद्री किंवा मौलवी यांना पक्केपणी समजलें की ते आपलीं भ्रष्टाकाराचीं दुकानें भराभर आटोपतीं घेतील.

जो देव दर्शनाने बाटतो तो देवच नव्हे, अशी ठाम समजूत प्रत्येक हिंदूने आपल्या हृदयात साठवून ठेवली पाहिजे. अस्पृश्यास देवदर्शन करू दिलें तर तो देवच विटाळतो असें म्हणणें केवळ हास्यास्पद आहे!

तत्त्वज्ञानाचा ज्या जातींत उदय झाला म्हणून जगात यशोदुंदुभि निनादत आहेत त्या ब्राह्मण जातींत दर्शनाने देव

वाटतो हा विषय चर्चेस यावा ही गोष्टच हास्यास्पद आहे. ब्राह्मण ज्याला आपला देव समजतात त्याची भक्ति वाढविण्याचें, प्रत्येक देवभक्ताचें कर्तव्य आहे. तें घटविण्याचें नव्हे. देव पतितपावन आहे. म्हणून पतिताने त्याचें दर्शन घेणें अवश्य आहे. हें दर्शन त्याने घ्यावें, हें न्याय्य आहे. अस्पृश्य हे आपल्या हिंदुधर्माचे भाऊ आहेत. म्हणून त्यांना देवदर्शन घेऊ द्या. परधर्माच्या पंजात फसून अस्पृश्य बंधूनी नरकात पडू नये म्हणून तरी त्यांना देवदर्शन घेऊ द्या. माणसात एक वेळ अस्पृश्यत्व असू शकेल परंतु देवात दर्शनाची अस्पृश्यता हें केवढें थोतांड आहे! हिंदुमात्र हिंदु देवतेच्या दर्शनाचा अधिकारी आहे. देवाच्या दर्शनाने देव अपवित्र होत नसून अपवित्र मनुष्य पवित्र होतो असें सावरकरांचें मत होतें.

कित्येक शतकांपासून हिंदुस्थानातील हिंदु लोकांवर परकीय लोकांचे हल्ले होत आले आहेत, तरी पण हिंदु लोक नाना संकटांना तोंड देऊन अजून टिकून राहिले आहेत. स्वतःची संस्कृति, इतिहास, राष्ट्राभिमान जागृत ठेवून ते अद्यापही कर्तृत्वशील आहेत. हिंदु लोकांना जें स्वराज्य अभिप्रेत आहे, तें हिंदु राहूनच व हिंदु म्हणवूनच प्राप्त झालें पाहिजे. त्यासाठी हिंदुस्थानात हिंदु कोठेही असो, त्याची संवेदना दुसऱ्या कोठच्याही भागावर राहणाऱ्या हिंदु बांधवाला झाली पाहिजे. पायाला ज्या वेदना होतात त्या डोक्यालाही समजतात. हें जसें शरीराचें आहे, तसें हिंदुस्थानात कोणत्याही प्रान्तात कोणी हिंदूंचा छळ करू लागला तर दुसऱ्या भागातील हिंदु बांधवाला सहानुभूतीची संवेदना निर्माण झाली पाहिजे. अशी एकराष्ट्रीयत्वाची भावना हिंदुराष्ट्रात उत्पन्न झाल्यासच हिंदुराष्ट्र हें अखंड हिंदुस्थान मिळवू शकेल. ‘ मला-

काय त्याचें ' ही मनोवृत्ति आपल्याकडे पूर्वापार चालत आलेली आहे. त्यामुळे हिंदुस्थानवर परकीयांच्या झालेल्या आक्रमणाला उत्तेजन मिळत गेलें. मुसलमानांनी सिंधवर स्वारी केली, पंजाबवर हल्ले केले, विंध्यपर्वत ओलांडला तरी आपण गप्प बसलो आणि आजही उत्तरेकडील हिंदु, दक्षिणेकडील हिंदु असा भेद माजवीत बसलो तर पुनः मागच्या इतिहासाची पुनरावृत्ति झाल्याशिवाय राहणार नाही. शेजाऱ्याचें घर जळत असलें तर आपण तें शेजाऱ्याचें म्हणून कधी गप्प बसतो का? तीच गोष्ट हिंदुधर्माची. आपण जर ही गोष्ट चांगल्या रीतीने ओळखली तर आपलें अस्तित्व कधीही नाहीसें होणार नाही. शरीराच्या एका भागाला इजा झाली तर सर्व जीव कळवळतो. आपलेंही तसेंच झालें पाहिजे. आपल्या दाराशी संकट येईपर्यंत आपण गप्प राहून चालणार नाही. ही चूक आपण वेळीच ओळखली असती तर आज आपलें शक्तिमान् साम्राज्य दिसलें असतें आणि अल्पसंख्याकांचा प्रश्न येथे कधीही उपस्थित झाला नसता.

हिंदु नसेल तर हिंदुस्थानची काय किंमत! इंग्रज नसतील तर इंग्लंडची काय किंमत! जर्मन नसतील तर जर्मनीची काय किंमत! इंग्लंडमध्ये अल्पसंख्याक आहेत म्हणून कोणीही इंग्लंडचे तुकडे करण्याची मागणी करीत नाहीत, जर्मनीमध्ये ज्यू अल्पसंख्याक आहेत म्हणून ज्यू काही अल्पसंख्याकांच्या हक्कांची मागणी करू शकत नाहीत. हिंदुस्थानात हिंदूंची प्रचंड बहुसंख्या ज्या अर्थी आहे त्या अर्थी येथे हें राष्ट्र ' हिंदू राष्ट्रच ', व हा देश ' हिंदुस्थानच ' राहणार.

हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जे प्रयत्न झाले, त्यांत हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यावर अवास्तव भर दिला जात असे.

त्याबद्दलची सावरकरांची भूमिका फार मार्मिक व योग्य होती. ती अशी की " याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, विरोधाल तर तुमच्या विरुद्धही, हिंदुराष्ट्र आपलें भवितव्य बनेल तसें घडवील. "

हिंदुसमाजाच्या प्रसरणशीलतेचेंही महत्त्व सावरकर जाणून होते. म्हणून हिंदु धर्माला मुकलेल्या लोकांना परत हिंदुधर्मात येण्यास हिंदुधर्म खुला आहे, एवढेंच नव्हे तर अहिंदूंनाही हिंदु धर्म खुला आहे हा मोठा सिद्धान्त त्यांनी मांडला व आपल्या कृतीने सिद्ध करून दाखविला व लोकांस पटवून दिला. परक्यांना हिंदू होता येत नाही हा प्रचलित रूढ असलेला समज त्यांनी पार घालवून दिला व त्या उलट, धर्मान्तर झालें तर राष्ट्रान्तर होतें हें तत्त्व त्यांनी नागभूमि व झारखंड यांच्या उदाहरणावरून दाखवून दिलें.

* * *

## (२)

# महाकवि सावरकर

"जें न देखे रवि, तें देखे कवि" या उक्तीनुसार सावरकरांची महाकवि ही भूमिका फारच आकर्षक आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचें जीवन आणि त्यांची कविता यांचे परस्परसंबंध अत्यंत घनिष्ठ आहेत. ते जसे क्रांतिकारक वीर होते, त्याचप्रमाणे त्यांची कवितासुद्धा क्रांतदर्शी आणि वीररस-पूर्ण आहे. सावरकरांना ज्याप्रमाणे त्यांच्या देशबांधवांपासून सतत २७ वर्षें दूर ठेवण्यात आलें त्याप्रमाणे त्यांच्या कवितेलासुद्धा दीर्घ कालपर्यंत जप्तीच्या तंत्राने डांबून टाकण्यात आलें होतें. अंदमानच्या कारागृहात एक तप म्हणजे १२ वर्षें हातकडया, कोलू फिरविणें, गोणपाटासारखे कपडे घालणें आणि मिठाशिवाय कांजी, रोटी खाणें, या गोष्टी त्यांच्या नशिबी आल्या. परंतु त्या तशा छळातही त्यांची स्वतंत्र आणि शक्तिसंपन्न काव्यप्रतिभा निष्प्रभ झाली नाही. उलट तेथील भयानक कोठडीच्या अंधुक प्रकाशात देखील त्यांनी 'कमला,' 'विरहोच्छ्वास,' 'जगन्नाथाचा रथ' अशीं एकापेक्षा एक सरस प्रतिभापूरित आणि गुणोत्कृष्ट काव्यें प्रथम दगडाच्या अणकुचीदार टोकाने कारागाराच्या भिंतीवर कोरावी, तुरुंग अधिकाऱ्याच्या लक्षात आलें तर शिक्षा होत असे म्हणून तीं त्वरित पाठ करावीं, कोणी सुटून बाहेर जाणारा आहे, तें हेरून त्या व्यक्तीशी मैत्री संपादून त्याला तीं पाठ करायला

लावून तीं कवनें बाहेर पाठवावीं, अशी विचित्र परिस्थिति या काव्याच्या वाटयाला आली ! सरकारने त्यांच्या काव्याच्या प्रकाशनावर बंदी घातली तरी पण तें महाराष्ट्राच्या घराघरांतून प्रसार पावलें. मराठीशिवाय जगातल्या इतर कोणत्याही काव्याच्या इतिहासात असा अद्‌भुतरम्य प्रसंग नसेल असें वाटतें. कारागृहात रचलेल्या या कवितांत प्रसन्न प्रणयाचा आनंद आणि उन्माद ओतणें आणि "अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला" असा आत्म्याच्या अमरत्वाचा जागता हुंकार प्रकट करणें हे प्रसंगही तितकेच विस्मयजनक आहेत.

कवि सावरकरांना लोकांपासून दीर्घकाल सक्तीने दूर राहावें लागल्यामुळे त्यांच्यावर किंवा त्यांच्या कवितांवर आधुनिक कवींचा अथवा काव्याचा यत्किंचित्‌ही परिणाम झालेला नाही. त्यांच्या कवितेचें वळण सर्वस्वी स्वतंत्र आहे. राष्ट्रप्रेम हा तिचा आत्मा आहे. तिच्यामागे त्यांची जाज्वल्य विजिगीषु वृत्ति आहे. तिला स्वातंत्र्य अतिशय प्रिय आहे. पतित, विधवा, दलित, अस्पृश्य, धर्मान्तरित झालेले ज्ञातिबांधव आणि परतंत्र देशबांधव हे सारे तिच्या विशाल आणि उदार दृष्टीत सामावले आहेत. इतकेंच काय, पण ह्या साऱ्यांचा उद्धार करणें हेंच तिचें ब्रीद्र आहे. त्यासाठीच कवि सावरकरांनी आपली वाणी आणि लेखणी झिजविली आहे.

सावरकरांची काव्यदृष्टि अशी अद्वितीय असल्यामुळे त्यांची काव्यसृष्टिही तशीच अतुलनीय झाली आहे. सावरकरांची प्रतिभा महाकवीची आहे. तिच्यात आकाशाचा अमर्याद विस्तार, रत्नाकराची अथांग खोली आणि महानदाचा अनिरुद्ध आवेग आणि

प्रचंड प्रवाह आहे. त्यांच्या प्रतिभेने आविष्कृत केलेल्या प्रत्येक कवितेत सावरकरांचें महान् व्यक्तिमत्त्व आविर्भूत झालें आहे आणि तें त्यांच्या कवितेच्या प्रत्येक अक्षरा-अक्षरांत प्रतिबिंबित झालें आहे. हेंच पहा ना :

"कार्य सोडुनी अपुरे पडला झुंजत, खंती नको ! पुढे ।
कार्य चालवूं गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे अम्ही धडे ॥ "

हे शब्द चापेकरांच्या फटक्यातील आहेत. १८९७ मध्ये पुण्यास रँड आणि आयर्स्ट या साहेबांना चापेकर यांनी ठार मारलें तेव्हा चापेकरांच्या जीवनावर सावरकरांनी पोवाडा रचला. हा पोवाडा त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षी रचला आहे.

"देशभक्ति प्रारंभ जीवनाचा ।
आत्मयज्ञाने अंत व्हावयाचा ॥"

हें खरोखर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनाचें सार आहे.

काव्यलेखनाच्या ऐन उमेदीच्या पहिल्या प्रहरांत सावरकरांनी जीं काही संस्मरणीय काव्यें केलीं, त्यांत नररत्न तानाजी मालुसरे आणि बाजी प्रभु देशपांडे यांच्या जीवनावरील पोवाडे गणले जातात. त्यांपैकी तानाजीवर रचलेल्या सिंहगडाच्या पोवाड्यावर बरेच दिवस सरकारी बंदी होती. त्यातील शब्दरचना पहा :

धन्य शिवाजी, तो रणगाजी, धन्यचि तानाजी।
प्रेमे आजी सिंहगडाचा पोवाडा गा जी ॥

यात मराठेशाहीचा इतिहास कवीने वर्णिला आहे. तरी त्यात त्या वेळच्या अत्याचारी इंग्रजी सत्तेविरुद्ध वीर हुंकार आहे. स्वातंत्र्यासाठी भारतीय तरुण मनात शौर्याचें आणि पराक्रमाचें उद्‌बोधन व्हावें यासाठी त्यांनी पोवाडा या काव्यप्रकाराचा अवलंब केला.

बॅरिस्टर होण्यासाठी सन १९०६ मध्ये सावरकर विलायतेस निघाले तेव्हा बोटीच्या डेकवर त्यांना स्वजनांचा विरह वाटू लागला. पत्नी आणि नातलगांपासून आपण दूर जात आहोत याची त्यांना जाणीव झाली. त्या वेळी एक उल्का समुद्रात पडलेली सावरकरांनी पाहिली. काव्यप्रतिभेने कवि सावरकरांचें विरही मनोलेखन सहज केलें. 'तारकांस पाहून' ही कविता त्यांनी रचली. त्या कवितेत ते म्हणतात :

परि सागरा सांग काय ही लटपट ? ही कुठली
चटक चांदणी कवण ? नभांतून निसटुनिया विपलीं.
रात्री ऐशा अशी एकटी लगबगिने घुसली
तुझिया जलमंदिरी सर्वेची दिसेनशी झाली ॥ १

प्रेमाची चांदणी परंतु ज्यांची दूर वसे ।
किती प्रवासी तळमळती बा ! तुझ्या निकट ऐसे ॥ २

तुझा तुझ्या चांदणिशी पाहून प्रिय संगम साचा ।
तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा ॥ ३

पुढे काही दिवसांनी वंगभंगाची चळवळ सुरू झाली. अखिल बंगाल क्रुद्ध झाला. महाराष्ट्र आणि पंजाब यांनी बंगालला साथ दिली. इंग्लंडमधील हिंदी विद्यार्थ्यांत त्या चळवळीचा प्रतिध्वनि उमटला. आणीबाणीचा काळ आला. बॅ. सावरकरांच्या दोघा बंधूंना अटक झाली. स्नेही पकडले गेले. शोकमग्न परिस्थितीत बॅ. सावरकर समुद्र किनाऱ्यावर एकटे बसले असता मातृभूमीच्या आठवणीनें सावरकरांचें हृदय उचंबळून आलें. मातृभूमीच्या वियोगाने वेडे झालेले कवि सावरकर सागरास म्हणू लागले :

ने मजसी ने परत मातृभूमीला ।
सागरा, प्राण तळमळला ।।
नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा ।
मज भरतभूमिचा तारा ।।
प्रासाद इथे भव्य परी मज भारी ।
आईची झोपडी प्यारी ।।
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा ।
वनवास तिच्या जरी वनिचा ।।
भुलविणें व्यर्थ हें आता । रे
बहु जिवलग गमतें चित्ता । रे
तुज सरित्पते जी सरिता । रे
तद्विरहाची शपथ घालितो तुजला ।
सागरा, प्राण तळमळला ।।

याच वेळी सौ. येसूवहिनी फार संत्रस्त आणि निराधार परिस्थितीत होत्या. त्यांची निराधार मनःस्थिति सावरकरांच्या अंतःचक्षूने ओळखली. त्यांनी वहिनीला सांत्वनपर पत्र ( काव्यरूप ) पाठविलें. त्यात उत्कटतेच्या भावनेने परमोच्च बिंदु गाठला आहे.

अनेक फुलें फुलतीं । फुलोनिया सुकोन जाती
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे ? ।।
परी जें गजेंद्रशुंडेने उपटिलें । श्रीहरीसाठी मेलें
कमलफूल तें अमर ठेलें । मोक्षदाते पावन ।।
अमर होय जी वंशलता । निर्वंश जिचा देवाकरिता
दिगंती पसरे सुगंधता । लोकहितपरिमलाची ।।
धन्यधन्य आपुला वंश । सुनिश्चये ईश्वरी अंश
कीं रामसेवा पुण्यलेश । आपल्या भाग्यीं लाधला ।।

सावरकरांवर ओढवणाऱ्या दुःखमालिकेत त्यांच्या प्रथम पुत्राच्या निधनाची वार्ता आल्याने भर पडली. अपत्याच्या स्मरणार्थ त्यांनी 'प्रभाकरास' ही पुढील विलापिका लिहिली :

नवप्रसव तव जननी मजला दावित असताही
गुरुजनमर्यादिने म्यां बहु पाहियलें नाही
चोरुनि घ्यावें कधी कधी तव अर्ध चुंबनातें
सुखोत्सवें तव आपण होउनी नयन झाकती ते
प्रभ्या ! प्रियकरा ! होतासी बहु दिवस असा सखया
अमूर्त तू कल्पना, एक मधुमधुर अशी हृदया ॥

सन १९१० मार्चपर्यंत सावरकर मोकळे होते. त्यांना अटक झाली तेव्हा आपल्याला साम्राज्यवादी इंग्रज सरकार कठोरपणाने वागविणार हें त्यांनी गृहीतच धरलें. 'माझें मृत्युपत्र' या नांवाची कविता त्यांनी रचली. तेजस्वी आणि त्यागवृत्तीने परिपूर्ण असलेल्या भावना त्या कवितेत व्यक्त झाल्या आहेत. ते म्हणतात :

हे मातृभूमि तुजला मन वाहियेलें
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें ।
तूतेंचि अर्पिली नवी कविता रसाला
लेखाप्रति विषय तूचि अनन्य झाला ॥
त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृहवित्तमत्ता
दावानलांत वहिनी नवपुत्र कांता ।
त्वत्स्थंडिली अतुल-धैर्य वरिष्ठ बंधु
केला हवि परमकारुण पुण्यसिंधु ॥
त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिली बघ आता मम देह ठेला ॥

सावरकरांची ही करुणोदात्त वाणी कानावर पडते, त्या वेळी त्यांच्याविषयी मन आदरभावनेने उचंबळून येतें. ह्या कवितेत स्वाभिमान व आत्मसमर्पणाची उत्कट भावना दिसून येते. ते पुढे स्पष्टच सांगतात :

कीं घेतलें व्रत न हें आम्हि अंधतेने ।
लब्धप्रकाश इतिहास-निसर्गमानें ॥
जें दिव्यदाहक म्हणूनि असावयाचें ।
बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥

जें दिव्य असतें तें दाहकही असतें. सावरकरांनी कथन केलेला हा अनुभव प्रखर असला तरी सत्य आहे. त्यांच्या आत्मवृत्तात्मक कवितांत भावनेचा विद्युत् वेग आणि भाषेचा गंगौघ आहे. तो वाचकांना आकर्षून घेतो. त्या करुणरसाने आर्द्र असल्या तरी एकाही कवितेचा स्वर आर्त नाही. प्रतिकूल परिस्थितीत भयाचा किंवा नैराश्याचा ओझरता स्पर्शही त्यांच्या कवितेला झाला नाही. उलट कोणत्या भावना त्या काव्यांत व्यक्त झाल्या आहेत तें पहा—

याहुनिही भयद असे छळ सहेनची ।
परि झटेन, जीवनान्तिही झटेनची ।
करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा ॥

असा दुर्दम्य आशावाद सावरकरांच्या अन्तःकरणात पेटलेला होता. म्हणूनच ते सर्व दिव्यांतून पार पडले असें म्हणता येईल.

अंदमानच्या कारागृहात महाकवीच्या प्रतिभेला साजेशीं काव्यें त्यांनी रचलीं. ‘कमला,’ ‘विरहोच्छ्वास,’ ‘जगन्नाथाचा रथोत्सव,’

'अनंताची आरती,' 'मरणोन्मुख शय्येवर,' 'सूत्रधारास,' अशी एकापेक्षा एक सरस काव्यनिर्मिति त्यांनी केली. त्यांत त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीचें, त्यांच्या उदात्त कल्पनाशक्तीचें आणि विशाल अन्तःकरणाचें रम्य दर्शन होतें.

जगन्नाथ पुरी या यात्रेच्या ठिकाणी जगन्नाथाच्या रथाची भव्य मिरवणूक दरवर्षी निघत असते. पण विश्वनियंता जगन्नाथ दिक्-क्षितिजाच्या रथात बसून गतीच्या अश्वांना कालाच्या अतूट उतरणीवरून भरधाव पळवीत असतो अशी कल्पना करून कवि विश्वनियंत्या जगन्नाथाला प्रश्न करतात :

ऐश्वर्यें भारी । या अशा । ऐश्वर्यें भारी
महाराज, आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ?
दिक् क्षितिजांचा देदीप्य तुझा रथ सुटता
या कालपथाच्या अतूट उतरणीवरता ॥
नक्षत्रकणांचा उठे धुराळा वरता ।
युगक्रोश दूरी । मागुती । युगक्रोश दुरी ॥
महाराज, आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ?

जगन्नाथाच्या रथोत्सवाएवढी एक कविता देखील सावरकरांच्या कल्पकतेची साक्ष देण्यास पुरी आहे.

### कमला

सावरकरांनी अंदमानात जीं दीर्घ काव्यें लिहिलीं त्यांत कमला आणि विरहोच्छ्वास हीं दोन प्रमुख आहेत. या काव्यातील कथानकाचा काळ पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचा आहे. पहिल्या काव्यात काव्यनायक मुकुंद आणि काव्यनायिका कमला ह्यांच्या विवाहाचें,

मधुर चेष्टितांचें आणि मधुचंद्राच्या यामिनीचें सुंदर वर्णन आहे, तर दुसऱ्यात मुकुंदाचा मित्र मुकुल याच्या विरहाचे निःश्वास आहेत. दोन्ही काव्यें शृंगारिक आहेत. पहिलें काव्य संभोग शृंगाराचें तर दुसरें विप्रलंभ शृंगाराचें आहे. हीं दोन्ही काव्यें शृंगारिक असलीं तरी कवीने शिष्टसंमत मर्यादांचा अतिक्रम किंवा अतिरेक कोठेही केलेला नाही. कमला काव्याचा आरंभ कमालीचा कोमल असून फुलबागेचें वर्णन पराकाष्ठेचें सुंदर आणि सरस झालें आहे. विशेषतः भिन्न भिन्न फुलांवर त्यांनी ज्या उत्प्रेक्षा केल्या आहेत त्या फारच कल्पनारम्य आहेत.

शुभ्रशीतल ज्योत्स्नेच्या अमृततुषारांत सुस्नात झालेल्या शृंगारप्रिय फुलबागेवरील रूपक मत्स्यगंधा आणि पराशर यांच्या कथेच्या संदर्भात किती सूचक आणि मोहक झालें आहे तें पहा ! सावरकर म्हणतात :

नौकेंत कौमुदीच्या ही रतली कितिदा तरी
बाग योजन-गंधा त्यां वनदेव-पराशरी ॥

सूर्यफुलावरील उत्प्रेक्षा तर फारच बहारीची झाली आहे. सूर्याला शंकराचा तृतीय नेत्र समजून भ्यालेल्या मदनाने सूर्यफुलाला सूर्यावर देखरेख ठेवणारा गुप्तचरच केला आहे अशी कल्पना करून कवि सूर्यफुलाला म्हणतो :

तरीच तूं सदा डोळा ठेवितोस रवीवरी ।
अनंग तरिची दंगा भारी रात्रींतूनी करी ॥

हीं रूपकें आणि या उत्प्रेक्षा प्रेमाच्या प्रांतांतल्या असल्या तरी त्यांना मधून मधून पराक्रमाची झालर लावली आहे. निशिगंधाबद्दल कवि म्हणतो --

फूल ह्या निशिगंधाचें, हें अधीरवितें हृदें
कामसेनापुरोगामी रौप्यशृंगचि काय तें !

संस्कृत साहित्यातील कोणतीही अभिजात ललित कलाकृति लाजेने गोरीमोरी होईल, इतकें हें काव्य सुंदर आणि मधुर झालें आहे. कमलेच्या कोमलतेचें हें अतिशयोक्त वर्णन पहा :

पदाघातहि दे जीचा अशोकासि विशोकता ।
गालची ललनेचा त्या असा कोमल लागता ॥

यावी वज्रासही वाचा ! हीं तों काय लताफुलें ।
असें मंजु वदावी कीं भासे बुलबुल बोलले ॥

सावरकरांनी मुकुंद आणि कमला यांच्या प्रणयाचें चित्र फारच छान रंगविलें आहे.

आला ! आला तिच्या पार्श्वी! येताचि परि सन्मुखी ।
नीट आला तसा गेला शब्दही निघता न की ॥

किंवा या पंक्ति पहा—

उठे वरी, बघे खालीं, रंगे गाल, सुई गळे ।
सुमासम गमे काही हृदयीं निज बोचलें ॥

पहिल्या चुंबनाचा हा काव्यपूर्ण देखावा पहा. नायिका कमला कुंजात एकटी असते, तोंच मुकुंद मागून येतो आणि मग ......

चोरटया कटिला गुंफी कांपता कर तो झणी ।
लाजऱ्या लागती गाला ओठ लाजत त्याहुनी ॥
साचीकृताननां लज्जाचित्र हृद्य अशा तई ।
प्रियेच्या पहिल्याची तो चुंबनास युवा पिई ॥

चोरट्या, कांपता, गुंफी या तीन शब्दांत प्राण फुंकून सावरकरांनी पहिल्या चुंबनाचें हें चित्र सजीव आणि बोलकें केलें आहे. पुन्हा ते म्हणतात :

प्रियेच्या पहिल्याची हे लज्जाचंचल चुंबना ।
कोण प्राणी जगीं कीं जो विसरेल तुझ्या क्षणा ! ॥

तुझ्यात दिव्य जी चोरी, गार जो चटकाहि की ।
त्वरा थांबविती, सक्ती इष्ट, संमति जी मुकी ॥

चुंबना पहिल्या दे ती सुख मादकता जशी ।
प्रियाननार्पिता मद्यामाजिही न पुन्हा तशी ॥

सावरकरांनी पहिल्या चुंबनावर हें जें रसाळ भाष्य केलें आहे, तें तर कालिदास आणि शेक्सपियर यांच्या प्रतिभांशी स्पर्धा करील असें आहे.

## गोमन्तक

पुढें इ. स. १९२१–२२ मध्ये रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत सावरकरांनी 'गोमंतक' हें काव्य लिहिलें. गेलीं चारशे वर्षें पोर्तुगीज शासनाधिकाऱ्यांनी हिंदू प्रजेवर जे अत्याचार केले, त्यांचें वर्णन सावरकरांनी या काव्यात केलें आहे. या महाकाव्यात सावरकरांनी हिंदूंच्या ठिकाणी असलेला अतिरिक्त निवृत्तिवाद, प्राचीन परंपराप्रियता, संकुचित दृष्टिकोन आणि भीरु वृत्ति यांवर पदोपदीं सणसणीत कोरडे ओढले आहेत. एके ठिकाणी तर त्यांनी स्पष्टच प्रश्न विचारला आहे की, " देवही दुबळयांचे असतील किती बळी " । आधुनिक मराठी काव्यात सावरकराची महाकाव्यें म्हणजे खणखणीत वाजणारीं कलदार रुपयांचीं नाणींच होत !

## जातिबहिष्कृततेचा शाप

जातिबहिष्कृत माणसाला त्याच्याच रक्तमांसाचे बांधव कसे हुसकून देतात यासंबंधीचे विषादपूर्ण चित्र सावरकरांनीं एका कवितेत रेखाटलें आहे. तें असें :

क्रूर कुण्या श्वापदांसि पाहुनी जसें ।
आरोळ्या उठवित जन देति हुसकुनी ।
तेंचि, मुला, आम्हांसी हाय आमचे ।
प्रियजनची देती हुसकूनि सर्वथा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९८८९

सृष्टीच्या मुळाशी असणाऱ्या गूढ शक्तीच्या स्वरूपात हरीचें संरक्षक आणि हरीचें संहारक अशीं दोन्ही सामर्थ्यें असतात. एका वाघिणीने मस्तवाल रेडयाला मारून त्याचें रक्त घटाघटा प्राशन केलें व रक्ताळलेल्या जिभेने मग स्वतःच्या छाव्याला चाटलें तें उदाहरण देऊन कवि सावरकर म्हणतात :

करुणाची क्रूरतेस दूध पाजिते···
करुणेच्या साहाणेवरति धार या
क्रौर्याची पाजळली जातसे अशी
ही व्याघ्री हिंस्रनखरदंतभीषणा
आणि दयादुग्धस्रववत्सलस्तना
प्रकृतीची प्रतिमाची ! एक चित्रची !

सावरकरांच्या काव्याची भाषा कमावलेली आणि कसलेली आहे. तिच्यात प्रकाश आणि प्रवाह आहे. वर्णमाधुर्य, पदलालित्य, रचनामार्दवाकडे त्यांत कमी लक्ष असेल. सावरकर भाषाशुद्धीचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे मराठीतील क्रियापदांचें दारिद्र्य दूर करण्यासाठी

बद्धपरिकर झालेल्या त्यांच्या लेखणीतून रचना थोडी ताठर झाली आहे; परंतु या खडकावर बुद्धीचा घाव घातला तर आतील निर्मळ जीवनाचें नि विचारांचें दर्शनच त्यात घडेल.

बंगाली सारस्वताला रवीन्द्रनाथ ठाकूर यांचा अभिमान आहे. सावरकर हे साहित्य आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत सारख्याच तेजाने तळपले. इतर देशी भाषांत मायभूमीच्या अभिमानाचीं गीतें नाहीत असें नाही, पण त्यांत केवळ कोमल,कमनीय कल्पना आहेत. प्रत्यक्ष अनुभवाचे रसरशीत अंगार केवळ सावरकरांच्या कवितेत आहेत. आणि म्हणून ती कविता मराठीला अभिमानास्पद आहे. म्हणून मराठीने इतर भाषांबरोबर या क्षेत्रातही मान ताठ ठेवली तर तें योग्यच ठरेल.

सावरकरांची काव्यप्रतिभा अनंताचा शोध घेते आणि अगम्याला आकळू पाहते. कधी ती तत्त्वचिंतनात गढून जाते तर कधी तिला प्रसन्न प्रणयाचा उन्माद चढतो. कधी ती निसर्गाभिमुख होऊन सागराच्या खळखळीत जीवाची तळमळ ओकते तर कधी शस्त्रसज्ज वीरांगनेच्या भूमिकेत उभी राहते आणि शौर्याला, स्वाभिमानाला आवाहन करते. ती गोठलेलें रक्त सळसळवू पाहते. सामर्थ्याचा उद्घोष करते, कारण जाज्वल्य राष्ट्राभिमान आणि धर्माभिमान या पायावरच त्यांची काव्यप्रतिभा ठामपणे उभी आहे. म्हणूनच ती नवनवोन्मेषाने सतत झुंजणारी आणि उदंड आशेने उजळलेली आहे. म्हणूनच जीवाच्या तळमळीने ती म्हणत राहते :

अखिल हिंदु विजयध्वज हा उभवु या पुन्हा ।
ध्वज हा लढवु या पुन्हा ॥
या ध्वजासची त्या कालीं । रोविती पराक्रमशाली ।
रामचंद्र लंकेवरती । वधुनि रावणा ॥ १

करित जैं शिकंदर स्वारी । चंद्रगुप्त ग्रीका मारी ।
हिंदुकूशशिखरीं चढला ॥ जिंकुनी रणा ॥ २
उगवुनी सूड हिंदूंचा । मद मर्दुनी मुस्लिमांचा ।
शिवराय रायगडिं करिती । वीरपूजना ॥ ३
ध्वज हाचि धरुनि दिल्लीला । वीरबाहु भाऊ गेला ।
मुसल्मीन तक्ता फोडी । हाणुनी घणा ॥ ४
आंग्लदैत्य तोची आला । सिंधुतून घाली घाला ॥
बुडविला सिंधुतचि त्याला । करुनि कंदना ॥ ५

* * *

## ( ३ )

# मृत्युंजय सावरकर

दि.२४ डिसेंबर १९६० या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अनुयायांनी 'मृत्युंजय सावरकर दिन' साजरा केला. १९४३ मध्ये महाराष्ट्रातील त्यांच्या अनुयायांनी त्यांचा ६१ वा वाढदिवस साजरा करून त्यांना तीन लक्षांची थैली अर्पण केली. त्यादिवशी सावरकरांना जो आनंद झाला, त्यापेक्षाही मृत्युंजय दिनाचे वेळी सावरकर ज्यास्त आनंदी दिसले. इंग्रज सरकारने त्यांना २४ डिसेंबर १९१० या दिवशी एकामागून एक भोगावयाच्या २५-२५ वर्षांच्या काळेपाण्याच्या दोन शिक्षा दिल्या होत्या. एकंदर ५० वर्षे शिक्षा भोगावयाची होती. दुर्दैवाने ५० वर्षांची संपूर्ण शिक्षा भोगावी लागली असती व अंदमानाच्या अंधेरीत सावरकर जिवंत राहिले असते तर २४ डिसेंबर १९६० ला त्यांची सुटका व्हावयाची होती !

सावरकरांना दोन जन्मठेपींची शिक्षा झाली तेव्हा कित्येक इंग्रजांना देखील हळहळ वाटली. या माणसाच्या साऱ्या तारुण्याचा मोहोर या कैदेत असतानाच नष्ट होणार ह्या कल्पनेने एका अधिकाऱ्याला वाईट वाटलें. शिक्षेची बातमी सावरकरांना सांगताना तो म्हणाला, "कशीं काय ५० वर्षें तुम्ही तुरुंगात काढणार ?" हजरजबाबी सावरकरांनी त्याला उत्तर दिलें की "तुमचें राज्य तरी ५० वर्षें या देशावर राहणार आहे काय ?" दुर्दम्य आशावादाने आणि बेडरपणाने सावरकरांनी त्या वेळी उत्तर दिलें खरें; पण पुढे

दोन वेळा आत्महत्या करण्याचे विचार आपल्या मनात कसे आले आणि त्या वेळी आपण मनाला कसें समजावलें याचें वर्णन सावरकरांनी आपल्या 'जन्मठेप' या आत्मवृत्तात लिहून ठेवलें आहे. त्यावरून कल्पना येते की, तेथे किती छळ केला जात असे. बॉंब-पिस्तुलांचा उपयोग केल्यामुळे किती तरी बंगाली आणि पंजाबी तरुण जन्मठेप भोगण्याकरिता अंदमानाला धाडण्यात आले होते. त्यातल्या काही लोकांनी त्या कोलूला कंटाळून आत्महत्या केली. अपमान आणि छळ यांमुळे वेडे झालेल्यांचींही उदाहरणें तेथे होतीं. सर्वांत भयानक म्हणजे ती एकान्तवासातील अंधार कोठडीतील शिक्षा. थोरले बंधु बाबा सावरकरांचा तर इतका छळ झाला की त्यांना तेथे क्षयच लागला. इतर कैद्यांना अधिकाऱ्यांच्या विरुद्ध चिथावून देतात म्हणून सावरकर बंधूंवर तुरुंगाधिकाऱ्यांची कडक नजर होती. दोन्ही हातांत आणि दोन्ही पायांत बेडी तर होतीच, पण त्या दोन्ही बेड्यांना जोडणारी एक क्रास बेडी देखील सावरकर बंधूंना ठोकण्यात आली होती. जेवण अतिशय बेचव आणि वाईट असे. अन्नात कधी कधी घोणी सापडत. रोज तेलघाणी चालवून बैलासारखे राबून ठराविक पौंड तेल काढून द्यावें लागे. तें न झालें तर पठाण वार्डर फटके मारीत. रात्री खोली बंद करीत तेव्हा मलमूत्रविसर्जनास देखील सोडीत नसत. अशा वेळी कैदी भिंतीवर लघवी करीत. यावरून समजेल की तेथील जीवन म्हणजे त्या अक्षरशः नरकयातनाच होत्या. त्यातून सावरकर बंधु सजीव परत आले हेंच भाग्य! मोठे बंधु बाबा सावरकर इतके आजारी झाले की, डॉक्टरांच्या मंडळाने एकमताने तुरुंगाधिकाऱ्यांना सांगितलें की, "बाबा सावरकर आता जगणार नाहीत. ते केवळ ८–१० तासांचे सोबती आहेत." तेव्हा घाईघाईने बाबा सावरकरांना

१९२२ मध्ये त्यांच्या नातेवाईकांचे घरी आणून सोडण्यात आलें. ते तुरुंगात मेले अशी बातमी वर्तमानपत्रांत येऊन कोठेही क्षोभ होऊ नये म्हणून ही दक्षता त्या वेळच्या इंग्रज सरकारने घेतली होती.

ज्या तुरुंगात बाबा सावरकर होते, त्याच अंदमानच्या सेल्यूलर जेलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर होते. तेथील सर्व हाल त्यांच्याही वाट्यास आले होते. तरुण सावरकरांची प्रकृति प्रथम ठणठणीत होती. पण तुरुंगात दोन्ही सावरकर बंधूंना क्षयरोग जडला. १४ वर्षं भरल्यानंतर दोघेही बंधु घरी परत आले ते रोगग्रस्त होऊन!

मृत्यूच्या उंबरठ्यावर सावरकरांना अनेक वेळा उभें राहावें लागलें. जॅक्सन आणि सर कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वध झाले तेव्हा ब्रिटिश सरकार पिसाळल्यासारखें वागू लागलें. तरुणांच्या या उद्रेकाचे प्रेरक सावरकर आहेत, या संशयाने सरकार पछाडलें गेलें. स्वातंत्र्यवीर सावरकरांना इंग्लंडमध्ये अटक झाली. त्यांचा खटला हिंदुस्थानात चालवावा असें इंग्रज सरकारने ठरविलें.

'मोरिया' बोटीतून कैदी सावरकरांना मुंबईस आणण्यात येत होतें. त्या वेळी फ्रान्सच्या मार्सेल्स बंदराजवळील समुद्रात सावरकरांनी उडी टाकली. बोटीतील इंग्रज सैनिक त्यांना जखमी करण्याकरिता गोळी घालावयास टपले होते. त्यांचा पाठलाग करीत होते. मार्सेल्सच्या तटावर सावरकर चढले आणि पुन्हा हात घसरून पाण्यात पडले. बोटीच्या पोर्टहोलमधून अंग चिचोळें करून उडी टाकताना काच लागून दंडावर जखम झाली होती. खारें पाणी जखमेला लागून तें अतिशय झोंबत होतें, एकदा पाण्यात पडले तरी पुन्हा चढून सावरकरांनी मार्सेल्स बंदरात पाय ठेविला. फ्रेंच शिपायांनी लाच खाल्ली आणि सावरकर पुन्हा इंग्रजांचे बंदी झाले. मग वरील पिसाळलेल्या पोलीस रक्षक अधिकाऱ्यांनी सावरकरांना

किती मारझोड केली असेल याची कल्पनाच करावी. त्या दिवशीच सावरकर खरोखर मारले जावयाचे; पण मृत्यूच्या जबड्यात गेलेले सावरकर त्या वेळी वाचले पण कशाकरिता? तर मृत्यूच्या दाढेत ५० वर्षे राहण्याकरिता!! समुद्रात जलसमाधि मिळाली असती तर, पाठलाग करणाऱ्यांची गोळी लागली असती तर, सावरकर तेव्हाच मरणार होते. पकडून आणणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनी धारण केलेला क्रूर अवतार, बोटीवरील असह्य उष्मा, बोटीवरील छोट्याशा कोठडीतील डोक्याला लागणारी तापलेली ताडपत्री या सर्वांमुळे सावरकरांच्या मनात आत्महत्येचे विचार घोळू लागले. पण त्यांनी त्या विचारावर विजय मिळविला.

पन्नास वर्षांची काळेपाण्याची शिक्षा भोगण्यासाठी ते मद्रास बंदरात उभे असलेल्या 'महाराजा' बोटीवर चढले. 'माझी जन्मठेप' या आपल्या पुस्तकात ते म्हणतात :

"महाराजा बोटीवर जन्मठेप झालेल्या कैद्याने चढणें म्हणजे जीवंतपणी तिरडीवर बांधलें जाणेंच मानलें जात असे. कारण तिकडे गेलेल्या दहा हजारांतले दहा जण सुद्धा परत आलेले नव्हते. बोटीवर चढताना २०–२५ वर्षांचीं कोवळीं पोरें देखील ८०–९० वर्षांच्या म्हाताऱ्यासारखी तेजोहीन दिसू लागत. तिरडीवर असलेल्या प्रेताकडे ज्या भावनेने लोक पाहतात आणि म्हणतात 'हा आता कायमचा जगाला मुकला त्याच भावनेने सारे लोक माझ्याकडे पहात होते. तिरडीवरच्या प्रेताला त्या भावना मुळीच समजत नसतात. पण मला मात्र ह्यांची जाणीव होत होती व तेंच माझें मोठें दुःख होतें. इतर बंद्यांप्रमाणे धाय मोकलून रडूनही माझें मन मोकळें करणें मला जमत नव्हतें."

मृत्यूच्या जबड्यापेक्षाही भयंकर असलेल्या अंदमान कारागृहाचा तो दरवाजा उघडला गेला तेव्हा सावरकर मनाशी म्हणाले, "आता येथून माझें प्रेतच बाहेर येणार!" तुरुंगात त्यांना काथ्या कुटण्याचें काम देण्यात आलें. काथ्या कुटताना हात रक्तबंबाळ होत. तीव्र निराशा येई. त्या वेळी ते आपल्या मनाला म्हणत "वेड्या मना, निराश होऊन कसें चालेल! काथ्या कुटण्यात कठीण काय आहे? जग हें देखील जन्ममरणाचा एक काथ्याकूटच नाही का? हा काथ्या हसत हसतच आता तुला कुटला पाहिजे."

एकांतवासाची शिक्षा सावरकरांना मिळाली तेव्हा असेच ते मृत्यूच्या छायेत गेले होते. या शिक्षेत माणसाला वेड लागण्याचा दाट संभव असतो. अंदमानात महिनेन् महिने ही शिक्षा भोगून सावरकरांना वेड लागलें नाही हें त्यांचें मोठें भाग्य!

कोलू फिरविणें ही एक अती अमानुष शिक्षा होती. घाण्याला जुंपलेल्या सावरकरांचें चित्र पाहताना आजही डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागतात. त्या घाण्यात खोबरें टाकल्यानंतर तो फिरवायला इतका जड जात असे की, प्रारंभी अर्ध्या फेरीतच चक्कर येई आणि कैदी मटकन खाली बसे. लगेच पठाण वॉर्डराचे चाबूक त्याच्या पाठीवर ओढले जात. रात्री सगळें अंग दुखू लागे आणि सडकून ताप भरे. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा तो यमदूत कोलू हजर असायचा!

अशा भयानक परिस्थितीत माणसाच्या मनात आत्महत्येचे विचार न आले तरच नवल! त्यांचें एक मन म्हणे, "कर आत्महत्या आणि टाक संपवून एकदाचे हे कष्ट!" पण तितकेंच उसळून दुसरें मन त्यांना बजावी, "नको नको, राष्ट्रांच्या राष्ट्रें उदयाला आण-

ण्याचें सामर्थ्य ज्या शरीरात आहे त्याचा असा मातीच्या मोलाने नाश करू नको." मेरु पर्वताची निर्मिति समुद्रमंथनासाठी आहे, छोटयाशा कथलीतलें ताक घुसळण्यासाठी नव्हे !"

अंदमानात सावरकरांनी जेव्हा शुद्धीकरणाचें कार्य सुरू केलें, तेव्हा तेथील पठाण व मुसलमान वॉर्डरांनी सावरकर बंधूंना ठार मारण्याचा कट केला होता. बाबा सावरकरांचे वर हल्ला झालाच; परंतु त्यांचा तो कट फसला आणि सावरकर बंधु जिवंत राहिले.

रोज मृत्युशी झुंज घेत घेत कमावलेल्या शरीरसंपदेवर सन १९१८ पर्यंत सावरकर ताठपणे उभे होते. पण त्या वर्षी त्यांची प्रकृति एकदम ढासळली. कष्ट असह्य वाटू लागले. पुन्हा निराशेने त्यांना ग्रासलें. मन आत्महत्येकडे वळू लागलें. अशा स्थितीत त्यांचे धाकटे बंधु नारायणराव सावरकर यांनी त्यांची भेट घेतली. त्या वेळी त्यांनी म्हटलें "बाळ, आम्हां दोघा बंधूंच्याबद्दल शेवटची बातमी ऐकण्याची लौकरच तू तुझ्या मनाची तयारी ठेव. ही बहुधा शेवटची भेट आहे असें समज."

हे त्यांचे उद्‌गार भारतीयांच्या अंतःकरणाला भेदून गेले. लोकांनी त्यांच्या सुटकेचे प्रयत्न केले. दोघाही सावरकरबंधूंना हिंदुस्थानात आणण्यात आलें. अंदमानमधील तुरुंगाच्या दरवाजामधून बाहेर पडताना स्वातंत्र्यवीर सावरकर वडील बंधूंना म्हणाले, "हा एवढासा उंबरठा जीवनमरणाची सीमारेषा आहे. तो ओलांडून मृत्यूच्या सीमेतून जीवनाच्या सीमेत तर पाऊल टाकलें आहे. आता पुढेंच पुढे !"

अंदमानात शिरलेला वाघ मतान्तर किंवा पक्षान्तर होऊन बाहेर पडलेला नव्हता. म्हणून सावरकरांना अंदमानातून भारतात

आणल्यावर त्यांना रत्नागिरीच्या तुरुंगात व नंतर रत्नागिरीस स्थानबद्ध करण्यात आलें. तेरा वर्षें तेथे स्थानबद्ध राहिलेला हा वाघ सन १९३७ मध्ये मुक्त झाला. प्रकृति बरी नसताना देखील सावरकरांनी सर्व प्रांतांत झंजावाती दौरे काढून देश जागृत केला. सन १९४५ मध्ये सावरकरांना हृदयविकाराचा झटका आला. तेव्हापासून त्यांचे दौरे बंद झाले. लेखन आणि तरुणांना मार्गदर्शन एवढींच कामें आता उरलीं होतीं. 'सहा सोनेरी पानें' हा त्यांचा इतिहासाचा ग्रंथ नंतरच लिहिला गेला. शुद्धि आणि परदेशी मिशनऱ्यांना विरोध या कार्याकडे ते जास्त लक्ष घालू लागले. सन १९६० हें वर्ष उजाडलें. पन्नास वर्षांची अंदमानची शिक्षा तेव्हा संपणार होती. म्हणून त्या वेळी लोकांनी 'मृत्युंजय सावरकर' दिन साजरा केला.

फेब्रुवारी १९६६ मध्ये सावरकरांना आपलें जीवित कार्य संपलें असें वाटलें. पाकिस्तान व चीन यांच्यापासून देशाचें रक्षण केलें पाहिजे ही भावना लोकांत निर्माण झाली. "लक्ष लक्ष हिंदुजाति चालली रणाला" हें दृश्य त्यांनी पाहिलें. सिंधु मुक्त करण्यास्तव भारतीय संघराज्याच्या सेना लाहोरपाशी थडकल्याची वार्ता त्यांनी ऐकली. ते म्हणाले "आम्ही जातो आमुच्या गावां, आमचा राम राम घ्यावा." एकवीस दिवस प्रायोपवेशन करून शेवटी

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किञ्चित् ।
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य सम्पन्नम् ॥

असें म्हणून योगी सावरकरांनी स्वात्मार्पण करून समर्थ रामदासां-प्रमाणे आपलें शरीर पंचत्वात विलीन केलें.

* * *

( ४ )

# क्रांतिकारक सावरकर

'क्रांतिकारकांचे मुकुटमणि' म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांचें नांव इतिहासाच्या पानावर अंकित झालेलें आहे. क्रांति म्हणजे परिवर्तन. प्रगतीकरिता होणाऱ्या त्या परिवर्तनाला अनावर वेग असतो. क्रांति जीवनाच्या सर्व आंगोपांगांना स्पर्श करीत असते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या संबंधात क्रांतीचीं हीं लक्षणें ध्यानात ठेवावयास ह्वीत.

समाजात परिवर्तन घडवून आणावयासाठी क्रांतिकारकाला जुन्या पिढीविरुद्ध आणि प्रस्थापित राज्ययंत्रणेविरुद्ध लढा करावा लागतो. थोडक्यात सांगावयाचें म्हणजे अशा व्यक्तीला आजोबा आणि राजोबा ह्या दोघांच्याही अज्ञानाशी झगडावें लागतें.

भारतातील अनेक जुन्या नव्या देशभक्तांनी आणि सशस्त्र क्रांतिकारकांनी सावरकरांपासून स्फूर्ति घेतली आहे. सरदार भगतसिंग, कन्हयालाल दत्त आणि जपानमधील प्रख्यात भारतीय क्रांतिकारक श्री. रासबिहारी बोस यांचीं नांवें या संदर्भात घेता येतील. कॉंग्रेसमधील इंदुलाल याज्ञिक, मुंबईचे माजी मुख्यमंत्री कै. बाळासाहेब खेर हे देखील स्वतःबद्दल सांगताना म्हणत की त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांपासून स्फूर्ति घेतली. हुतात्मा मदनलाल धिंग्रा व लाला हरदयाळ, बॅ. सरदारसिंह राणा हे तर सावरकरांचें सहकारीचे होते. लंडनमधील काळात सेनापति बापट

हेही सावरकराचे एक विश्वासू सहकारी होते. श्री. राजगोपालाचार्य यांनीही सावरकरांपासून स्फूर्ति घेतल्याचें मान्य केलें आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे सशस्त्र प्रतिकाराचे व क्रांतीचे समर्थक होते. इटलीचा स्वातंत्र्यवीर मॅझिनी याचे विचार सावरकरांनी महाराष्ट्राच्या तरुणांपुढे ठेविले. गनिमी काव्याचीं पथकें कशीं संघटित करावी याची माहिती सावरकरांनी मॅझिनीच्या शब्दांतच आपल्या मॅझिनी या पुस्तकात ग्रथित केली आहे. त्या पुस्तकाची प्रस्तावना सावरकरांवर प्रेम करणाऱ्या शेकडो तरुणांनी १९०८ ते १९१५ या काळात पाठ केली. इंग्रज सरकारने या पुस्तकावर बंदी घातली होती. पण स्वातंत्र्यप्रिय तरुणांच्या मनावर त्या मॅझिनी पुस्तकाच्या प्रस्तावनेने जणू मोहिनीच घातली होती.

'सन १८५७ चें स्वातंत्र्यसमर' हें पुस्तक लिहून सावरकरांनी स्वातंत्र्य चळवळीची समरगीताच भारतीय तरुणांपुढे ठेविली. त्या पुस्तकाने एक मोठी वैचारिक क्रांति घडून आली. इतिहास परक्यांनी लिहिला असला तरी त्यातील प्रमेयें व सत्यें कशीं तपासून पहावीं लागतात, हें स्वातंत्र्यवीर सावरकरांनी नव्या पिढीला शिकविलें. ज्यास इंग्रज लोक बंड म्हणतात तें बंड नसून तें स्वातंत्र्ययुद्ध होतें हें सांगून सावरकरांनी जुन्या विचारांना धक्का दिला. तो आश्चर्यकारकपणे परिणामकारक ठरला. स्वदेशात त्यामुळे स्वाभिमानाची ज्योत पेटली. परराष्ट्रात त्यामुळे इंग्रजविरोधकांना कळलें कीं भारतात इंग्रजांविरुद्ध असंतोष आहे.

नव्या पिढीच्या विचारांना, आचारांना आणि उच्चारांना नवें वळण लावणें हें क्रांतिकारकांचें उद्दिष्ट असतें. इंग्रजांची राज्यपद्धति, न्याय आणि कायदा यांवर आधारलेली आहे अशी जुन्या लोकांची समजूत होती. अर्ज केला की इंग्रज त्याचा विचार करतील

असें त्यांना वाटे. लोकमान्य टिळकांनी पुढचें पाऊल टाकलें आणि सांगितलें की, " सरकारचें नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही, म्हणून सामुदायिक चळवळ केली पाहिजे." स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एक पाऊल आणखी पुढे टाकण्याचें आवाहन केलें ते म्हणाले : "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ? " म्हणून इंग्रजांना रणांगणावर तोंड देण्याकरिता "शस्त्रधारी बना." "इंग्रजांच्या शत्रूंची मदत घ्या. परदेशी इंग्रजी कापडाची होळी करा. इंग्रजांच्या सैन्यात काम करणाऱ्या सैनिकांतच असंतोष निर्माण करा."

हा हेतु अधिक स्पष्ट करण्याकरिता '१८५७ चें स्वातंत्र्यसमर' हें पुस्तक त्यांनी लिहिलें. तें क्रांतिकारक तरुणांना मार्ग-दर्शक ठरलें. सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेला या पुस्त-काच्या प्रती काढून वाटल्या. या पुस्तकात दिलेली 'चलो दिल्ली' ही घोषणा सुभाष सैनिकांनी उचललेली होती. भारतातील काही लोकांना वाटे की, भारतातले फक्त इंग्रज अधिकारी विरुद्ध वाग-तात, पण इंग्लंडमधील इंग्रज मात्र लोकशाही वातावरणा-मुळे अधिक उदार असतील. पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांनाही प्रथम असेंच वाटत असे; म्हणून न्याय मिळविण्याकरिता ते इंग्लंडला गेले पण तेथे त्यांची निराशा झाली. परदेशात शिकण्या-करिता आणि मग भारतात येऊन स्वदेशाची सेवा करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या जनसेवकांकरिता त्यांनी पांच शिष्यवृत्त्या ठेविल्या होत्या; पण पं. श्यामजी कृष्णवर्मा यांचे विचार जहाल आहेत केवळ या कारणास्तव त्या शिष्यवृत्त्या स्वीकृत करण्याचा ठराव भार-तीय कॉंग्रेसने नाकारला. नंतरच्या काळात दादाभाई नौरोजींनी

असाच सनदशीर प्रयत्न इंग्लंडमध्ये केला. ते इंग्लंडच्या पार्लमेंटच्या निवडणुकीस उभे राहून निवडून आले. पण इंग्लंडच्या पार्लमेंटने किंवा पत्रकारांनी त्यांना उचलून धरलें नाही. सावरकरांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात साताऱ्च्या गादीचे वकील रंगो बापूजी यांची माहिती देऊन सांगितलें की, इंग्रज सरळपणे ऐकणार नाही. त्यांना घालवूनच दिलें पाहिजे. 'स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय' ही त्यांच्या 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेची घोषणा होती. चापेकर हें त्यांचें आराध्य दैवत होतें.

काँग्रेसने स्वातंत्र्याचा ठराव १९२९ मध्ये केला. पण सावरकरांच्या अभिनव भारताच्या संस्थेने 'स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय' ही घोषणा १९०६ मध्येच केली होती हें ध्यानात ठेविलें पाहिजे. क्रांतिकारक तरुण नेहमीच काळाच्या पुढे असतात. काँग्रेसचा परराष्ट्र विभाग १९२९ नंतर संघटित केला गेला होता. डॉ. राम मनोहर लोहिया हे त्या विभागाचे प्रमुख कार्यकर्ते होते. ते सावरकरांना मान देत. डॉ. जयकर म्हणत "स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय राजकारणाची फिर्याद जागतिक हेग न्यायालयापुढे बॅरिस्टर विनायकराव सावरकरांनी प्रथम मांडली. मार्सेलिसच्या समुद्रात उडी टाकून फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या घटनात्मक परराष्ट्रीय संबंधात त्यांनी खळबळ निर्माण केली आणि त्याच वेळी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जगाच्या वेशीसमोर टांगला.

हिंदुस्थानात सशस्त्र क्रांति घडवून आणावी असें सावरकरांचें, त्यांनी देवीपुढे शपथ घेतली तेव्हापासून, मत होतें. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविण्याकरिता सशस्त्र क्रांति घडवून आणणें हेंच एकमेव साधन आहे अशी त्यांची धारणा होती. त्या दृष्टीनेच त्यांनी

अभिनव भारत या संघटनेची स्थापना केली व गुप्तपणे सशस्त्र क्रांतीची चळवळ सुरू केली. क्रांतीची चळवळ ही दाबून दबणारी नाही. तिला जितकें दाबावें तितकी ती वर उसळते. जनमनाकडे नेणारी क्रांतीची चळवळ ही पवित्र वृत्ति आहे असें ते समजत असत. क्रांतीचा हा प्रवाह म्हणजे जिवंतपणाचें चिन्ह असून त्या क्रांतीचा प्रवाह सावरकर इंग्लंडमध्ये गेल्यानंतर वेगाने सुरू झाला. हिंदुस्थानाबाहेर सबंध आशियात विसाव्या शतकाच्या आरंभी राज्यक्रांतीचें चक्र सुरु झालें होतें. त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे आशियातील भातखाऊ बुटक्या जपानी राष्ट्राने मांसखाऊ अगडबंब रशियाला चीत केलें. जपानातून निघून हा प्रवाह चीनमध्ये शिरला. यामुळे चीनमध्ये शिक्षण, राजकारण, व स्वदेशाभिमान यांचा प्रसार अत्यंत त्वरेने सुरू झाला. सुदैवाने आशिया खंडातील परतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र करण्याची शक्ति धारण करणारा असा एक राज्यक्रांतीचा प्रचंड प्रवाह सुरू झाल्यामुळे परतंत्र हिंदुस्थानमध्येही जागृति सुरू झाली. अनंत यातनांनी बधिर झालेल्या हिंदुस्थान देशात चेतना उत्पन्न झाली व स्वातंत्र्यासाठी सामर्थ्य संपादन करावयाचे देशभक्तांचे यत्न सुरू झाले. असे स्वातंत्र्यगामी प्रयत्न लोकांना आरंभी भयभीत करीत असले तरी हलके हलके ते लोकांच्या पचनी पडू लागले. त्या वेळी संपूर्ण स्वातंत्र्य हें रात्री सांगावें लागत होतें. काही कालानंतर दादाभाई नौरोजी ह्यांनी राष्ट्रीय सभेचें ध्येय म्हणून स्वातंत्र्याचा उच्चार केला. त्यामुळे हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीस विशेष जोर प्राप्त झाला. संपूर्ण स्वातंत्र्य हें राष्ट्रीय सभेने हिंदुस्थानचें ध्येय ठरविलें खरें, परंतु तें प्राप्त करून घेण्यास राष्ट्रीय सभेची

त्या वेळचीं साधनें म्हणजे अर्ज, विनंत्या करणें, हीं पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने उपयोगी पडतील असें त्या वेळच्या समाजाला वाटलें नाही.

त्यानंतर सुरू झालेल्या सत्याग्रहाच्या चळवळीमुळेही पूर्णस्वातंत्र्य मिळेल अशी आशा जनतेला वाटेना. त्यामुळे तरुणांचें मन सशस्त्र क्रांतीकडे साहजिकच आकर्षित झालें. सावरकरांनी १८५७ च्या क्रांतियुद्धाचा इंग्लंडमध्ये अर्धशत सांवत्सरिक उत्सव केल्यामुळे ५७ च्या स्वातंत्र्य समराची स्मृति उजळून निघाली. सावरकरांनी इंग्लंडमध्ये सुरू केलेल्या अभिनव भारताच्या शाखेतील होतकरू तरुणांनी सशस्त्र क्रांतीचा प्रचार देशोदेशी सुरू केला. सेनापति बापट यांनी रशियन तरुणांकडून बॉंब करण्याची विद्या हस्तगत केली. सावरकरांच्या प्रेरणेने ते इंग्लंड सोडून हिंदुस्थानात आले. ती विद्या त्यांनी महाराष्ट्रातील व बंगालमधील तरुणांना शिकविली. सावरकरांनीही मोठ्या युक्तीनें हिंदुस्थानात पिस्तुलें पाठविण्याची योजना करून ती कौशल्याने उपयोगात आणली. प्रत्यक्ष लंडनमध्ये हुतात्मा मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली व लाल काका यांचा वध केला व क्रांतिकारक काय करू शकतात व देशभक्तीच्या अत्यंत प्रज्वलित भावनेने स्वार्थाचा त्याग करून फासावर जाण्यासही ते कसे तयार असतात हें त्यांनी जगाला दाखविलें. बंगालमध्ये हुतात्मा खुदीराम बोस याने एका युरोपियन मॅजिस्ट्रेटला मारण्यासाठी बॉंबस्फोट केला. तसेच नाशिक येथील कलेक्टर जॅक्सन याला हुतात्मा अनंत कान्हेरे यांनी सावरकरांनी इंग्लंडमधून पाठविलेल्या एका पिस्तुलाने ठार केलें. असे प्रसंग एकापाठोपाठ एक असे इतक्या त्वरेने झाले की, त्या वेळेच्या ब्रिटिश सरकारला हिंदु-

स्थानातील असंतोष घालविण्याकरिता राज्यव्यवस्थेत काही तरी सुधारणा करणें अवश्य आहे असें वाटू लागलें. सशस्त्र क्रांतिकारकांच्या चळवळीचा व प्रयत्नांचा असा प्रत्यक्ष परिणाम त्या वेळच्या लोकांना जाणवला. अर्जविनंत्या व ठराव यांमुळे जें कार्य कित्येक वर्षांतही होऊ शकलें नाही तें कार्य क्रांतिकारकांच्या आत्मार्पणाने आणि स्वार्थत्यागाने थोड्या दिवसांत होऊ शकलें हें लोकांच्या अनुभवास आलें. हा सशस्त्र क्रांतिकारकांच्या प्रयत्नांचा फार मोठा विजय होता असें म्हणणें भाग आहे. ह्या सर्व प्रयत्नांचे सूत्रचालकत्व सावरकर यांच्याकडेच होतें.

जुलै १९०६ मध्ये सावरकर हे हिंदुस्थानातून इंग्लंडमध्ये गेले. तेथे गेल्यानंतर काही दिवसांत त्यांनी मॅझिनीचें चरित्र व त्याचें आत्मवृत्त आणि समग्र लेख यांचें इंग्रजीत झालेलें भाषांतर वाचलें. सावरकर जसजसे ते ग्रंथ वाचीत गेले तसतसें त्यांना आढळून आलें की, हिंदुस्थान सोडण्यापूर्वी गुप्तसंस्थांतून ते जें क्रांतिकारी मार्गदर्शन आपल्या सहकाऱ्यांना करीत होते, त्यात आणि मॅझिनीने तरुणपिढीसाठी अगदी पहिल्यापासून जें मार्गदर्शन केलें त्यात आश्चर्यकारक साम्य आहे. आयुष्य हें चैन नसून आयुष्य हें कर्तव्य आहे. कुटुंबाच्या, समाजाच्या व मनुष्यजातीच्या सर्व प्रकारच्या उन्नतीचें मुख्य साधन जें राष्ट्रीय स्वातंत्र्य तें संपादन करणें व त्याचें संरक्षण करणें हें क्रांतिकारकांचें प्रथम कर्तव्य होय. पारतंत्र्य असलेल्या राष्ट्रांना सत्यप्रतिपादनाची जुलमाने बंदी झालेली असते. तेथे गुप्त मंडळ्या ह्याच सत्यप्रतिपादनाचा एकमेव मार्ग असतो. लोकजागृति करणें, स्वराष्ट्रनिष्ठा उत्पन्न करणें, हें लहानसहान कार्य नसून हें देवाचें कार्य आहे ही धारणा प्रत्येक क्रांति-

कारकाची असली पाहिजे. ब्रिटिशसत्तेनेच उभारलेल्या लाखो स्वदेशी सैनिकांना गुप्तपणे क्रांतिप्रवण करून शक्य तें स्थानिक व वैयक्तिक सैनिकी 'उत्थान' 'सैनिकी उठाव' हे घडवून आणले पाहिजेत, परराष्ट्रीय क्षेत्रात ब्रिटनचें कोणाशी युद्ध जुंपताच तिकडे जाऊन त्यांना मिळून ब्रिटिशविरोधी विद्रोही उठाव, एक उठाव फसला तरी संधि साधताच पुन्हा दुसरा उठाव करून हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेला शस्त्रास्त्रांच्या घणाखाली यथाशक्ति खिळखिळी करून टाकलें पाहिजे. अशा उठावांनी लढविल्या जाणाऱ्या क्रांतियुद्धाचा जो कार्यक्रम सावरकर अभिनव भारतीय क्रांतिकारकांपुढे ठेवीत होते तोच कार्यक्रम थोडयाफार फरकाने इटलीमध्ये मॅझिनीने आपल्या उपदेशाच्या सूत्रांतून केलेला त्यांना आढळला. म्हणूनच सावरकरांनी मॅझिनीचें आत्मचरित्र व राजकारण यांचें मराठीत भाषांतर करण्याचें ठरविलें व त्या भाषांतरास त्यांनी आपली विस्तृत प्रस्तावनाही स्वतंत्रपणे लिहून जोडली.

त्या पुस्तकाचें मुद्रण करणें फार कठीण गेलें. अखेर १७ डिसेंबर १९०६ या दिनांकाला तें 'जगद्धितेच्छु' या छापखान्यात छापावयास दिलें. तें पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वी जनतेत त्याचा पुष्कळ प्रसार झाला होता. लोकांमध्ये त्याच्याबद्दल इतकी उत्कंठा होती की त्या पुस्तकाच्या दोन हजार प्रतींची प्रथमावृति जुलै १९०७ च्या एका महिन्यातच संपून गेली. त्या पुस्तकाच्या प्रसिद्धीने क्रांतिकारकांच्या चळवळीला उत्तेजन मिळालें व त्यामुळे क्रांतीचा मार्ग त्यांना स्पष्ट दिसू लागला.

सन १९०६ सालातच सावरकरांच्या इंग्लंडमधील वरील क्रांतिकार्यास सुरवात झाली. इंग्लंडमध्ये जाताच त्यांनी अभिनव

भारताची गुप्त क्रांतिकारक संस्था म्हणून स्थापना केली. इंग्लंड-मधील त्या वेळेच्या परिस्थितीप्रमाणे तेथे शिकण्यासाठी आलेल्या तरुणांच्या मनांत सशस्त्र क्रांतीची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व्यक्तिगत संभाषणें, सार्वजनिक भाषणें, ग्रंथलेखन असा त्यांचा प्रचार चालू असे. त्या वेळच्या बाँब तयार करण्याच्या कृति, अत्या-धुनिक व इतर अवश्य त्या शस्त्रास्त्रांचें शिक्षण, संग्रह व प्रसार इत्यादि मार्गांनी सशस्त्र क्रांतीसाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे उपयोगी पडणाऱ्या कार्याला त्यांनी प्रारंभ केला. त्यातही इंग्रजांच्या सैन्यदलांत जे भारतीय सैनिक होते. त्यांच्यांत राज्यक्रांतीचा प्रसार करण्यासाठी शक्य तो खटपट करण्यावर त्यांनी मुख्यतः भर दिला होता.

जीं कामें प्रकटपणें करणें अवश्य होतें तीं कामें करण्यासाठी सावरकरांनी फ्री इंडिया सोसायटी या नांवाची एक प्रकट संस्था स्थापन केली होती. त्या संस्थेच्या वतीने प्रत्येक आठवड्याला तेथील भारतीयांची सभा भरविली जात असे. त्या सभेत प्रत्येक आठवड्याला साधारणतः सावरकरांचें एक तरी व्याख्यान होत असे आणि त्यांत ते मॅझिनीचें जीवितकार्य, व सध्या हिंदुस्थान ब्रिटिशांच्या तावडीतून स्वतंत्र करण्यासाठी आपणांला काय करता येईल, तें श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत असत.

त्याच सुमारास सशस्त्र क्रांतीचें प्रत्यक्ष वर्णन करणारें १८५७ चें स्वातंत्र्य समराचें पुस्तक सावरकरांनी इंडिया ऑफिसचे ग्रंथसंग्रहा-लयात संशोधन करून मराठीत लिहिलें. त्या ग्रंथाचें वाचन व लेखन चालू असताना त्यांतील माहिती ते फ्री इंडिया सोसायटीच्या प्रत्येक आठवड्यास भरणाऱ्या सभेतून सांगत. त्यामुळे ब्रिटिशां-

विरुद्ध क्रांतीच्या चळवळीस उत्तेजन देणाऱ्या त्या ग्रंथाबद्दल फार गवगवा होऊन तें छापून प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्या ग्रंथाला इंग्लंडमध्ये व हिंदुस्थानमध्ये बंदी करण्याचा हुकूम काढण्यात आला. परंतु क्रांतिकारकांच्या दीर्घ प्रयत्नामुळे त्या ग्रंथाच्या छपाईचें काम हॉलंडमध्ये करण्याची व्यवस्था करण्यात आली, व बाहेर असें पसरविण्यात आलें की, त्याचें छपाईचें काम फ्रान्समध्ये होत आहे. त्यामुळे ब्रिटिश सरकार अंधारात राहिलें, व पुस्तकाची प्रसिद्धि मात्र खूप झाली.

क्रांतिकारकांना शस्त्रविद्येचा अभ्यास करावा लागतो. स्वतः सावरकरांनी बंदुकीने व पिस्तुलाने नेम मारण्याची कला हस्तगत केली. पसतीस पिस्तुलें फ्रान्समध्ये खरेदी करून इंग्रजी कोशाच्या पुस्तकातून तीं लपवून त्यांनी मुंबईस पाठविली. त्या पिस्तुलांनी आपलें काम पुढे बजावलें. सावरकरांचे सहकारी सेनापति बापट यांनी बॉंब तयार करण्याची कला रशियन तरुणांपासून संपादन केली. बापट बंगालमध्ये गेल्यावर त्यांनी तेथे ती विद्या बंगाली तरुणांना शिकविली. मुंबईत वसई भागात अभिनव भारताच्या सदस्यांनी बॉंबचा गुप्त कारखानाच काढला.

इंग्लंडमध्ये सर्व प्रांतांचे तरुण एकत्र येतात म्हणून विद्यार्थिदशेतल्या तरुणांना सावरकरांनी अभिनव भारताचे सदस्य केले. ‘शत्रूच्या शिबिरांत’ हें आत्मचरित्रात्मक पुस्तक सावरकरांनी लिहिलें आहे. त्या पुस्तकात सावरकरांनी लंडनमध्ये आपण कसकसें काम केलें हें सांगितलें आहे. लंडनला जाण्यासाठी सावरकरांना प्रशस्तिपत्रक लोकमान्य टिळकांनी दिलें होतें. त्यांनी पत्र लिहून श्यामजी कृष्णवर्मांना सांगितलें की “हा तरुण फार धाडसी आणि चतुर आहे. त्याचा फार उपयोग होईल ! ”

प्रत्येक देशाच्या क्रांतिकारक चळवळीत असें दिसतें की, एका पिढीच्या अनुभवाचा लाभ दुसऱ्या पिढीला मिळतो. वासुदेव बळवंत फडके यांच्यापासून लोकमान्यांच्या पिढीने स्फूर्ति घेतली. लोकमान्यांच्या विचारांतून चापेकरांची पिढी चेतविली गेली. चापेकरांच्या बलिदानाचा ठसा अभिनव भारताच्या चळवळीवर पडला. सावरकरांच्या विचारांपासून स्फूर्ति घेऊन जे सहकारी इंग्रजांच्या तडाख्यातून फरारी झाले त्यांनी पुढे गदर पक्षाचें नेतृत्व केलें. गदरपक्षाच्या कार्यकर्त्यांनी सावरकरांना अंदमानातून सोडविण्याचा जर्मन सरकारला सल्ला दिला. त्यांनी पंजाबमध्ये वाटलेल्या '१८५७ चें स्वातंत्र्य समर' या पुस्तकापासून सरदार भगतसिगांनी प्रेरणा घेतली. सरदार भगतसिगाच्या पुण्यतिथीच्या दिवशी सन १९३२ मध्ये एक तरुणाने मुंबईत एका अधिकाऱ्यावर गोळी झाडली, आणि "स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय" म्हणून घोषणा करून ती पुण्यतिथि साजरी केली. सावरकरांच्या पिढीतले 'रासबिहारी बसू' यांनी अठराव्या वर्षी सन १९१० मध्ये लॉर्ड मिंटोवर बॉंब टाकला. ते फरारी झाले आणि जपानमध्ये जाऊन राहिले. सन १९१४ ते १८ च्या महायुद्धात त्यांनी गदर पार्टीबरोबर काम केलें. नंतर जपानमध्ये अज्ञातवासात ते राहिले. दुसरें महायुद्ध सुरू होताच त्यांनी इंडियन इन्डिपेंडन्स लीग स्थापन केली. मलायामध्ये पहिली आझाद हिंद सेना त्यांनी स्थापिली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रेरणेने सुभाषचंद्र बोस अज्ञात झाले. जर्मनीत पोहोचले. तेथून ते जपानला गेले. रासबिहारी बसूंनी क्रांतिकार्याची मशाल सुभाषचंद्रांच्या हाती दिली आणि ६४ व्या वर्षी ते स्वर्गवासी झाले. अशा प्रकारे एका मशालीपासून दुसरी मशाल पेटवीत पेटवीत ही क्रांतिकारकांची गंगा 'चलो दिल्ली' करीत आसामवर येऊन थडकली.

सावरकर अंदमानमध्ये असताना अंदमानासंबंधी त्यांचें विचार-चक्र सुरू झालें. काथ्या कुटताना हात रक्तबंबाळ होत. कोलू चालविताना अती कष्ट होत. हातापायांत बेडचा होत्या पण मन कसें बंदिस्त होणार! त्या मनात हिंदुस्थानच्या भावी स्वराज्याचे विचार घोळत होते. ते त्या स्वराज्याला दृढ करणाऱ्या सैनिक विद्येचे होते. सैन्यशक्तीचे होते. भारताच्या नाविक दलासंबंधीचे होते. ' माझी जन्मठेप ' या पुस्तकात सावरकर म्हणतात, " अंदमान हा स्वतंत्र शक्तिशाली नाविक तळ होईल, नव्हे तो झाला पाहिजे. " त्या तळामुळे सिंगापूरपासून सिलोनपर्यंत आणि कलकत्ता ते मद्रास-पर्यंतचा आमचा बंगालचा उपसागर भारताच्या नाविक दलाला रक्षण करणें सोपें जाईल असें ते म्हणत.

सावरकर नुसते दांडगे नव्हते. दरोडे घालणें किंवा बाँब फेकणें याच्या फार पलीकडे त्यांच्या विचाराच्या कक्षा गेलेल्या होत्या. किंबहुना राष्ट्रीय सुरक्षितता हीच त्यांची कल्पनेची मर्यादा होती. म्हणून सावरकर क्रांतिकार्यापासून दूर फेकले गेले नाहीत. ते क्रांतीचे अध्वर्युच होते, पुढे सेनानी झाले. पाकिस्तानशी युद्ध होताच ते म्हणाले " प्रथम पूर्वपाक समाप्त करा आणि तो देखील चोवीस तासांत! " भारतीय सेनानींचे विचार देखील त्याच दिशेने धावत होते, पण ... पण काय ! सावरकरांना पाण्यात पाहणारी दुबळी राजनीति आडवी आली !

क्रांतिकारक सावरकरांनी १९४२ मध्ये प्रत्यक्ष राजकारणातून प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे अंग काढून घेतलें. त्या वेळी आपल्या विश्वासू अनुयायांना त्यांनी बोलावून सांगितलें की " तुम्हांला शेपन्नास वर्षें मार्गदर्शन होईल असें मी माझ्या पुस्तकांत लिहून

ठेवलें आहे, स्वयंस्फूर्तीला नेता माना; अंधश्रद्धा सोडा; पाकिस्तान येत आहेसें दिसतें. एक धक्का और दो – पाकिस्तान तोड दो," १९४६ मध्ये सावरकरांनी ही घोषणा दिली, १९६५ मध्ये भारतीय जवानांनी तीच घोषणा अमलांत आणली. आता सिंधु मुक्त करणें हें कार्य उरलें आहे.

सावरकरांनी १८५७ ते १८८५ या कालखंडातील प्रत्येक प्रांतातील राजकीय परिस्थितीचें विहंगम अवलोकन केलें आहे. त्यावरून असें दिसतें की, त्या काळात भारतात जिवंत स्वरूपाची अशी एक राष्ट्रीय चळवळ पंजाब व महाराष्ट्र सोडून अन्यत्र कोठेही नव्हती. पंजाबमध्ये कुकांनी काही चळवळ केली व महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी काही केली. पण इंग्रजांनी ती मोडून काढली. तथापि महाराष्ट्रात तिचें बीज पेरलें गेलें होतें. चापेकर बंधूंनी त्याला खतपाणी घालून वाढविलें. त्यांना फाशी झाली तरी त्याचाच अंकूर पुढे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने वाढीस लागला. वयाच्या पंधराव्या वर्षी स्वातंत्र्य संपादनासाठी आमरण प्रयत्नशील राहण्याची त्यांनी जो प्रतिज्ञा केली ती फळास आली. त्यांनी आपल्या प्रतिज्ञेची सांगता करण्यासाठी १९५२ साली पुण्यास अभिनव भारत सांगता समारंभ घडवून आणून आपली प्रतिज्ञा सिद्धीस गेली व आपण आता कृतकार्य होऊन प्रतिज्ञेतून मुक्त झालो असें प्रकट केलें. सावरकरांनी १९०८ पासूनच्या चाळीस वर्षांच्या काळात स्वातंत्र्य संपादनास्तव केलेली चळवळ ही त्यांच्या क्रांतिकार्याचें स्मारकच म्हणावी लागेल. इंग्रजांच्या राज्यात लोकशाही मार्गाने राजयंत्र बदलण्याची शक्यताच नव्हती. म्हणून सावरकरांना अन्य मार्ग हाताळावे लागले. समाज इतका

भ्याड बनला होता की, आपण इंग्रजांचा प्रतिकार करू शकतो हा विचारही लोकांच्या मनातून नष्ट झाला होता. तो भ्याडपणा घालविण्यासाठी इंग्रजांच्या दहशतवादाला प्रतिदहशतवाद निर्माण करणें भाग होतें. म्हणून पिस्तुलाचें राजकारण करावें लागलें. असें सावरकरांनी त्याचें समर्थन केलें आहे.

राष्ट्रीय क्रांति घडवून आणण्यासाठी सैनिकी सिद्धता लागते व त्यासाठी अवश्य ती तयारी केल्यावाचून स्वातंत्र्य संपादन होणें अशक्य आहे हा त्यांचा सिद्धान्त होता. मॅझिनीच्या आत्मचरित्राच्या भाषांतराला त्यांनी जी स्वतंत्र प्रस्तावना लिहिली आहे तीमध्ये त्यांनी राज्यक्रांतीची हीं विचारसूत्रें ग्रथित केलीं आहेत. ते विलायतेस गेले ते क्रांतिकारकांची भारतभर संघटना घडवून आणण्यासाठी आणि इंग्रजांच्या शत्रुराष्ट्रांतून सैनिकी साहाय्य मिळविण्याच्या उद्देशाने. भारतात राहून निरनिराळ्या प्रांतांतील बुद्धिमान् व कर्तृत्ववान् लोकांशी संपर्क साधून त्यांना क्रांतिकार्यांत ओढणें अवघड होतें; यापेक्षा भारताच्या सर्व प्रांतांतून बुद्धिमान् व संपन्न तरुण विलायतेत जात, त्यांना तेथे एकत्र गाठून त्यांच्या द्वारे क्रांतिकार्याच्या प्रेरणेचा फैलाव सर्वत्र देशभर मोठ्या प्रमाणात व लवकर घडवून आणता येईल, या विचाराने प्रेरित होऊन सावरकर विलायतेत बॅरिस्टर होण्याकरिता म्हणून गेले.

तेथे त्यांनी '१८५७ चें स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ लिहिला. त्यात नानासाहेब पेशव्यांनी आपलीं माणसें जागोजाग पाठवून जसा पाठिंबा मिळविला, त्याचप्रमाणे बुद्धिमान् तरुणांना स्वातंत्र्यप्राप्तीची प्रतिज्ञा करण्यास उत्तेजन देण्याचा प्रयत्नही सावरकरांनी केला. ते तरुण शिक्षण संपवून भारतात परतल्यानंतर त्यांच्या

ठिकाणी क्रांतिकार्याचें एक केंद्र आपोआपच निर्माण होईल व क्रांतीचें जाळें भारतभर पसरेल अशी त्यांची योजना होती. पिस्तुल चालवून किंवा बॉंब फेकून भारतीय लोक इंग्रजांना मारू शकतील हा विचार त्यांनी भारतात रुजविला.

ब्रिटिशांचीं शत्रुराष्ट्रें जीं रशिया व जर्मनी, त्यांमध्ये जाऊन भारतीय तरुणांनी सैनिकी शिक्षण घ्यावें व त्यांना त्या राष्ट्रांनी अद्ययावत् शस्त्रास्त्रांचा पुरवठा करावा अशासाठीही त्यांचे प्रयत्न चालू होते. क्रांतिकारक सावरकरांचा स्वातंत्र्य संपादनाचा हा मार्ग होता.

पुढे १९४० साली दुसरें महायुद्ध सुरू झाल्याबरोबर त्यांनी सैनिकीकरणाची हाक दिली. काही मूर्ख लोकांनी त्यांना रिक्रूटवीर म्हणून हिणविलें असतानाही त्यांच्या अदूरदृष्टीकडे त्यांनी दुर्लक्ष केलें. सुभाषबाबूंना गुप्तरूपाने जर्मनीस जाऊन जर्मनांच्या बंदीत पडलेल्या भारतीय सैनिकांसह जर्मनीच्या मदतीने बोटीने भारतावर चालून येण्याचा मार्ग त्यांनी सुचविला. पुढे सुभाषबाबू सावरकरांच्या सूचनेनुसार जर्मनीत गेले व जर्मनीतून सिंगापूर भागात आले. त्यांनी इंग्रजांच्या ताब्यातून बाहेर पडलेल्या व जपानच्या ताब्यात युद्धकैदी म्हणून असलेल्या सैनिकांच्या मदतीने अंदमानात भारतीय स्वातंत्र्याचा ध्वज फडकविला. त्यांनी सावरकरांच्या धोरणाचें हें यश म्हणून त्यांची स्तुति गाइली. गेल्या महायुद्धाच्या काळात भारतीय नाविकांनी सैनिकांनी, आणि वैमानिकांनी बंड केलें आणि भारताच्या स्वातंत्र्याचा ध्वज उभारला. त्यामुळे भारत स्वतंत्र झाला. इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी भारतास स्वातंत्र्य देण्याचें कारण सांगताना म्हटलें की "भारतीय सेना

इंग्रजांना एकनिष्ठ राहिली नाही व हिंदुस्थान ताब्यात ठेवण्या-इतकें इंग्रजी सैन्य इंग्लंडजवळ राहिलें नाही. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य देणें अपरिहार्य झालें आहे. क्रांति घडवून आणण्याच्या सावरकरांच्या राजकीय दृष्टिकोनाचा व त्यांच्या द्रष्टेपणाचा हा मोठाच विजय होय !

* * *

(५)

# साहित्यिक व भाषाशुद्धिप्रचारक सावरकर

परक्या भाषेतील शब्द आपल्या भाषेत निष्कारण घुसून त्यांनी आपले जुने शब्द मारू नयेत हाच काय तो भाषा शुद्धीकरणाचा अर्थ होय. नवीन वस्तु, नवीन कल्पना, नवीन विचार, यांना व्यक्तविणारे प्रतिशब्द मुळीच घेऊ नयेत अशी यामागे भूमिका नाही. पण ज्या वस्तूंना आणि विचारांना द्योतक असे शब्द आपल्या भाषा भांडारांत भरलेले आहेत त्यांनाही परके नवे शब्द योजणें हें मनोदास्याचें लक्षण आहे. जिलबी, गुलाब वगैरे परशब्दांचा यथेच्छ उपयोग करा, परंतु निष्कारण आलेले परकी शब्द टाळावयास पाहिजेत असें सावरकर सांगत असत.

जेते राष्ट्र, जितांचें राजकारण, त्यांचा धर्म, त्यांची संस्कृति आणि त्यांची भाषा, या सर्वांना आत्मसात् करू पहातें. आपली संस्कृत भाषा किती संपन्न आहे! तिला अव्हेरून इंग्रजी, फारशी इत्यादि दुसऱ्या परक्या भाषांतून शब्द घेणें म्हणजे घरातील सोन्याची वाटी फेकून देऊन चिनी मातीचा कप हाती घेण्यासारखेंच नव्हे काय ? संस्कृत भाषा इतकी संपन्न आहे की, चंद्रसूर्य यांना परकीय भाषेत एकेकच शब्द आढळतो; पण संस्कृतात त्याअर्थी किती तरी पर्यायी शब्द आहेत. अशी बहुमोल भाषाशब्दांची खाण असताना परक्याच्या दारी भीक मागण्याची आपणांस मुळीच जरुरी नाही.

आपल्या नित्याच्या व्यवहारात परभाषेतले चारशे साडे चारशे शब्द आलेले आहेत. त्यांचें उच्चाटन करून त्या ठिकाणी आपल्या भाषेतील शब्दयोजना करणें हें काम अवघड नाही. त्या दृष्टीने हुतात्मा, उपस्थित, स्तंभ, बोलपट, इत्यादि शब्द रूढ झालेच आहेत. हलके हलके आपल्या भाषेच्या अभिमानाची जागृति होत आहे. मुसलमानांनी गांवांचीं जुनीं नांवें बदलून आपलीं नवीं नांवें ठेविलीं होतीं. आता तीं बदलून पुणें, नाशिक, काशी, प्रयाग हीं नांवें रूढ झालीं आहेत. भाषेची शुद्धि करण्याची प्रवृत्ति थेट शिवाजी महाराजांच्या कालापासून सुरू झाली आहे. सिंहगडला औरंगजेबाने बक्षिदाबक्ष असें नांव दिलें होतें. तें बदलून सिंहगड हें नांव देऊन स्वदेशाबरोबर त्यांनी स्वभाषेचीही सेवा केली. इतकेंच नव्हे, तर राज्यकारभारात वापरावयाचा शब्दांचा कोश त्यांनी तयार करविला. आपल्या प्रधान मंडळातही फारशी शब्दांचीं नांवें बदलून अधिकारावर असणाऱ्या वर्गाची नवी बिरुदावली तयार केली.

सावरकरांच्या भाषेच्या संबंधीची भावना ही वैशिष्टयपूर्ण असून ती भारत राष्ट्राच्या बुद्धीचें, सामर्थ्याचें व शौर्याचें प्रतीक आहे. प्रत्येक देशावर किंवा संस्कृतीवर जेव्हा परकीय देशाचा आणि संस्कृतीचा आघात होतो, तेव्हा जित राष्ट्राची भाषा आणि साहित्य यांवर परकीय राष्ट्राच्या भाषेचें आणि साहित्याचें आक्रमण सुरू होते. आपल्या हिंदुस्थानात प्रथम मुसलमान व नंतर इंग्रज या दोन राजकर्त्यांच्या भाषांचे आपल्या हिंदुस्थानातील भाषांवर आक्रमण झालें. परकीय भाषेचें स्वामित्व स्वाभिमानास केव्हाही दुःसहच होतें. उत्तर हिंदुस्थानात विशेषतः सीमा प्रांताकडे पाहिलें असता असें आढळून येईल की त्या प्रांतात उर्दू भाषेचे

वर्चस्व अतोनात आहे. त्यासाठी लाला लजपतराय व स्वामी श्रद्धानंद यांनी संस्कृतोद्भव किंवा संस्कृतनिष्ठ ही भाषा जगविण्याची तिकडे पराकाष्ठा केली. तिकडे शिक्षण उर्दूमिश्रित हिंदीत मिळतें. पंजाबात आजही उर्दूचें वर्चस्व आहे. इतकें की भाई परमानंदांना देखील आपलें वृत्तपत्र उर्दूत काढावें लागलें! सिंधी भाषा अशीच उर्दूमय आहे आणि सिंधी देखील लिहिल जाते उर्दूसारखीच! सिंधीतील भारत, रामायण, भागवत उर्दूप्रमाणे उजवीकडून डावीकडे वाचावें लागतें.

इंग्रजी आमदानीपूर्वी मराठ्यांच्या काळात भाषाशुद्धीच्या दृष्टीने बरेच प्रयत्न झाले. रघुनाथ पंडितांचा राज्यव्यवहार कोश, मोरोपंतांचें काव्य, रामदासांचा दासबोध वगैरे ग्रंथ त्या प्रयत्नांचेच निदर्शक होत.

इंग्रजी सत्तेबरोबर आपल्या भाषेवर इंग्रजीचें आक्रमण सुरू झालें. त्या आक्रमणाचे परिणाम आज प्रत्यही आपल्या दृष्टीस पडत आहेत. रस्त्यांनी जाताना आपण आजूबाजूला नजर टाकली तरी आपल्याला टेलर, सलून वगैरे इंग्रजी शब्दांचाच भरणा आढळून येईल! साध्या संभाषणांतही इंग्रजी भाषा आपल्या मराठी भाषेत मिसळून बोलण्याची आपणांस इतकी सवय झाली आहे की, सुधारू म्हटलें तरी आपणांस तें जड जातें. फुगडी, सागरगोटे खेळणाऱ्या मुली, विटीदांडू, आंधळी कोशिंबीर खेळणारी मुलें किंवा मुली 'तयार' या अर्थी 'रेडी' हा शब्द वापरताना आढळतात. इंग्रजी! शब्दप्रयोग करणें हें एक प्रतिष्ठितपणाचें लक्षण आहे अशीही कित्येक जणांची कल्पना झालेली आहे! विशेषतः कमी शिकलेल्या माणसांमध्ये जास्तीत जास्त इंग्रजी शब्द वापरण्याची प्रवृत्ति दिसून येते.

साध्या मजुरांत अपटुडेट व कंप्लीट हे शब्द अद्ययावत् व पूर्ण या अर्थी सहज रीतीने वापरले जातात. सभ्य लोकांतही आपल्या पत्नीला पत्नी किंवा कुटुंब असें बोलण्याची जणू काय लाज वाटूनच 'वाईफ' म्हणणें शिष्टपणाचें लक्षण आहे अशी त्यांची समजूत आहे.

भाषाशुद्धीची आवश्यकता ही दोन गोष्टींकरिता जरुरीची आहे. एक आपली भाषा निर्भेळ व्हावी यासाठी आणि दुसरें म्हणजे तिच्यावरील आक्रमण आपल्यावरील परकीयांच्या स्वामित्वाचें निदर्शक आहे म्हणून. मराठी भाषेत जे अनावश्यक प्रतिशब्द घुसले असतील त्यांना हुसकावून लावावें व दुसरा म्हणजे आपल्या भाषेत रूढ झालेल्या ज्या परकीय शब्दांना सुटसुटीत व नवे शब्द बनविता येतील किंवा त्या अर्थाच्या जुन्या शब्दांचें पुनर्जीवन करता येईल तें आपण केलें पाहिजे.

वर लिहिल्याप्रमाणे मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचा हल्ला झाला असता तो परतविण्याचें श्रेय निबंधमालाकारांचें आहे. त्यांनी मराठी भाषेचे शिवाजी ही अन्वर्थक पदवी संपादिली. शास्त्रीबुवांनी जागृत केलेल्या स्वराष्ट्र-अभिमानाचें पाणी महाराष्ट्रीय लेखणीस लागताच प्रत्येक वाक्यात इंग्रजी शब्द घुसडून देण्यातच ज्ञानाची व सुधारणेची परमावधि मानणाऱ्या छछोर लोकांच्या प्रचारापासून ती बरीच अलिप्त राहिली व तीच परंपरा उभ्या हिंदुस्थानभर पाळण्यात आली व येऊ लागली आहे. इंग्रजी भाषेचा हल्ला मराठी भाषेवर झाला असला तरी तिचें वर्चस्व फार दिवस टिकलें नाही. परंतु मुसलमानी शब्दांचें वर्चस्व मात्र अद्यापही कायम राहिलें आहे. मराठी भाषेचें शुद्धीकरण विशेषतः त्या मुसलमानी शब्दांपासूनच होणें अवश्य आहे. मुसलमानी शब्द आपल्या

घरादारांत चोरासारखे शिरून धन्यासारखे शिरजोर होऊन बसलेले आहेत. उदाहरणार्थ मालिक किंवा मालक हा शब्द सहज रीतीने वापरला जातो. त्या ऐवजी धनी, स्वामी किंवा प्रभु हे शब्द सोपे, आटोपशीर व सुंदर असून ते वापरले जात नाहीत. तसेंच जखमी हा शब्द परकीय भाषेतला असून त्याऐवजी घायाळ हा शब्द लोकांना वापरावासा वाटत नाही. अशा रीतीने मराठी भाषेच्या शुद्धीकरणाचें शिवाजी महाराजांनी आरंभिलेलें कार्य पुढे चालून स्वभाषेतील राहिली साहिली घाण धुवून काढण्यासाठी झटणें हें स्वभाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की, आजकाल मराठी भाषेत घुसलेले इंग्रजी शब्द काढण्याकडे जरी बराच प्रयत्न चाललेला आहे तरी निष्कारण घुसलेले व शिरजोर होऊन बसलेले मुसलमानी शब्द काढून टाकण्याकडे मात्र कोणाचेंच लक्ष जात नाही ! उलट त्यांचा उपयोग करण्यात जणू अद्‌भुत मंत्रशक्ति भरलेली आहे, असें समजून कित्येक लोक त्यात भूषण मानतात !

आणखी एका दृष्टीने भाषेचें शुद्धीकरण होणें अवश्य आहे. उत्तर हिंदुस्थानात उर्दूचें आपल्यावर आक्रमण होत आहे. हिंदी ही आपली राष्ट्रभाषा असली पाहिजे असें जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ती हिंदी भाषा देवनागरी लिपीत लिहिली गेली असली पाहिजे. प्राचीन काळातील प्रगत राष्ट्रांत चित्रलिपी प्रचलित होती. त्यांतूनच ब्राम्ही म्हणजे देवनागरी लिपीचा जन्म झाला. ती लिपी उत्पन्न झाली तो क्षण मोठा युगप्रवर्तक समजला पाहिजे. ही लिपी इतकी विचारपूर्वक बनविलेली आहे की तिची रचना शास्त्रीय असून तिच्याशी जगातील इतर कोणतीही विद्यमान लिपी स्पर्धा करू शकत नाही. एका उच्चाराला एक अक्षर हें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४५२५५ ... निबंध

तिचें वैशिष्टय आहे. परंतु ती लिपी इतकी शास्त्रशुद्ध असली तरी सुद्धा मुद्रण सौकर्याच्या दृष्टीने तीत काही फेरफार करणें आज अवश्य झालें आहे. मुद्रणाच्या बाबतीत इंग्रजी भाषेशी तोंड द्यावयाचें असलें तर तीत सुधारणा अनिवार्य आहे. देवनागरी लिपी सुटसुटीत आणि कमी अक्षरांचीं करणें हाच यावर एक उपाय आहे. याच दृष्टीने जर देवनागरी लिपी लिहिण्यात आली तर अक्षरांच्या बाराखडीतील आठ अक्षरे, शंभर जोडाक्षरें आणि पंचवीस 'रकाराचे' प्रकार इतकीं अक्षरें वाचून सुमारे छप्पन्न खणांत मराठी जुळाऱ्यांची पेटिका पूर्ण होऊ शकते. आता फक्त दृष्टीला लागलेल्या सवयीवर थोडासा परिणाम होईल पण वृत्तपत्रांनी जर ही गोष्ट मनावर घेतली तर देवनागरी लिपीही लौकरच एक चांगली मुद्रणक्षम लिपी बनेल.

भाषाशुद्धि करण्याकरिता आपल्या सर्वच प्राकृत भाषांना क्रियापदांचें दारिद्र्य पदोपदी अनुभवावें लागतें. त्या सर्व भाषांमध्ये घेणें, देणें, करणें, असणें अशी काही मोजकीं क्रियापदें स्वतंत्र जुळलेली आहेत. आणि उरलेल्या शतावधी क्रियापदांचें कार्य त्याच त्या मोजक्या क्रियापदांच्या मागे भिन्न भिन्न नामें किंवा इतर शब्द लावून साधावें लागतें. त्यामुळे एका शब्दाने जें काम व्हावयाचें त्यासाठी दोन तीन शब्द वापरावे लागतात. जसें 'सम्मति देणें' 'प्रचार करणें' 'अनुमोदन देणें,' 'आनंद होणें,' उत्तर देणें, इत्यादि. या द्विशब्दी क्रियापदांमुळे त्याच त्या देणें, करणें, असणें इत्यादि शब्दांची कंटाळवाणी पुनरुक्ति करावी लागते. अशा ठिकाणी तरी आपण संमतणें, प्रचारणें, अनुमोदणें, आनंदणें, उत्तरणें अशीं क्रियापदें वापरण्याची पद्धत ठेविल्यास स्वतंत्र क्रियापदें बनविण्याची प्रवृत्ति प्रगत होईल. क्रियापदांच्या या सुधारणे-

पुरते तरी आपण संस्कृत भाषेचें अनुकरण करतो असें होईल. संस्कृतात नामादिक शब्दांपासून क्रियापदें बनविण्याची सूत्रबद्ध सोय आहे तेव्हा संस्कृत भाषेप्रमाणे प्राकृतांतही अशी स्वतंत्र क्रियापदें आपण हळूहळू योजावीं.

आपल्या भाषेसाठी सर्व अर्वाचीन आणि कित्येक प्राचीन विज्ञानातील पारिभाषिक शब्द एकदा ठाम ठरविले जावेत. पारिभाषिक निश्चित शब्दांची उणीव हिंदुस्थानातील सर्व प्राकृत भाषांत आज पडत आहे. काही काही शास्त्रांची परिभाषा निश्चित करण्याचा यत्नही झालेला आहे. त्या यत्नामुळे पुष्कळसे सुरेख शब्द उपयोगात येऊन अखिल भारतीय संस्कृतनिष्ठ परिभाषा ठाम करण्याचें कार्य आता सुसाध्य झालें आहे. हिंदुस्थानला मिळालेल्या स्वातंत्र्यानंतर काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत संस्कृतनिष्ठ वैज्ञानिक परिभाषेचे आजवर निघालेले शब्द एकत्र करून भारतीय परिभाषा कोश तयार करणें आता शक्य झालें आहे.

मराठीतील उत्तमोत्तम ग्रंथांचीं भाषांतरें इंग्रजीत करून मराठी साहित्याची योग्य ती थोरवी जगातील साहित्यात प्रस्थापिली जावी. मराठीच्या तिजोरीतच झाकून ठेविल्यामुळे आपल्या मराठीतील कित्येक पाणीदार, जातिवंत मोती मातीमोल होऊन पडत आहेत. महाराष्ट्राने हिंदुस्वातंत्र्यार्थ जें प्रचंड धर्मयुद्ध लढविलें त्याचें नांव सुद्धा जर जगाच्या साहित्यात ऐकू येत नसेल तर त्याचें एक मुख्य कारण म्हणजे त्याच्या इतिहासावरील मराठीतील ग्रंथ इंग्रजीत कोणी अनुवादिले नाहीत हें होय.

पूर्वी इंग्रजीतून मराठीत महत्त्वाच्या ग्रंथांचीं भाषांतरें करण्याची आवश्यकता होती. तशी आता मराठीतूनही इंग्रजीत भाषांतरें अनुवादण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. जागतिक भाषा

म्हणून इंग्रजी भाषेचा उपयोग केला जात असल्यामुळे त्या इंग्रजी भाषेत आपल्या मराठी भाषेतील महत्त्वाचे ग्रंथ भाषांतरित झाले पाहिजेत. याकरिता भाषांतरें करणारीं मंडळें स्थापन झालीं पाहिजेत. सध्या संस्कृत वाङमयाचे आणि भारतीय अनुभवाचे प्रगाढ पंडित आणि मर्मज्ञ की जे युरोपियन वाङमयातही मुरलेले आणि अनुभवी आहेत अशा पंडितांचा यांत समावेश झाला पाहिजे. तत्त्वज्ञान, काव्य, तर्क, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, आणि इतिहास प्रभृति विषयांमध्ये ज्यांचे विचार पौर्वात्य आणि पाश्चिमात्य वाङमय आणि प्रणाली या दोघांचेंही परिशीलन करून पक्व झाले आहेत अशा बहुश्रुत पंडितांचा या मंडळांत समावेश झाल्यास जागतिक साहित्यांत आणि ज्ञानांत नवीन नवीन मोलाचो भर आम्हो टाकू शकू.

आपली राष्ट्रभाषा ही संस्कृतनिष्ठ हिंदीच असली पाहिजे. हिंदीला जो आपण राष्ट्रभाषेची पदवी अर्पीत आहो ती काही ती भाषा वा तिचें साहित्य हिंदुस्थानातील इतर भाषांपेक्षा समृद्धतर किंवा उच्चतर आहे म्हणून नव्हे; परंतु हिंदीला राष्ट्रभाषा करण्याचें मुख्य कारण हें आहे की ती भाषा एकंदरीत अखिल भारतात बहुजन समाजात बोलली जाते, समजली जाते आणि लिहिलीही जाते. आणि ती इतर कोणत्याही रीतीने राष्ट्रीय विचारांच्या विकासाला वा प्रगतीला साहाय्यभूत होण्यास कोणत्याही प्रकारे अक्षम नाही. हिंदी ही तिच्या पोटबोलीसुद्धा आठ कोटी लोकांची मातृभाषाच आहे. वर सांगितल्याप्रमाणे हिंदी भाषा जी राष्ट्रभाषा म्हणून आपण म्हणतो ती निर्भेळ संस्कृतनिष्ठ असली पाहिजे. भाषेच्या ऐक्यासाठी हपापलेल्या लोकांनी हिंदीला हिंदी याने 'हिंदुस्तानी' अशी भ्रष्ट करण्याच्या प्रयोगाचा उपयोग केल्यामुळे हिंदी भाषा उर्दूमिश्र होण्याचा जास्त संभव उत्पन्न झाला आहे.

देशभक्त सुभाषबाबू सारख्यांनीही नागरी वा देवनागरी लिपी टाकून रोमन लिपी स्वीकारावी असें आपलें मत प्रसिद्ध केलें होतें. परंतु रोमन लिपी स्वीकारण्यात पुष्कळच अडचणी आहेत. एक तर रोमन लिपी ही जगातील बहुसंख्य लोकांची लिपी झालेली नाही. हिंदुस्थानपेक्षा मोठा चीन आणि दहा कोटी लोकसंख्येचा जपान या मोठमोठ्या राष्ट्रांनी ही लिपी स्वीकारली नाही. शिवाय लिपी शास्त्रशुद्ध असण्याच्या दृष्टीने अक्षराचें जें नांव तोच त्याचा उच्चार हवा ह्या तत्त्वास अनुसरून देवनागरी हीच अशी लिपी आहे की जिच्या एका अक्षराचा एकच उच्चार होऊ शकतो.

साहित्याचें ध्येय काय असावें ह्याबद्दल सावरकरांचे विचार मननीय आहेत. मनुष्य जातीचे अधिकाधिक हित ज्यायोगे साधता येतें तेंच जसें मनुष्याचें कर्तव्य होय, त्याचप्रमाणे मनुष्य जातीच्या अधिकांत अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेंच साहित्य श्रेष्ठ. प्रासंगिक आनंद व करमणूक ही देखील मानवहित साधू शकतात. म्हणून त्याचाही साहित्यांत समावेश होतो. साहित्यात वस्तुनिष्ठ वाङ्मय आणि रसनिष्ठ वाङ्मय असे दोन प्रकार कल्पिले आहेत. वस्तुनिष्ठ वाङ्मयात तत्त्वज्ञान, गणित, ज्योतिष, इतिहास, विद्युत् इत्यादि विज्ञानांचा समावेश होतो. त्यांत सत्य काय तेंच यथावत्-पणे सांगितलें पाहिजे. वस्तुनिष्ठ वाङ्मय हें जणू काय वस्तूंचें छायाचित्र आहे. परंतु रसनिष्ठ किंवा ललित वाङ्मय हें कल्पित रंग भरलेलें चित्र होय. रसोत्कर्ष हाच त्याचा विशेष होय. नाटच, काव्य, कादंबरी किंवा कथात्मक वाङ्मय या सारस्वताचा रस-निष्ठ वाङ्मयात समावेश होतो.

ज्या भावना किंवा कल्पना सत्यावर अधिष्ठित असतील त्याच टिकाऊ ठरतील. कोणतेंही वाङ्मय नुसतें पुरोगामी आहे, म्हणूनच

तें सत्य वा तथ्य ठरेल असें गृहीत धरता येत नाही. वास्तव वाङमयाचें साध्य सत्य व तथ्य होय. कोणत्यातरी नव्या सत्यांत किंवा तथ्यांत तें वाङमय आविष्करित आहे किंवा नाही या प्रश्नावरच त्याचा चांगुलपणा किंवा टाकाऊपणा ठरणारा आहे. विरोधविकासवादाच्या दृष्टिकोनातून काही जुनीं सत्यें नव्या मांडणीत थाटण्याच्या किंवा नवीन सत्यें जुन्याच्या दृष्टिपथात आणण्याच्या कामी अशा एकांगी प्रचाराचा उपयोगही केला जात आहे. म्हणूनच वास्तव साहित्यात पडणारी त्यांची जेवढी भर तेवढी आपण सर्वांनी प्रथम स्वीकृत केली पाहिजे. नुसतें पावित्र्य-विडंबन म्हणून तें त्याज्य मानण्यात अर्थ नाही. कोण्या व्यक्तीची वा समाजाची केवळ मानहानि किंवा उपमर्द करण्याच्याच दुष्ट बुद्धीने ओंगळ वा असत्य, असभ्य भाषेत जें लिहिलें जाईल तेवढेंच वाङमय काय तें अप्रसिद्धेय समजलें जावें. ही सर्वसाधारण सूचना रसनिष्ठ किंवा कल्पनानिष्ठ अशा ललित वाङमयासही लागू आहे.

साहित्याचे सापेक्ष महत्त्व ठरविताना साहित्यासाठी जीवन किंवा जीवनासाठी साहित्य या गोष्टींचा आपण अवश्य विचार केला पाहिजे. आपलें राष्ट्रीय साहित्य हें राष्ट्रीय जीवनाचें एक उपांगच काय तें असेल तर राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्यचिंता व मुख्य साध्य असलें पाहिजे. म्हणून केवळ कलेसाठी कला किंवा साहित्यासाठीच साहित्य ही कल्पना त्याज्य ठरते.

जसें राष्ट्र असेल त्यास अनुसरूनच त्याचें साहित्य असलें पाहिजे. युगधर्म किंवा राष्ट्रीय गरज न ओळखता नुसतीच सुनीतें रचीत बसणें हें केवळ मूर्खपणाचें आहे. युगधर्म ओळखून शिवाजीने सरस्वतीच्या रक्षणाकरिता काही काळ पाठ फिरवून शुंभनिशुंभ

मर्दिनीचीच उपासना केली; लेखणी टाकून भवानी तलवार उचलली; म्हणूनच आज महाराष्ट्र सारस्वत असा काही पदार्थ जिवंत राहिला आहे. तसें झालें नाही, तेथे दुबळ्या राष्ट्राच्या साहित्याची कदर न करताना त्याच्या साहित्याला परक्यांनी कशी आग लावली, हें तक्षशिला किंवा नालंदा येथील ग्रंथसंग्रहाला व आशियांतील प्रचंड ग्रंथभांडाराला तीन महिने सतत धुमसणारी आग त्यांनी कशी लावून दिली व हजारो ग्रंथ कसे जाळले यावरून दिसून येईल. सरस्वतीचा एक उपासक म्हणून महाराष्ट्रसाहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून सावरकरांनी तरुणांना असा उपदेश केला की, त्यांनी आता लेखणी मोडून बंदूक उचलावी. साहित्यिक बनू नये तर आधी बनावें सैनिक; राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत साहित्याचें सापेक्ष महत्त्व ओळखून तरुण पिढीचें पहिलें कर्तव्य सैनिक शिक्षण घेण्याचें आहे. म्हणजे स्वराष्ट्र संरक्षक निर्माण करण्यास सोईस्कर होईल. सैनिकी विद्यालयांतून शिक्षण घेताना त्यांनी एखादी कादंबरी, एखादें सुनीत, एखादी प्रेमकथा लिहिली तरी चालेल. नेपोलियनही रणांगणावर करमणूक म्हणून शीळ वाजवीत असे. साहित्याचा सम्राट् जो व्यास त्यानेही सांगितलें आहे की,

अमर्यादप्रवृत्ते च शत्रुभिः संगरे कृते ।
सर्वे वर्णाश्च दृश्येयुः शस्त्रवन्तो युधिष्ठिर ॥

कारण साहित्या पुरते पाहिलें तरी हेंच खरें आहे की

“ शस्त्रेन रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते ।”

* * *

# ( ६ )

## राजकारणी सावरकर

सावरकरांच्या राजकीय जीवनपटाचे चार विशेष आहेत. (१) क्रांतिकारक सावरकर (२) सेनानी सावरकर (३) लोकशाही मार्गाचा अवलंब करणारे सावरकर (४) तत्त्वज्ञानी सावरकर.

सावरकर हे उत्तम सेनानी होते. हें त्यांनी चालविलेल्या अनेक लढयांतून व त्यांच्या प्रासंगिक उद्‌गारांवरून दिसून आलें आहे. दोन जन्मठेपींची शिक्षा झाल्यानंतर जेव्हा त्यांना अंदमानांत नेण्यात आलें तेव्हा तो प्रदेश पाहून त्यांनी जे उद्‌गार काढले, ते त्यांच्या सेनानी दृष्टीची साक्ष देत आहे. अंदमानचें ठिकाण, स्वतंत्र भारताचा नाविक तळ निर्माळ करण्यास अत्यंत योग्य असून लंकेपासून सिंगापूरपर्यंतच्या सर्व परिसरावर लक्ष ठेवून भारताच्या पूर्व समुद्राची येथून राखण करणें कसें शक्य आहे यासंबंधी त्यांनी त्या वेळी काढलेले उद्‌गार 'माझी जन्मठेप' या ग्रंथात नमूद केले आहेत. एवढेंच नाही तर त्यांची भेट घेण्यासाठी म्हणून भारत सरकारचे मुख्य सेक्रेटरी व सरसेनानी जेव्हा अंदमानात गेले होते, तेव्हा अंदमानातील कैद्यांची वसाहत उठवावी व जन्मठेपेचे कैदी अंदमानात पाठवू नयेत, त्यांना भारतातच ठेवावें असा विचार चालू होता. या विचारांस सावरकरांचा विरोध होता. सर्व कैदी भारतात जाण्यास उत्सुक होते. परंतु सावरकरांच्या विरोधामुळे, त्यांच्यावर अतिशय प्रेम करणारे कैदीही, त्यांच्यावर फार नाराज झाले. सरसेनानी आणि ब्रिटिश सरकारचे इतर प्रतिनिधि यांना

सावरकरांचा विचार समजला तेव्हा त्यांनी याबाबत सावरकरांशी चर्चा केली. सावरकरांनी त्यांना असें उत्तर दिलें की " अंदमान हें स्वतंत्र भारताच्या दृष्टीने नाविक तळ होण्यास अत्यंत योग्य असें ठिकाण आहे व येथे येणारे कैदी दरोडेखोर व खुनी असले तरी त्यांच्या रक्तात पराक्रम आहे. त्यांच्या बुद्धीची विकृति नष्ट केल्यास ते उत्कृष्ट सैनिक बनतील. येथील नाविक तळाला इंग्लंडच्या वसाहतीप्रमाणेच ह्या पराक्रमी सैनिकांचा लाभ होईल. सावरकरांच्या या विचाराने सेनापतिही थक्क झाले.

भागानगर व भागलपूर येथे निःशस्त्र प्रतिकारक लढे करण्यात आले. त्याही प्रसंगी त्यांच्यामधील सेनापतीला आवश्यक असे गुण दिसून आले. सोलापूर येथे आर्य समाजाच्या प्रतिनिधींशी त्यांनी केलेलीं बोलणीं व मार्गदर्शन, सत्याग्रहींना त्यांनी आपले खटले लढविण्यासाठी केलेल्या सूचना, तसेंच निजामामार्फत त्यांच्याशी वाटाघाटी चालू झाल्या तेव्हा तडजोडीच्या वेळी त्यांनी स्वीकारलेलें धोरण हे सर्व त्यांच्या अंगी उत्तम सेनानायकाचे व मुत्सद्द्याचे गुण असल्याचे दर्शवितात. भागलपूरच्या लढ्याच्या वेळी तर आपण तेथे हिंदुमहासभेचें अधिवेशन घेणार कीं नाही या संबंधात तेथील सरकारला त्यांनी अखेरपर्यंत पत्रव्यवहारात गुरफटून ठेविलें, व कधी दिल्लीस पत्रव्यवहार तर कधी पाटण्याला या चक्रात घोळ घालून अखेरपर्यंत सरकारने परवानगी द्यावी व न दिल्यास आपणांस काय करता येणार असा आविर्भाव शेवटपर्यंत कायम ठेविला व तोपर्यंत भागलपूरला आपलीं माणसें पाठवून गुप्तपणे अधिवेशनाची सर्व तयारी पुरी केल्यावर अधिवेशनाची तारीख आयत्या वेळी प्रसिद्ध केली. तेव्हा सरकारने बंदी हुकूम काढला. तरी हजारो लोक भागलपूराला जमले व अधिवेशन

होऊन गेलें. सरकारही शेवटी फजीत झाल्याने त्यांनी सर्वांना आठच दिवसांत सोडून दिलें. अफझलखानास शिवाजीने भुलवीत भुलवीत बेसावध ठेवून प्रतापगडला आणलें. तसाच प्रकार सावरकरांनी या वेळी केला. हुकूम मोडूनही अधिवेशन घेतलें जाईल याची कल्पना सरकारला त्यांनी शेवटपर्यंत येऊ दिली नाही.

सावरकर हें लोकशाहीवादी होते. १९४७ साली भारत १५ ऑगस्टला जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा आपल्या घरावर हिंदुसभेच्या ध्वजाबरोबरच स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज त्यांनी फडकविला यावरून हें दिसून येतें. सावरकर कृपाण कुंडलीयुक्त भगव्या ध्वजाचे पुरस्कर्तें होते. राष्ट्रीय ध्वज तो व्हावा अशी त्यांची फार इच्छा होती पण अखेर राष्ट्राने बहुमताने ज्याला मान्यता दिली तो ध्वज त्यांनो मान्य केला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात ते नेहमी सांगत की आता क्रांतीची किल्ली मतपेटीत आहे. तुम्हांला आपल्या मतांच्या जोरावर शासन निवडून घेण्याची आता सोय आहे. जेव्हा तशी सोय नव्हतीच, तेव्हा बंदुकीच्या गोळीची आवश्यकता होती. बदल घडवून आणण्यास जेथे लोकशाही मार्ग उपलब्ध होते तेथे त्यांनी त्यांचाच अंगीकार केला आहे. ते अंदमानात असताना त्यांना तुम्ही माँटेग्यु चेम्सफर्ड सुधारणांस मान्यता द्याल का व क्रांतिकारकांना तसा उपदेश कराल का, असा प्रश्न सरकारने विचारला होता. त्यावर त्यांनी उत्तर दिलें होतें की ज्या मार्गांने भारतीय स्वातंत्र्य जितक्या प्रमाणात जवळ येईल तितक्या प्रमाणात त्यांस आमची मान्यता राहील. क्रांतिकारक मार्ग सोडून देऊन घटनात्मक मार्गांचा अवलंब करण्याचें आश्वासन सावरकर देतील काय? ह्या प्रश्नाला त्यांचें हें उत्तर होतें.

देशहिताकरिता जसा काही अनेक गोष्टींचा त्याग करावा

लागतो, त्याचप्रमाणे लोकप्रियतेचाही त्याग करण्याची तयारी असावी लागते. आपली लोकांतील प्रतिष्ठा कमी होईल या शंकेनें काही लोक पटलेलें मतही बोलण्यास भितात. या बाबतीत सावरकरांचें एक ध्येय ठरलेलें होतें. ते म्हणत, "वरं जनहितं ध्येयं, केवला न जनस्तुतिः" स्तुति कोणाला नको असते ? कोपायमान शंकर सुद्धा स्तुतीला भाळत असतो. पण जनहित हें सर्वश्रेष्ठ आहे एवढेंच सांगणें अवश्य आहे. जनस्तुति व जनहित हीं दोन्हीही ज्याला साधता येतात तो मनुष्य धन्य होतो. सावरकरांच्या आयुष्यांत त्यांनी सैनिकीकरणाच्या संबंधात हें ध्येय पुढे ठेविलें होतें. जागतिक लढाईच्या वेळी सैन्यात भरती व्हा असा उपदेश करताना त्यांनी हेंच ध्येय आपल्या डोळ्यापुढे ठेविलें होतें. त्या वेळी रिक्रूट भरती करणारे वीर म्हणून लोकांनी त्यांची निंदा केली; परंतु महायुद्धाची संधि आली असताना त्याचा फायदा घेण्याकरिता दूरदृष्टि असलेल्या सावरकरांनी लष्करात भरती होण्याच्या मताचा सतत प्रचार केला.

राजकारगामध्ये राष्ट्र या शब्दाची स्पष्ट कल्पना सावरकरांनी लोकांपुढे मांडली. हिंदुस्थान हें हिंदुराष्ट्र आहे. ही कल्पना लोकांपुढे स्पष्टपणे मांडताना हिंदु वंशाची एकता, हिंदुस्थानात असलेल्या निरनिराळ्या भाषांची संस्कृत या एकाच भाषेपासून झालेली उत्पत्ति, ज्या देशात हिंदु लोक राहतात त्या देशाचा व लोकांचा स्वाभिमानी इतिहास व पुरणकालापासून वसिष्ठ, वामदेव या ऋषिनिर्मित चालू असलेली संस्कृति व परंपरा, हिंदुस्थानात रहाणाऱ्या लोकांना पूज्य असलेलीं दैवतें यांच्या पूजनाने उत्पन्न झालेला एकात्म भाव हें खरें राष्ट्रीयत्व आहे. ही गोष्ट त्यांनी जनतेला पटवून दिली. राष्ट्रीय सभेने मानलेलें व प्रसारित केलेलें प्रादेशिक राष्ट्र म्हणजे हिंदुस्थानात रहाणाऱ्या सर्व लोकांचें राष्ट्र

ही कल्पना फोल असून त्याज्य आहे. राष्ट्र हें प्रादेशिक मर्यादेने मर्यादित होत नाही. केवळ एका भाषेनेही होत नाही. तर परस्पर स्वत्वाच्या भावनेने होत असतें. ज्यांना आपल्या मायभूच्या बाहेर धार्मिक व आधिभौतिक विलोभन नाही अशांचेंच राष्ट्र होतें.

सावरकरांनी आपल्या परराष्ट्रीय धोरणाचें मर्म विशद करून सांगितलें आहे. त्यात मुख्यभाग म्हणजे आत्मरक्षणविषयक विचारास प्राधान्य दिलें आहे. आत्मरक्षण हेंच आपलें विचार सूत्र आपण नेहमी आपल्या डोळ्यापुढे ठेविलें पाहिजे, राष्ट्रहिताकरिता प्रचलित सर्वसामान्य नीतितत्त्वेंही बाजूस ठेवावीं लागतात. व्यक्ती-व्यक्तींच्या व्यवहारांत नीतीचा प्रश्न येतो; पण राष्ट्राराष्ट्रांच्या कारभारांत त्या नीतीला मुळीच स्थान नाही हें मी ठामपणे सांगतो असें सावरकर म्हणत असत. प्रत्येक राष्ट्र स्वार्थाच्या दुर्बिणीतूनच पहात असतें. ज्याच्याशी मैत्री केली असता आपला लाभ होणें शक्य असेल त्याशीच सख्य जोडण्याकडे हिंदुस्थानने लक्ष द्यावें. "आत्मानं सततं रक्षेत्" हेंच आपल्या परराष्ट्राच्या धोरणाचें सूत्र. आपल्या स्वातंत्र्यसंपादनाच्या कामी जो कोणी उपयोगी पडेल तो आपला मित्र; उलट, जो आपल्या स्वातंत्र्याच्या आड येतो तो आपला शत्रु असें समजलें पाहिजे. सावरकरांची जागतिक राजकारणाची नीति व परराष्ट्रीय धोरणाचें मर्म या प्रकारचें होतें.

आपल्या राष्ट्राचा उद्धार जर कशाने होणार असला तर हजारो तरुणांची संघटना करण्यानेच; तीच आज आमच्या दलित हिंदु राष्ट्राचा उद्धार करू शकेल असें सावरकरांनी आपलें मत प्रकटपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघापुढे स्पष्ट केलें होतें. या तरुणांमध्ये राष्ट्रप्रेमाची व स्वातंत्र्याची दिव्य ज्योत प्रखरपणे तेवत ठेवून त्यासाठी अतुल स्वार्थत्याग करण्याची शिकवणूक त्यांना दिली जाते

ही गोष्ट असामान्य आहे. त्याप्रमाणे सबंध राष्ट्र जागे करण्याची आवश्यकता आहे. ही गोष्ट संघाचे जनक डॉ. हेडगेवार यांनी पुरेपूर जाणून सर्वस्वी प्रतिकूल अशा परिस्थितीतही आत्मविश्वासपूर्वक संघाची स्थापना करून ते कार्याला लागले. त्यांच्या कार्याबद्दल प्रत्येक हिंदूला अभिमान वाटण्यासारखा आहे. आज आमच्या राष्ट्राचें अत्यंत अपरिहार्य असें पुनरुज्जीवन संघ करीत आहे व त्यांत एकदिलाने भाग घेणें हें प्रत्येक तरुणाचें कर्तव्य आहे असें सावरकरांचें मत होतें.

प्रबलांचाच जगात विजय व्हावयाचा हा ईश्वराचा न्याय आहे. राष्ट्रसिंहाचीं नखें जोपर्यंत तीक्ष्ण आहेत तोपर्यंत कोणत्याही शक्तीला त्याच्या पंजापुढे गाय बनावेंच लागेल. तुम्ही सत्याग्रही असा नाही तर शस्त्राग्रही असा, आपण प्रबळ आणि संरक्षणक्षम असलेंच पाहिजे. "धटासी व्हावे धट, उद्धटासी व्हावे उद्धट" हें रामदासांचें धोरण होतें. शेरास सव्वाशेर हाच न्याय माणसाला व समाजाला मानाने जिवंत राहण्यास सर्वथैव उपयोगी पडतो. याचसाठी सैनिकवृत्तीचे तरुणांमध्ये पोषण करणें हें राष्ट्राच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीने सर्वतोपरी अगत्याचें आहे. एक वेळ आमच्या तरुण लोकांत लेखक, कवि नसले तरी चालेल; परंतु रायफल क्लब सगळीकडेच स्थापन व्हावयास हवेत. त्या सैनिकीकरणाच्या उद्देशानेच सावरकर इंग्लंडला गेले. त्यांनी अभिनव भारताच्या कार्यक्रमाप्रमाणे इंग्रजांच्या शत्रुस्थानी असलेल्या परराष्ट्रांतून हिंदी राज्यक्रांतीचा प्रसार करण्याचें व त्यांच्याशी मित्रत्वाचे संबंध जोडण्याचें कार्य चालू केलें. १८५७ चें स्वातंत्र्यसमर हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला, व त्याचा हिंदुस्थानात गुप्तपणे प्रचार झाला. तसेंच अमेरिकेतही गदर पक्षाने त्याचीं पंजाबी, उर्दू, हिंदी आदि भाषांतून भाषांतरें प्रसिद्ध केलीं. भगतसिंगांच्या प्रेरणेने त्यांच्या दोन इंग्रजी आवृत्त्या छापल्या

गेल्या. तेथून थेट सुभाषचंद्र बोसांनी उभारलेल्या स्वातंत्र्य सैन्या-पर्यंत अखिल भारतीय क्रांतिकारक पक्षाला त्या ग्रंथाने वैचारिक आत्मा देऊन सशस्त्र उठावणीचे प्रत्यक्ष मार्गदर्शन केलें. क्रांतिकार-कांची ती गीता म्हणून सहस्रावधि लोकांनी त्याचा गौरव केला. सैनिकीकरणाच्या या धोरणामुळे स्वातंत्र्यसेनेला सैनिक मिळाले. सुभाष बाबूंना अद्ययावत् शस्त्रांसह जे पन्नास साठ हजारांचें हिंदी सैन्य उभारता आलें तें आधी ब्रिटिश सैन्यात सहस्त्रावधी हिंदू सैनि-कांची भरती करणाच्या सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या आंदोलना-मुळेच शक्य झालें. ही गोष्ट सुभाषबाबूंनी स्वतःच प्रकटपणे दि. २५ जून १९४५ ला सिंगापूर येथील नभोवाणीवरून प्रक्षेपित केलेल्या भाषणात घोषित केली. त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे दुसऱ्या महायुद्धात जेव्हा सिंगापूर येथे रासबिहारी बोसांच्या क्रांतिकारक सन्याशी ब्रिटिशांच्या सैन्याची लढत झाली त्या वेळी प्रत्यक्ष दिसून आली. तेव्हा इंडियन नॅशनल आर्मीच्या सेनापतींनी स्वतः आघाडीवर जाऊन ब्रिटिश सैन्याच्या अधिकाऱ्यांना व सैनि-कांना प्रसिद्धपणे घोषित केलें की तुम्ही हिंदुस्थान देशावर खरे प्रेम करीत असाल व हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा अशी तुमची खरी इच्छा असेल तर तुम्ही ब्रिटिशांच्या बाजूने न लढता आम्हां स्वातंत्र्य-सैनिकांना येऊन मिळा. त्यांनी सैन्यातील हिंदूंना असें आवाहन देताच ते पंचवीस हजार लोक आझाद हिंद सैन्याला येऊन मिळाले. या घटनेमुळे ब्रिटिशांच्या हिंदुस्थानसंबंधी असलेल्या धोरणावर विशेष परिणाम झाला. या उदाहरणास पोषक असें दर्यावर्दी खला-शांचें मुंबईस जें बंड झालें त्यामुळे हिंदुस्थानबरोबर संधि करून हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणें ब्रिटिशांना भाग पडलें. हा सावर-करांच्या धोरणाचा व द्रष्टेपणाचा मोठाच विजय समजला पाहिजे.

* * *

# (७)

## समाजसुधारक सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर हे एक कर्ते समाजसुधारक होते. इतरांना जें सांगावयाचें तें आपण प्रथम आचरणात आणून दाखविलें पाहिजे ही त्यांची धारणा होती. "आधी केलें आणि मग सांगितलें" या रामदासांच्या कृतिवादी उक्तीप्रमाणे त्यांचें वागणें होतें. बोलघेवड्या समाजसुधारकांच्या कृतीत आणि त्यांच्या वागण्यात फार मोठें अंतर पडत असे, तसा प्रकार सावरकरांच्या बाबतीत नव्हता.

अस्पृश्यता निवारणाकरिता सहभोजन हा एक उपाय आहे असें अनेक सुधारकांना वाटत असे. पण प्रत्यक्ष अस्पृश्यांच्या पंगतीला बसून त्यांच्या हातचें खाणें व पाणी पिणें या गोष्टी करण्याचा कार्यक्रम ठेवला, की बोलघेवड्या सुधारकांची त्यात भाग घेण्याची तयारी नसे. पण स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी सहभोजनाच्या कार्यक्रमाला रत्नागिरीस अनेक वेळा अस्पृश्यांस बोलविलें आणि त्यांच्याबरोबर सर्व कार्यक्रमांत स्वतः भाग घेतला. रत्नागिरीहून सुटल्यानंतर १९३७ मध्ये अकोला येथे वऱ्हाड प्रांतिक हिंदुसभेला ते गेले. तेव्हा सभा चालू असता श्री. खंडारे नावाचे एक हरिजन पुढारी अकस्मात् पुढे आले आणि म्हणाले "आपण आमच्या हातचें पाणी प्यायला तयार आहात काय ?" तेव्हा सावरकर म्हणाले "पाणी आता या वेळी आणा. तें पिणें झाल्यावर मग पुढे बोलू" श्री. खंडारे सावरकरांना विरोध करावयास आले होते. त्यांचा विरोध त्वरित मावळला.

रत्नागिरीस अस्पृश्यता निवारण करण्याचें काम त्यांनी सुरू केल्यानंतर लगेच त्यांना साक्षर करण्याचेंही काम त्यांनी चालू केलें. त्या वेळी महारवस्तीत जाऊन स्वतः फळा आणि खडू घेऊन रत्नागिरीस हिंदुसभेच्या वतीने शिकविण्याचें काम ते करीत असत.

हिंदु समाजातील स्पृश्य किंवा हरिजन, वनवासी किंवा नगरवासी, छळाने किंवा कपटाने परधर्मात ओढले गेले तर त्यांना पुन्हा हिंदुसमाजात घेतलें पाहिजे असें त्यांचें मत होतें. त्याकरिता अहिंदूंच्या हिंदूकरणाचा आणि बाटलेल्यांच्या शुद्धीकरणाचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. प्रथमतः हा कार्यक्रम त्यांनी अंदमान येथील कारागृहात हाती घेतला होता. त्यांच्या हातांत आणि पायांतही बेडचा होत्या. त्यांच्या तुरुंगातील हालचालींवर तुरुंगाधिकारी बारी याची कडक दृष्टि होती. त्या तुरुंगात क्रूर पठाण वॉर्डर हिंदु कैद्यांना छळीत. "तू मुसलमान झालास तर त्रास वाचेल" असें ते सांगत. त्यामुळे आणि अज्ञानामुळे कित्येक तरुण हिंदु मुसलमान झालेले त्यांनी पाहिले. तेव्हा लपत छपत जाऊन त्यांना गाठून त्यांचें मन त्यांनी वळविलें आणि त्यांना हिंदुधर्मात पुन्हा घेतलें. तुरुंगातील हिंदू कैद्यांना सावरकरांनी निर्भय बनविलें. जेव्हा शुद्धीकरण झालें तेव्हा पठाण वॉर्डर चिडले. सावरकरांचा तुरुंगातच खून करण्याचा त्यांनी कट केला. पण तुरुंगात सावरकरांनी हिंदु कैद्यांचा गट करून त्या जुलमी वॉर्डरांशी टक्कर घेतली. जे बाटले होते त्यांना पुन्हा हिंदु करून घेतलें. शुद्ध झालेल्यांना संरक्षण न देता पठाण वॉर्डरांची बाजू जेव्हा तुरुंगाधिकाऱ्यांनी घेतली, तेव्हा त्या अधिकाऱ्यांशी त्यांनी कायदेशीर वाद घातला. इंग्रजांना किंवा सरकारी अधिकाऱ्यांना शुद्धीकरणाच्या धार्मिक विधीला हरकत घेता येत नाही असें त्यांनी बजाविलें.

तुरुंगातील जुन्या मतांच्या कित्येक हिंदु कैद्यांना वाटे कीं मुसलमानांच्या किंवा ख्रिस्ती कैद्यांच्या हातचें आपण खाल्लें तर आपण बाटतो आणि एकदा बाटलेला हिंदू कायमचा परधर्मात जातो. पण सावरकरांनी सर्व हिंदू कैद्यांना सांगितलें की खाण्यापिण्याने धर्म बाटत नाही. धर्माचें स्थान हृदय आहे. धर्माचें स्थान पोट नाही.

तुरुंगात असताना शुद्धीकरणें झालीं तेव्हा प्रारंभी होमहवन करता येत नसे. तेव्हा तोंडामध्ये तुळशीपत्र टाकून १० वेळा रामनाम जपून किंवा हिंदु कैदी मित्रांच्या लपत छपत भरलेल्या गटसभेसमोर प्रतिज्ञा करून घेऊन शुद्ध करण्याची युक्ति सावरकरांनी योजली. ते इतिहासाचे वाचक होते. गोमंतकात पूर्वी केवळ मांडवी नदीत स्नान करावयास सांगून आपल्या पूर्वजांनी शुद्धि केली आणि पोर्तुगीजांच्या धार्मिक आक्रमणास विरोध केला हें त्यांना इंग्लंडमध्ये कागदपत्र वाचताना कळलें होतें. तुरुंगातून सुटल्यावर अंदमानमध्येच वस्ती करणाऱ्या हिंदूंची मदत घेऊन त्यांनी बाहेर देखील शुद्धीकरण घडवून आणलें. " तुरुंगात शुद्धीला किंवा रणांगणात अंत्यविधीला कुठे सोय असणार ! " हा विचार त्यांचे मनात येई. म्हणून होमहवन करून शुद्ध करण्यापेक्षा प्रसंगी भटजींच्या मदतीशिवाय शुद्धीकरण झालें पाहिजे असें त्यांचें मत होतें.

समाज सुधारणा करताना एक नवीन अवडंबर निर्माण करून त्या सर्वांची किल्ली केवळ वैदिक मंत्र पाठ म्हणणाऱ्या कर्तव्यहीन आणि ध्येयशून्य वर्गाचे हाती राहावी हें त्यांना मान्य नव्हतें. लढाईत गनिमी काव्याची पद्धत ठेवली असली म्हणजे तीत अनेक

लहान लहान धाडसी नेते स्वयंस्फूर्तीने पुढे येतात. त्याचप्रमाणे हिंदु धर्मरक्षणाचें काम केवळ भट-भिक्षुकांच्या नियंत्रणाखाली न ठेविता सर्वांना वेदोक्ताचा अधिकार द्यावा असें त्यांचें मत होतें.

सावरकर श्राद्ध आणि व्रतवैकल्यांचे वाटेला जात नसत. ते म्हणत, "व्रतवैकल्यांचे पुरस्कर्ते मला नांवें ठेवितात, संस्कारहीन मानतात हें मला माहीत आहे. पण हे हिंदु परंपरेचे अभिमानी १९०८ मध्ये यशोदा वहिनींच्या उपयोगी पडले नाहीत. देश आणि धर्म यांच्याकरिता ज्या तरुणांनी आणि तरुणींनी देहदंड सोसला त्यांना संकटाचे वेळी साहाय्य न करणारे धर्मगुरु मला आदरणीय वाटत नाहीत."

प्रेतदहनासंबंधी क्रांतिवीर सावरकरांचे निश्चित विचार होते. प्रेत तिरडीवरून नेण्यापेक्षा वाहनांतून न्यावें. परिस्थितीप्रमाणे जाळणें, पुरणें, किंवा पाण्यात विसर्जन करणें किंवा विजेच्या भट्टीत टाकणें अशा रीती ठेवाव्या. देहविसर्जनाचा पापपुण्याशी काहीही संबंध नाही असें त्यांचें मत होतें.

धर्माचार हा परिवर्तनीय आहे. तो मानवाने आपल्या सोयीकरिता निर्माण केला आहे असें ते मानीत. माणुसकीची अतिविशाल कल्पना हिंदु धर्मात अंतर्भूत आहे असें ते म्हणत. ते तत्त्वनिष्ठ परिवर्तन-वादी होते.

सत्यनारायणाच्या पूजेसंबंधी त्यांचें स्पष्ट मत होतें. "पाप-पुण्याचा विचार न करता अस्पृश्यता निवारणाकरिता हा माझा झुणका भाकर सत्यनारायण आहे आणि देवपूजेचे अधिकार मी प्रत्येक वेळी नव्या दांपत्याला देतो" असें जेव्हा श्री. अनंत हरि गद्रे म्हणाले, तेव्हा त्यांना वीर सावरकरांनी पाठिंबा दिला.

त्यांच्या समाजसुधारणेमध्ये हिंदू समाज रक्षणाचें सूत्र होतें. हिंदु समाज जगला तर हिंदु संस्कृति जगेल, हिंदु समाज बलवान् झाला तरच भारत तेजस्वी राष्ट्र म्हणून चमकेल असें त्यांचें म्हणणें होतें. हिंदु समाज संख्येने घटला तर या लोकशाहीच्या युगात राजकारणातही हा समाज मागे पडेल. म्हणून संख्याबलाकडे हिंदूंनी दुर्लक्ष करू नये असें त्यांचें मत होतें. केवळ हिंदूंनी संतति-नियमनाचें आचरण करणें किंवा हिंदूंकरिता एकपत्नीव्रताचा कायदा करणें त्यांना अमान्य होतें. सर्वच्या सर्व हिंदू बाटून ज्या प्रदेशात मुसलमान वा ख्रिस्ती झाले त्याच प्रदेशात पाकिस्तान आणि नागालँड झालें. इराण किंवा अफगाणिस्तान येथील सर्व हिंदु बाटले. म्हणून तेथील हिंदु संस्कृति फार तर एखाद्या भग्न देवळा-कडे पाहून ध्यानात आली तर येईल.

काशी विश्वनाथाची औरंगजेबाने मशीद केली. ती जागा पुन्हा ताब्यात घेण्याकरिता लढा सुरू झाला त्या वेळी सावरकर म्हणाले, “ हा विश्वनाथ आज अनाथ आहे. त्या विश्वनाथाची भक्त मंडळी ज्या वेळी बलवान् होतील त्या वेळीच हा विश्वनाथ खऱ्या अर्थानें अन्यधर्मीय प्रामाणिक व्यक्तींना मान्य होईल. ”

कै. धोंडो केशव कर्वे हे देखील समाजसुधारक होते. त्यांची दृष्टि मानवतावादी होती. बालविधवांची स्थिति सुधारण्याकरिता त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. ठक्करबाप्पा हे मानवतावादी होते. भिल्लांची स्थिति सुधारण्याचा त्यांनी प्रयत्न केला. वीर सावर-करांची दृष्टि जितकी मानवतावादी होती, तितकीच ती हिंदु-समाज रक्षणाच्या भावनेतून निर्माण झाली होती.

ते म्हणत, ‘व्रतवैकल्यांचा संबंध पापपुण्याच्या आणि पावि-त्र्याच्या कल्पनांशी निगडित आहे; पण या पावित्र्याच्या कल्पनेचा

अतिरेक हिंदूंनी केला; त्यामुळे आमचें नुकसान झालें आहे. सद्-गुणांचा अतिरेक हा देखील एक दुर्गुणच असतो. विज्ञाननिष्ठ व्हा, तत्त्वनिष्ठ व्हा! हा त्यांचा संदेश होता. पावित्र्याच्या अतिरेकी कल्पनेमुळे हिंदुसमाजाच्या अस्तित्वावरच संकट आलें आहे. साता-समुद्रांच्या पलीकडून इंग्रज आले, तर आम्ही समुद्रप्रवास निषिद्ध मानला! त्यामुळे नुकसान आमचें झालें. ब्राह्मण समुद्रप्रवास करीनासे झाले. मग हिंदुसंस्कृतीचा प्रचार अन्य देशांत कसा होणार? क्षत्रिय अटकेपार जाऊ लागले तेव्हा एकाने शास्त्रार्थ दाखविला की, "परदेशगमन वाईट!" म्हणजे पराक्रमी क्षत्रियांचे हात बांधले गेले! आमचा व्यापार मागे पडला! म्हणून सावरकर म्हणत की ही सिंधु बंदीची बेडी मोडून टाका.

परदेशांत गेल्यावर 'स्वजातीतील मुलीशीच लग्न करीन' अशी रीत कठोरपणाने पाळली तर हजारो हिंदु तरुण तरुणींना अविवाहित रहावें लागेल म्हणूनही सावरकरांनी सांगितलें की, जातिभेदाचें बंड मोडा!

एकदा एका महार बाईला अनधिकृत मूल झालें. सावरकरांना कळलें की, ती बाई तें मूल पाद्रीबुवाला देणार आहे. तेव्हा त्यांनी त्या बाईला निरोप दिला की, 'तुझें मूल आम्ही सांभाळू; तें हिंदु राहू दे.'

शुद्धीकृत मुलीचें लग्न ठरलें. तिचें लग्न लावायला कोणी पुढे येईना. सावरकर म्हणाले, "या मुलीचें कन्यादान मी करतो." त्यांनी तें केलें. असे ते कर्ते सुधारक होते.

सोलापूरच्या एका वेश्येवर मुसलमान होण्याची सक्ती होत आहे असें कळताच सावरकरांनी श्रद्धानंद पत्रात लेख लिहिला.

"वेश्येला देखील तिच्या इच्छेप्रमाणे हिंदु म्हणून जगण्याचा अधिकार आहे. तिने आपलीं मुलें हिंदु म्हणूनच वाढवावीत ती हिंदु राहिली तरच रामकृष्णांची भक्त बनतील व या देशाकरिता लढतील."

विज्ञानाच्या जोरावर माणसाने आपलें जीवन सुखी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें ते नेहमी सांगत. पुढेमागे गोरी आणि कांतिमान् कातडी करण्याचें एखादें इंजेक्शन कोणीतरी शास्त्रज्ञ शोधून काढील आणि त्याने तें अवश्य शोधून काढावें असा विचार देखील त्यांनी एका लेखात व्यक्त केला आहे.

जन्मजात जातिभेदाचें उच्चाटन करण्याकरिता त्या वेळी रूढ असलेल्या रूढींचा बीमोड करणें अत्यंत अवश्य आहे. अशा रूढी अत्यंत प्रबळ, व्यापक व हिंदु राष्ट्राच्या संघटनेस मूलतः घातक होणाऱ्या आहेत. त्या रूढी चार आहेत. त्या म्हणजे १ व्यवसाय बंदी, २ स्पर्शबंदी, ३ रोटी बंदी. ४ बेटी बंदी. त्यांपैकी स्पर्शबंदी व रोटी-बंदी यासंबंधी सावरकरांचा दृष्टिकोन काय होता हें वर आलें-लेंच आहे. व्यवसाय बंदीबद्दल जी रूढी होती ती आता जवळ जवळ नाहीशी झालेली आहे. कारण आता वाटेल त्या जातीचा माणूस वाटेल तो व्यवसाय करू शकतो. त्यात त्याच्या जातीचीही फारशी आडकाठी पडत नाही. इतकेंच नव्हे तर त्या धंद्यास व त्याच्या गुणानुरूप त्यास प्रतिष्ठाही मिळते.

व्यवसायबंदी आज जर खरोखरी कोठे असेल तर ती फक्त भट (भिक्षुक) आणि भंगी या दोन धंद्यांतच काय ती राहिली आहे असें म्हणता येईल. भंग्याचा धंदा हा पिढीजात चालू असून त्या धंद्याचें एकस्व (मक्तेदारी) त्या जातीकडेच आहे. ते तोडण्याचे दोन उपाय सावरकरांना अभिप्रेत होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे

सर्व धंद्यांना प्रत्येक प्रसंगी सन्मानाने वागवावें. आपल्या घरी सर्वसाधारणपणे स्पृश्य येतात तेथपर्यंत भंग्यासही बेधडक येऊ द्यावें. त्यामुळे भंग्याचा धंदा हलकट ही भावना नष्ट होईल. दुसरा उपाय हा की, सुधारकांनी विशेषतः भंग्यांच्या संपप्रसंगी सार्वत्रिकपणे भंग्यांचें काम करून नगर ग्राम स्वच्छ ठेवावें. शिवाय स्वतःचा भंगी नाही कोण ? त्रिकाळ स्नान करणारा स्नातकही आपल्यापुरतें भंग्याचें काम आपणच करतो.

दुसरा प्रसंग बेटीबंदीचा. या विषयासंबंधी समाजात गैरसमज असण्याचा बराच संभव आहे. बेटी बंदी तोडणें म्हणजे जर कोणा हिंदूने प्रेम, शील, सुप्रजाजननक्षमता, प्रभृति वैवाहिक गुणानुकूल अशा अन्य जातीची हिंदु वधू किंवा वर निवडला तर केवळ जात भिन्न येवढ्यासाठीच हिंदु समाजात असा विवाह निषेधिला जाऊ नये किंवा त्यायोगे.त्या वधूवरांस पूर्णपणें संव्यवहार्य समजण्यास हरकत असू नये. मिश्रविवाहाची अनुज्ञा जन्मजात जातिभेद मोडण्याच्या दृष्टीनेच नव्हे तर शुद्धि चळवळ पचविण्यासाठीही अत्यंत आवश्यक आहे. तसेंच हिंदु राष्ट्राच्या संघटनेस ती उपकारक आणि अपरिहार्य आहे.

बेटीबंदी तोडण्याची एक मर्यादा मात्र मनुष्यप्रगतीच्या सद्यःस्थितीत आणि हिंदु राष्ट्राच्या आजच्या विशिष्ट परिस्थितीत पाळणें अवश्य आहे. ती ही की, हिंदूंनी आपल्यातील कोणत्याही जातीशी विवाह केला तरी चिंता नाही; परंतु हिंदुत्वाच्या कक्षेबाहेर जाऊन परधर्मातील व्यक्तीशी विवाह करण्यापूर्वी तिला किंवा त्याला हिंदु केल्यावाचून तो करू नये. अहिंदूशी विवाह करणें आपल्या हिंदु राष्ट्राच्या व सामुदायिक हितास अत्यंत घातक आहे.

त्याच तत्त्वावर कैलासवासी कूर्तकोटी शंकराचार्य यांनी इंदूर नरेशांचा मिस मिलर या अमेरिकन विदुषीबरोबर विवाह करण्यापूर्वी तिचें गोदावरीच्या तीरावर नाशिक येथे हिंदूकरण केलें व नंतरच त्यांचा विवाह झाला.

आपल्या हिंदु राष्ट्रात आज जे सहस्रावधि जातिसंघ आहेत त्या सर्वांनी कसें धोरण ठरवावें यासंबंधी सावरकरांचीं मतें उद्बोधक आहेत. जोपर्यंत बहुतेक जातींचे जातिसंघ आहेत तोपर्यंत उरलेल्या जातींना ते टाळणें दुर्घट आणि हानिकारक होतें. जोपर्यंत जातींची काही विशिष्ट दुःखें व उणिवा आणि आवश्यकता प्रत्यक्षात विद्यमान आहेत तोपर्यंत त्या प्रश्नांपुरते तरी जे ते जातिसंघ उपयुक्त ठरतात. जातिविषयक अशी कोणतोही विशिष्ट उणीव, अन्याय व आवश्यकता जसजशी नाहीशी होत जाईल व सर्व जाति एका पातळीवर जसजशा येतील तसतसा जातिभेद ढिला होईल व त्या मानानेच मग त्या विशिष्ट संघाची आवश्यकता राहणार नाही.

हल्लीच्या परिस्थितीतही जातिसंघाच्या योगाने आज आमच्या हिंदु समाजात निदान त्या त्या गटाची जशी संघटना सहज नैसर्गिक रीतीने होऊ शकते, तशी सबळ सहज आणि सत्वर, इतर कोणत्याही नांवाने अजून होऊ शकत नाही. आम्ही एका राष्ट्राचे वा एका धर्माचे या भावनेपेक्षाही आम्ही अमुक एका जातीचे हीच भावना आज आपल्या कोटयवधि सामान्य जनतेत अत्यंत चिवट, जाज्वल्य आणि लोकसंग्राहक आहे. जातीची जाणीव जन्मापासून, धर्मकार्यांत बारशापासून बाराव्यापर्यंत, अर्भकापासून तो अतिवृद्धापर्यंत, अशी लोकसंग्राहक भावना अत्यंत प्रबळ आणि सवयीने रोमरोमात भरलेली आजही आढळते. ही प्रवृत्ति

खेडेगावातील मागासलेल्या जातींतही आढळते. ब्राह्मणाऱ्या अगदी शेजारी असणाऱ्या मराठ्याचें एकमेकांना आजच्या स्थितीतही अक्षरशः सोयरसुतक नसतें. पण दोन पिढ्यांपूर्वी कलकत्त्यास गेलेल्या आणि पूर्वी कधी तोंडही न पाहिलेल्या ब्राह्मणाशी जातीमुळे रोटीबेटी संबंध होऊ शकतात. म्हणून लोकसंग्रह प्रथम जातिसंघानेच सहज साधणार आहे.

ब्राह्मण महासभा व अखिल ब्राह्मणसंघ निघाला की, ब्राह्मणांतील पोटभेद काही प्रमाणात नाश पावतात. तसेंच इतर जातींचा महासंघ निघाला की उपजातींना एकत्रित करण्याची प्रवृत्ति वाढणारच. कारण संघ म्हणजे आकुंचितपणाचा नाश करणारी प्रवृत्ति होय. जातीच्या महासंघांनीच जर त्यांचा योग्य उपयोग करून घेण्याची दक्षता ठेवली, तर हिंदु संघटनेच्या राष्ट्रमंदिराकडे चढत जाण्याच्या पायऱ्या चढून जाणें फारसें बिकट नाही. पोटजातींतील रोटीबंदी, बेटीबंदी तोडण्यातही त्या जातिमहासंघाचा उपयोग होणें साहजिक आहे. त्या दृष्टीने समाज अखिल हिंदु संघटनेच्या जवळजवळ आणून सोडला जातो. यास्तव हे जातिसंघ आज अपरिहार्यच ठरतात. संक्रमणकालापुरता जातिमहासंघाचा जरी उपयोग होत असला तरी त्या संघाचें ध्येय हिंदु संघटन हेंच असलें पाहिजे.

यापुढील कार्यक्रम म्हणजे अखिल हिंदु सहभोजन मंडळें स्थापन करणें हें होय. प्रत्येक नगरात अशीं सहभोजन मंडळें निघाल्यास या कार्यक्रमाचा प्रचार किंवा आचार करणारे निघतील. त्यामुळे त्या त्या नगरापुरती तरी रोटीबंदीची बेडी ते तोडू शकतील. लग्नांत, मुंजीत, व समारंभाचे वेळी सहभोजनाचे कार्यक्रम झाल्यास त्यामुळे रोटीबंदीची बेडी तोडण्याच्या प्रयत्नास उत्तेजन मिळेल.

या मंडळाच्या कार्यक्रमामुळे खाण्याने जात जाते, धर्म बुडतो ही खुळचट भावना व समजूत नष्ट होईल. त्या वेड्या समजुतीने हिंदु राष्ट्र पंगु केलें आहे. परदेशगमन लाभकारक होतें तेव्हाही तें निषिद्ध मानलें गेलें ! त्यामुळे राजकारणातसुद्धा भयंकर हानि झाली. त्याचें एक उदाहरण म्हणून नेपाळच्या महाराजांच्या जामाताचें म्हणजे राजे कर्नल जय पृथ्वीबहादूरसिंग यांचें देता येईल. ते सन १९३८ मध्ये कलकत्ता येथे असताना एकाएकी नाहीसे झाले होते. परंतु ते गुप्तपणे परदेशात गेले होते. गुप्तपणे परदेशात जाण्याचें कारण असें की, उघडपणें जावें तर परदेशी जाण्यास नेपाळच्या धर्मशास्त्र्यांची आणि राजप्रमुखांची सक्त बंदी होणार, लोक वाळीत टाकणार, परत आल्यावर त्यांची क्षत्रिय जात त्यांना परत जातीत घेणार नाही! म्हणून कलकत्त्याहून गुप्तपणे पळून जावें लागलें. पण दुर्दैवाने त्यांचा डाव फसला आणि ते नेपाळच्या राजाज्ञेनुसार मुंबईत शेवटी अडकविले गेले !

वरील उदाहरणावरून रोटीबंदीची भावना किती तीव्र होती हें दिसून येईल. आता त्या जातिछेदकांनी अशा जातिसंघाशी सहकार्य करणें उपयुक्त ठरेल. कारण जात्युच्छेदक मतांना, प्रचाराला आणि प्रकटपणे केलेल्या सहभोजनादिक जात्युच्छेदक आचारांना कोणतीही मुरड घालावी लागणार नाही व जात्युच्छेदनाचें कार्य मात्र करण्यास संधि मिळेल. जात्युच्छेदनाच्या मार्गातील बहिष्काराच्या घातक रूढीला यामुळे आळा पडेल. शुद्धीकृतांना पंक्तिपावन करून घेता येईल. अशा रीतीने जातिसंघाचा उपयोग करून घेता येईल असें सावरकरांचें मत होतें.

* * *

( ८ )

# इतिहासकार सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर हे एक राष्ट्रभक्त लेखक होते आणि राष्ट्रभक्तीचा इतिहासवाङ्मयाशी घनिष्ठ संबंध असतो. विद्यार्थि-दशेपासूनच सावरकरांचा इतिहास हा आवडता विषय होता. लंडनला ते कायद्याचा अभ्यास करावयाला गेले, पण तेथे त्यांनी इतिहासाचा अभ्यास अधिक मन लावून चालू ठेविला. देशाचें स्वातंत्र्य हें त्यांचें ध्येय होतें. सावरकर त्या वेळीही कवि होते. "तुजसाठी मरण तें जनन। तुजवीण जनन तें मरण॥" या काव्यपंक्तीतून त्यांनी मातृभूमीसंबंधी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्याकरिता क्रांति करावयाची हें त्यांनी ठरविलें होतें. क्रांतिकार्याकरिता लोकांमध्ये देशाभिमान निर्माण करणें आवश्यक होतें. स्वाभिमान निर्माण करणें हें त्यांचें पहिलें उद्दिष्ट होतें. त्या दृष्टिकोनातून ते जगाकडे पहात होते. त्यांच्या वाच-नाची प्रेरणा हीच होती. लंडनच्या सुप्रसिद्ध वाचनालयात त्यांनी १८५७ च्या घटनेवरील अनेक पुस्तकें वाचलीं. अनेक जुने कागद-पत्र पाहिले. त्यांपैकी बहुतांश कागदपत्रें आणि आठवणी इंग्रज अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या होत्या. त्या वाचून त्यांचें मत बनलें की, १८५७ ची घटना म्हणजे केवळ शिपायांचें बंड नसून तो एक राजकीय उठाव होता. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब पेशवे, मौलवी अहमदशहा, कुमारसिंह अमरसिंह, सातारचे छत्रपति यांची तपशीलवार माहिती त्यांचेसमोर आली. इंग्रजांचे

सैन्यात शिपाई म्हणून काम करणाऱ्या वीरांचा उद्देश महागाई भत्ता किंवा पगारवाढ हा नसताना ते या रणधुमाळीत कां सामील झाले, याचा तरुण सावरकरांनी दीर्घकाल विचार केला आणि मग त्यांनी 'स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ प्रथम त्यांनी मराठीत लिहिला. त्या पुस्तकातील माहितीची जुळवाजुळव चालू असताना त्यांनी लंडनमधील अभिनव भारताच्या सदस्यांना ही माहिती व्याख्यानरूपाने कथन केली. ती माहिती प्रसिद्ध करण्याची वेळ आली तेव्हा त्यांचें पुस्तक प्रसिद्ध होऊ द्यावयाचें नाही असा इंग्रज राजनीतिज्ञांनी चंग बांधला होता. म्हणून त्या पुस्तकाचें लंडनमधील मित्रांच्या सहकार्यानें इंग्रजीत भाषांतर करून तें छापण्यात आलें. या 'स्वातंत्र्य समर' ग्रंथामुळे हिंदुस्थानातील अनेक लेखकांना, देशभक्तांना आणि इतिहासकारांना नवीन दृष्टि लाभली. त्या पुस्तकाद्वारे इतिहास वाचनाची नवी दृष्टि भारतीयांना देण्याचा स्पष्ट उद्देश सावरकरांच्या समोर होता. सुप्रसिद्ध साहित्यिक आचार्य अत्रे त्या पुस्तकाबद्दल म्हणाले: "वयाच्या चोविसाव्या वर्षी हें देदीप्यमान पुस्तक लिहून सावरकरांनी फार मोठा विक्रम केला आहे असें मला वाटतें."

इंग्रज लोक १८५७ च्या उठावाला 'बेशिस्त दंगाधोपा' असें मानीत असत. त्यामुळे शालेय पाठ्य पुस्तकांत 'शिपायांचें बंड' असा त्याचा उल्लेख त्या काळी केला जात असे. सावरकरांनी अनेक पुरावे समोर ठेवून असें दाखवून दिलें आहे की, तो दंगाधोपा नव्हता, तर तें एक स्वातंत्र्ययुद्ध होतें. त्या युद्धात स्वातंत्र्याकरिता नुसते शिपाईच लढले नाहीत तर शेतकरी आणि कोणत्याच नोकरीत नसलेले ध्येयवादी तरुणही लढले. स्वधर्म आणि स्वराज्य

हीं सूत्रें पुढे ठेवून त्या वेळी इंग्रजांशी आमचे लोक लढले. या पुस्तकाने बहुतेक सर्व क्रांतिकारकांना प्रेरणा दिली. सरदार भगतसिंगांनी त्या पुस्तकाच्या प्रती आपल्या अनुयायांना वाटल्या. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी त्यांच्या अझाद हिंद सेनेला प्रेरणा देण्याकरिता या पुस्तकाची नवी आवृत्ति काढली. नवी दृष्टि मिळालेल्या अनेक इतिहास-लेखकांनी सावरकरांचें हें राष्ट्रीय ऋण मान्य केलें आहे. महामहोपाध्याय पोतदार, इतिहाससंशोधक राजवाडे, दत्तोपंत आपटे, सरदेसाई, इत्यादि इतिहासकारांनी हें ऋण मान्य केलें आहे.

'हिंदुपदपादशाही' हें स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें इतिहास विषयावरील दुसरें पुस्तक होय. हें पुस्तक लिहून सावरकरांनी इतिहासाच्या अभ्यासकांना पुन्हा एक नवीन दृष्टि दिली. आमच्या देशातील स्वराज्य व स्वधर्म यांच्यासाठी आणि हिंदु समाजाचें सामाजिक आणि राजकीय अस्तित्व अबाधित राखण्याकरिता राष्ट्रधुरीणांनी प्रयत्न चालविले होते. आणि ही कल्पना सर्व प्रांतांतून होती. शेवटी या कल्पनेचा परमोच्च बिंदु मराठ्यांनी अटकेवर भगवा झेंडा लावून गाठला. ही गोष्ट सावरकरांनी ह्या पुस्तकात मांडली आहे.

लंडनमध्ये असताना सावरकरांनी 'शिखांचा इतिहास' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें. या पुस्तकाचें हस्तलिखित प्रसिद्ध होण्यापूर्वीच इंग्लंडच्या गुप्तहेर खात्याने तें जप्त केलें. त्या पुस्तकातील माहिती आणि विचार अतिशय स्फोटक होते. हिंदुस्थानातील सैन्यातले बहुसंख्य शीख सैनिक आपल्यावर उलटतील अशी धास्ती वाटून साम्राज्यवादी इंग्रजांनी या पुस्तकावर बंदी

घालून तो पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु सावरकरांच्या मुखातून ही माहिती अंदमानमध्ये गेलेल्या शीख आणि पंजाबी हिंदू क्रांतिकारकांनी ऐकली. त्या क्रांतिकारकांनी पुढे शीख इतिहास प्रकाशात आणला.

अगदी अलीकडच्या काळात त्यांनी 'सहा सोनेरी पानें' हें पुस्तक लिहिलें. डॉ. आंबेडकर यांनी एके ठिकाणी असें विधान केलें आहे की "हिंदूंचा गेल्या एक हजार वर्षांचा इतिहास म्हणजे अखंड पराभवाचा इतिहास आहे." हें विधान चुकीचें होतें. तें सावरकरांना पसंत पडलें नाही. महंमद बिन कासीमने सिंध प्रांतावर स्वारी केल्यापासून आजपर्यंत निरनिराळ्या प्रांतांत राजकीय स्तरावर कोण लढले, शुद्धीचें कार्य कोणी चालविलें, आणि धर्मरक्षणाकरिता कोणी कोणी पद्धतशीर प्रयत्न केले, याचा सूत्रबद्ध आढावाच सावरकरांनी वाचकांसमोर या पुस्तकात सादर केलेला आहे.

गोमंतकाच्या इतिहासावर सावरकरांनी गोमंतक काव्य लिहून प्रकाश टाकला. नेपाळसंबंधी माहिती त्यांनी प्रसिद्ध केली. 'हिंदु' हें नांव कायम ठेवण्याकरिता 'हिंदुत्व' नांवाचा ग्रंथ त्यांनी लिहिला. तो लिहीत असताना किती तरी नवीन इतिहास त्यांनी कथन केला आहे. हिंदुत्व हें पुस्तक प्रथम लेखकाच्या नांवाशिवाय प्रसिद्ध झालें. तें वाचून सुप्रसिद्ध देशभक्त स्वामी श्रद्धानंद म्हणाले, "हा या युगातला द्रष्टा इतिहास-लेखक आहे," आत्मवृत्त हाच जर इतिहासाचा प्रकार मानला (आणि तसा तो मानला जातो) तर त्यातही अतिशय महत्त्वाची माहिती वाचकांना मिळेल.

जन्मभर ज्या चिरोल साहेबांनी सावरकरांना पाण्यात पाहिलें त्या साम्राज्यवादी चिरोल साहेबांनी सावरकरांच्या 'स्वातंत्र्य

समर ' या ग्रंथाबद्दल काय लिहिलें आहे तें पहा! चिरोल साहेब म्हणतात "सावरकरांचें लिखाण अतिशय प्रक्षोभक आहे. इतिहासातील घटनांचे आधार देऊन इंग्रज साम्राज्याविरुद्ध असंतोषाचा मोठा डोंब उठविण्याचें कार्य या लेखकाने केलेलें आहे. त्यांची भाषा आणि मांडणी हृदयाची पकड घेणारी आहे." शत्रूने दिलेली ही त्यांच्या कर्तृत्वाची पावतीच होय!

लॉर्ड ॲक्टन हे इंग्लंडमधील एक विचारवंत इतिहासचिंतक समजले जातात. त्यांनी इतिहास विषयावर माहिती देताना एके ठिकाणी म्हटलें आहे की, "कलेचा ज्या राज्यांत अतिशय विकास होतो त्या राज्यात बहुधा नीतिमत्ता खाली जाते." ॲक्टन यांच्या लिखाणाचें वैशिष्टच असें आहे की, त्यामध्ये अशी सिद्धान्तस्वरूपाचीं वाक्यें बरींच आढळतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदुसमाजाचा इतिहास कथन करताना जें लिखाण केलें, त्यात अशींच दीर्घकाल विचार करावयास लावणारीं वाक्सुमनें आढळतात. "सद्‌गुणांचा अतिरेक हें हिंदूंच्या विनाशाचें एक कारण आहे." "आम्ही मुकटचापायी मुकुट गमावला" ही त्यांची सिद्धान्तस्वरूपाचीं वाक्यें स्पष्ट करताना सावरकरांनी जी मांडणी केली आहे ती अत्यंत हृदयंगम आहे.

आपल्या आत्मवृताचा शेवटचा भाग वीर सावरकरांनी प्रसिद्ध केला. त्या पुस्तकाला त्यांनी 'शत्रूच्या शिबिरांत' असें नांव दिलें. त्या पुस्तकाला सावरकरांच्या महानिर्याणानंतर महाराष्ट्र शासनाने पंधराशे रुपयांचें पारितोषिक दिलें आहे. पण सावरकरांना त्यांचें आत्मवृत्त लिहिण्यास वेळच मिळाला नाही. त्यांच्या आयुष्यातील अशा किती तरी राजकीय गोष्टी परिस्थितीमुळे

अजूनही उजेडात आलेल्या नाहीत. गुप्तचर विभागाचा अहवाल संशोधकांच्या हाती सरकारी कायद्याप्रमाणे घटना घडून गेल्यानंतर पन्नास वर्षांनी मिळत असतो. सावरकरांचें आत्मवृत्त आणि त्या अनुसंधानाने क्रांतिकारकांचा खरा इतिहास यापुढील काळातच अधिक उजळून पुढे येणार आहे.

खेळ पाहून खेळाचें सुंदर वर्णन करणारे लेखक असतात. सावरकर हे नुसते कागदपत्र वाचून इतिहास लिहिणारे लेखक नव्हते. इतिहासाच्या प्रवाहाला धक्का देणारे, स्वतः इतिहास घडविणारे असे ते इतिहासलेखक आहेत. त्यामुळे अशीं माणसें प्रसंगी अनेकदा अनेकांच्या दृष्टीने विवाद्य व्यक्ति ठरतात. ते जरी विवाद्य ठरले तरी त्यांनी भारताच्या इतिहासलेखकांना आणि तरुणांना एक नवी राष्ट्रीय दृष्टि दिली हें कोणालाही अमान्य करता येणार नाही.

अनेक प्रकारचा पुरावा पाहून, तपासून मग त्यापासून नवे निष्कर्ष काढण्यात येतात. ही अभ्यासाची एक रीत असते.

पण काही लोक एका विशिष्ट कल्पनेच्या भोवती इतिहासातील घटनांची गुंफण करीत असतात. आणि त्या मार्गाने ज्ञान मिळवितात. स्वा. वी. सावरकर या दुसऱ्या गटातील इतिहासकार आहेत असा काही लोकांचा आक्षेप आहे. आणि तसें म्हटलें तरी त्यात सावरकरांना कमीपणा येत नाही. कारण इतिहासलेखन हा त्यांचा मूळ हेतु नव्हता. स्वधर्म आणि स्वराज्य या दोन कल्पनांना उराशी बाळगून इंग्रजांशी लढणारे वीर त्यांना निर्माण करावयाचे होते. त्या हेतूने त्यांनी लिखाण केलें. असा हेतु ठेवून लिखाण करावें किंवा नाही हा वादाचा प्रश्न होऊ शकेल. पण या दोन्ही पद्धतींनी

अभ्यास करून पुढे आलेले इतिहासकार जगांत आदरणीयच ठरलेले आहेत. सुप्रसिद्ध इतिहासकार 'टायन बी' हे देखील काही कल्पना गृहीत धरून त्यासभोवती पुराव्यांची गुंफण करीत जाणारे लेखक आहेत. ते जर नामांकित लेखक मानले जातात तर त्याच नियमाने सावरकरांची गणना देखील इतिहासकारात केली गेली पाहिजे.

वस्तुनिष्ठ इतिहाससंशोधकाच्या गटात सावरकरांना ठेवावें की इतिहासातील गृहीत कल्पनांची वकिली पद्धतीने बिनतोड मांडणी करणाऱ्या लेखक वर्गात बसवावें हा वाद कदाचित काही सुशिक्षित साहित्यिक घालीत बसतील. पण भारताचा इतिहास सदैव साक्ष देईल की, क्रांतिदेवतेची आजन्म उपासना करणारा हा निर्भय लेखक होता. इतिहासकार सावरकरांचें जीवन, कवि सावरकरांच्या शब्दात सांगावयाचें तर असें सांगता येईल :

'कीं घेतलें व्रत न हें आम्हि अंधतेने ।
लब्धप्रकाश इतिहास निसर्ग माने ।
जें दिव्य दाहक म्हणूनी असावयाचें ।
बुध्याचि वाण धरिलें करि हें सतीचें ॥'

* * *

## ( ९ )

# वक्ते सावरकर

सावरकरांचें वक्तृत्व हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष भाग आहे. मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांत सावरकर वक्तृत्व करीत असत. नाशिक येथील विजयानंद थिएटरात त्यांनी इंग्रजीतून भाषण केलें. तें अतिशय उत्तम ठरलें. तसेंच पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचा सन्मान झाला त्या प्रसंगी त्यांनी इंग्रजीतून व्याख्यान दिलें, तेंही उत्कृष्ट ठरलें होतें. सावरकरांच्या इंग्लंडमधील हालचालींचा इतिहास वाचला तर असें आढळून येईल की, तेथील इंडिया हाऊसमध्ये भरणाऱ्या साप्ताहिक बैठकीत ते इंग्रजीतूनच भाषण करीत असत. त्यामुळे तेथील निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांवर त्याचा सुपरिणाम होऊन श्रोत्यांचीं मनें त्यांचेकडे आकर्षित होत. आपल्या मनातील हेतु व आशय श्रोत्यांच्या मनावर बिंबविण्याची त्यांची हातोटी विशिष्ट प्रकारची असल्यामुळे त्यांच्याशी श्रोतृवृंद सहजच सहमत होत असे. त्यामुळे हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळ्या भाषा बोलणारे व उच्च शिक्षणासाठी इंग्लंडात गेलेले सुशिक्षित पदवीधर त्यांचे अनुयायी होऊन हिंदुस्थानात परत आलेले आहेत.

मराठी वक्तृत्वाबद्दल त्यांचा विशेष ख्याति होती. त्यांना लहानपणापासून नैसर्गिक रीत्याच वक्तृत्वाची देणगी होती, असें त्यांच्या

आयुष्यक्रमावरून दिसतें. ते नाशिक येथे विद्यार्थी असताना केतकर टाउनहॉलमध्ये एक वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सावरकरांना तिच्यासंबंधी माहिती फार उशिरा समजली. त्या वेळचे नाशिक येथील लोकसेवा पत्राचे संपादक कै. अनंत वामन बर्वे यांना सावरकरांचा हा वक्तृत्वाचा गुण माहीत होता. त्यांनी सावरकरांना वक्तृत्वस्पर्धेत भाग घेण्याकरिता सुचविलें. सावरकरांनी आपला अर्ज स्पर्धेच्या आधल्या दिवशी व्यवस्थापकांकडे दिला होता. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचा क्रम शेवटचाच लागला होता. बहुतेक सर्व स्पर्धकांचीं भाषणें झाल्यानंतर सावरकरांना भाषण करण्याकरिता बोलाविण्यात आलें. त्यांचें भाषण इतकें उत्तम झालें की, बराच वेळ झाल्यामुळे जरी लोक कंटाळले होते, तरी देखील त्यांचें भाषण सुरू होताच सर्व श्रोतृसमुदायाचें लक्ष त्यांचेकडे खेचलें गेलें व परीक्षकांनाही सावरकरांनाच पहिलें बक्षीस द्यावें लागलें. बक्षीस जाहीर झाल्यानंतर परीक्षकांनीच त्यांना विचारलें की हें भाषण तुम्हांस कोणी लिहून दिलें काय ? तेव्हा त्या भाषणातील आशय व सर्व भाषण स्वत:च्या विचारांनीच व वाचनांतूनच तयार झालें आहे, त्यात तिऱ्हाईत माणसाचा काहीही भाग नाही असें त्या वेळी त्यांनी परीक्षकांना सांगितलें. तेव्हा परीक्षकांनाही फार आश्चर्य वाटलें.

सावरकर जसजसे वयाने मोठे होत गेले तसतशी त्यांच्या वक्तृत्वशक्तीची उत्तरोत्तर वाढ झाली. अभिनव भारत या संस्थेची सन १९०० साली स्थापना झाली. अभिनव भारताच्या गुप्त बैठका दर शनिवारी भरत. त्यांत निरनिराळ्या विषयांवर चर्चा व भाषणें होत. त्या भाषणांमुळे त्यांना वक्तृत्व करण्याची शैली अवगत

झाली. त्याबरोबर त्यांचा हजरजबाबीपणा, विरुद्ध बाजूस नामोहरम करण्याची त्यांची पद्धति आणि वादविवादातील तर्कशुद्ध विचारसरणी या त्यांच्या गुणांचा परिपोष झाल्यामुळे त्यांच्या वक्तृत्वाचें तेज वाढू लागलें. त्यातच त्यांचें इतिहासाचें सूक्ष्म अध्ययन व इतिहासातील तत्त्वांची त्या वेळच्या परिस्थितीशी जुळणी करून त्यावरून ठरविलेले सिद्धान्त आणि ते निर्भयपणे समाजापुढे मांडण्याची त्यांची पद्धति यांचाही त्यांच्या अंगी असलेल्या वक्तृत्वाच्या गुणावर विशेष परिणाम होत असे.

सावरकर इंग्लंडमध्ये गेले तेव्हा त्याचें वय अवघे २३-२४ वर्षांचें होतें. त्यांना पहाडी आवाजाची देणगी असल्यामुळे त्या ऐन उमेदीच्या काळात त्यांनी आठदहा हजार श्रोतृसमुदाय असलेल्या सभा मंत्रमुग्ध केल्या होत्या. त्यांचें वास्तव्य इंग्लंडमध्ये व नंतर हिंदुस्थानातील तुरुंगांत व अंदमानांतील तुरुंगांत गेलें असल्यामुळे त्यांचा पुष्कळसा काळ बंदिखान्यांतच गेला. ते सुटून आल्यानंतर रत्नागिरीस स्थानबद्ध असतानाही राजकीय चळवळीपासून त्यांना अलिप्त ठेवण्यात आलें होतें. तरी सामाजिक सुधारणांच्या चळवळीत व विशेषतः अस्पृश्यता निवारणाच्या आंदोलनात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. त्यांच्या वक्तृत्वाच्या गुणाला त्या वेळेपासून विशेष वाव मिळाला. स्वतः सावरकरांनी वक्तृत्वकला कशी कमाविली या बद्दल आपल्या आत्मचरित्रात स्वतःच खालीलप्रमाणे लिहून ठेविलें आहे. ते म्हणतात :

"मी बारा तेरा वर्षांचा असताना वक्तृत्वकला या विषयावरील दोन पुस्तकें वाचलीं. त्यांत निबंध कसे असावेत, विषयप्रवेश, विषयविवेचन, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, खंडन, मंडन, संकलन, समारोप इत्यादि निरनिराळ्या ग्रंथकारांच्या निरनिराळ्या पद्धतींतील

नियमांची तुलना मी करून पाहिली. तशा पायऱ्यांनी मी निबंध लिही. प्रथम असा पद्धतशीर निबंध लिहिण्यास शिकणेंच उत्तम. जसें प्रथम ओळीनें सप्तसूर शिकणें उत्तम; मग आपण लायक झालो म्हणजे त्या सुरांची उलटीं सुलटीं वाटेल तशी सुरेल मिश्रणें करू शकतो. तसेंच एकदा विषयाची मांडणी पद्धतशीर कशी असते आणि कां असते हें सर्व कळलें आणि हात बसला म्हणजे मग निबंधपद्धतीच्या त्या मूळ विषयाच्या नियमांचा क्रम आपण हवा तसा बदलू शकतो, किंवा एकादी नवीन पद्धति किंवा नवीनच शैली प्रसवणारी अपूर्व प्रतिभाही एखाद्यात विकसित होते. पण मूळ निबंध हा वक्तृत्वाचा दुय्यम भाग होय. वक्तृत्वाचा आत्मा म्हणजे भावना. विषयाशी स्वतःचें तादात्म्य झालें पाहिजे. तें स्वतःला इतकें पटलें पाहिजे की दुसऱ्याला तें पटविण्यावाचून चैनच पडू नये. यास्तव निबंध किंवा व्याख्यान लिहून काढण्यापेक्षा तें मूलतः अगदी विचारातच स्पष्ट व्हावें. कारण जसजशी भावना उद्दीप्त होते तसतशी भाषाशैली व आदेश, मुद्राविकार आणि अभिनय सहजगत्या यथावत् प्रकट होत जातात. ही मनाची तन्मयता प्रकट होण्यात ज्या भाषेतून ती प्रकट व्हावयाची तीवर इतकें प्रभुत्व हवें की ते ते शब्द, अलंकार, आणि वचनें हीं सर्व भावनांच्या मागोमाग धावत चाललीं पाहिजेत. मी लहानपणापासून अनेक कविता, सुभाषितें पाठ केलेलीं असत. विशेषतः गद्यात वाक्यें न सोडता त्यांच्या सहज गतीतच पद्यांतील सुंदर अवतरणें गुंफून देण्याची मला फार आवड असे.

"वक्तृत्वाचे काही घटक जरी उपजत देणगीने मला प्राप्त झाले होते, तरी त्यांचा विकास करून त्यांना कलेचें लालित्य प्राप्त करून

देण्यास्तव मी प्रयत्नही तसेच केले. वक्तृत्वकलेच्या अभिरुचीवरच मी डेमॉस्थेनीस, सिसेरो, शेरेडन इत्यादींच्या इंग्रजी आणि काही मराठी चरित्रांचा आणि लेखांचा अभ्यास करीत होतो. त्यांच्या भाषणातील उत्कृष्ट भाग मी पाठ केले. मेकॉलेच्या इंग्लंडच्या इतिहासातील काही वक्तृत्वशाली छेदकांचें माझें आवडीचें पाठांतर असे. महाभारताच्या सभापर्वातील आणि कर्णपर्वातील श्रीकृष्णाचीं तीं अमोघ, ओजस्वी भाषणें पद्यातून आणि गद्यातून मी वारंवार वाची व स्वतःशीच म्हणून दाखवी. तीं मला फार आवडत.

"माझ्या पहिल्या सार्वजनिक भाषणाचें कौतुक करणारे नाशिकचे प्रख्यात शीघ्र कवि, टिळकांचे निस्सीम भक्त, नाशिकचे पुढारी आणि वकील बळवंत खंडूजी पारख हे होते. शब्दांवर कोटया करण्यात ते फार पटाईत असत. सावरकर या नांवावर त्यांनी कोटी केली ती अशी की, 'ज्याचा कर आपल्या पडत्या राष्ट्रास सावरतो, तो सावरकर.' मोठमोठ्या परिषदांची सुंदर घटना घडता घडताच सुंदर फटक्यांतून रचना करून ते गात असत. त्यामुळे ते सर्वांस हवेसेच वाटत."

सावरकरांच्या पुढील आयुष्यात दूरध्वनिक्षेपण यंत्र निघालें होतें. त्या यंत्राचा व सावरकरांच्या वक्तृत्वाचा संयोग इतका बेमालूम बनून गेला होता की, तें यंत्र सावरकरांच्या वक्तृत्वाच्या लहरी उठविण्यासाठीच जणू अवतीर्ण झालें असावें असें वाटे. सावरकरांच्या आवाजाचे चढउतार, त्यांच्या वक्तृत्वाची गति, आणि त्यांच्या वाणीची गोडी हे सर्व गुण जणू काय या यंत्राच्या वैशिष्टयाशी मिलाफ होण्यासाठीच सिद्ध आहेत असा भास होई.

या यंत्राच्या साहाय्याने बोलताना चांगल्या चांगल्या वक्त्यांचा आवाज निष्कारण ताणला जातो व उगीचच वाढल्यामुळे वक्तृत्वाचा प्रसंगी बेरंग होतो. सावरकरांच्या आवाजातील या बाबतीतील अप्रतिम ठेवण यंत्राला व स्वतःला सांभाळून घेऊन श्रोत्यांना संतोष व समाधान देत राही. यंत्र व सावरकर ही जोडी समोरासमोर ठाकली की, अगदी अल्प काळात यंत्र सावरकरमय होई, व सावरकर यंत्रमय होत असत असे सावरकर चरित्रकर्ते कै. शिवराम लक्ष्मण करंदीकर यांनी वर्णन केलें आहे.

विद्वत्ता, कल्पकता, श्रोत्यांच्या मनावर छाप टाकून त्यांना चेतविण्याचें सामर्थ्य इत्यादि वक्तृत्व गुणांच्या बाबतीत सावरकर व त्यांना गुरुस्थानी असलेले कै. शिवराम महादेव परांजपे यांच्यामध्ये बरेंच साम्य असल्याचें लोक सांगतात. परंतु सावरकरांच्या वक्तृत्वशैलीचा प्रकार भिन्न असे असें विचारांती आढळून येई. त्या उभयतांच्या शारीरिक घटनेतही बराच फरक होता. कै. प्रो. अण्णासाहेब परांजपे यांची शरीरयष्टि उंचपुरी, भरदार, पूर्वीच्या पिढीतील त्यांचा ऐटदार अंगरखा, विशाल ललाट, कानातील मोत्यांची भिकबाळी, रुइफुली उपरणें व लालभडक जोडा या रुबाबदार व्यक्तिमत्त्वापुढे सावरकरांचें व्यक्तिमत्त्व, शरीरसौष्ठव व पेहेराव अगदी साधा व अगदी सामान्य असा असे. अण्णासाहेबांचें वक्तृत्व भावनाप्रधान असून त्याचा खुलणारा आविष्कार, भरपूर रसिक श्रोतृवर्ग आणि प्रसन्न चित्तवृत्ति व वेळेची अनुकूलता यावर अवलंबून असे. त्यांच्या वक्तृत्वाचा भर विशेषतः त्यांच्या स्फूर्तीवर आधारित असे. सावरकरांच्या वक्तृत्वातही स्फूर्तीचा अंश असे व त्यामुळेच वक्तृत्वाच्या बाबतीत त्यांचे अण्णासाहेब परांजपे यांच्याशी साम्य असल्याच्या कल्पनेचा पुष्कळांना

मोह पडल्याचें भासतें. परंतु स्फूर्तीच्या ईश्वरदत्त गुणाखेरीज सावरकरांनी आपल्या अभ्यासाने तो स्फूर्तीचा हिरा परिश्रमाने मिळविलेल्या वक्तृत्वाच्या कोंदणात बसविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांनी व्याख्यान देण्यापूर्वी व्याख्यानाच्या विषयावर निबंध लिहून काढण्यापासून सुरवात करून विषयप्रवेश, विषयविवेचनाच्या सर्वमान्य पद्धती, विरुद्ध मुद्द्यांचें खंडन, स्वतःच्या मुद्द्यांचें मंडन, व्याख्यानाचा समारोप चटकदार रीतीने व प्रस्तुत विषयाखेरीज अवांतर ज्ञानाची त्यात भर घालून ते आपल्या भाषणात विविधता निर्माण करीत. मूळची ईश्वरदत्त स्फूर्ति, कित्येक वर्षें केलेले अविश्रांत श्रम व वक्तृत्वाचा अखंड सराव यांचा परिणाम म्हणून सावरकरांचें अमोघ वक्तृत्व विकसित झालें होतें. व्याख्यानाच्या विषयाशी तद्रूप झाल्याशिवाय विषयाच्या प्रतिपादनात भावोत्कटता निर्माण होत नाही हेंही सावरकरांना माहीत होतें.

वर लिहिल्याप्रमाणे सावरकरांचा पेहेराव इतका साधा असे की, देशप्रेमाच्या तंद्रीत ज्याने आयुष्यभर कष्ट सोसले तीच व्यक्ति वाक्पांडित्य करणारी आपल्यापुढे व्याख्यानासाठी उभी आहे, किंवा दुसरीच कोणी साधीसुधी व्यक्ति आपणांपुढे उभी आहे अशा शंकेत श्रोत्यांचें मन क्षणभर निमग्न व्हावें अशी त्यांची सामान्य वेषभूषा होती. देशभक्तीला अलीकडे जी नाटकी साधेपणाची व व कृत्रिम गबाळेपणाची झालर लागली आहे तीही प्रकार त्याच्या वेषात नसे; किंवा जुन्या पिढीतल्या कित्येक देशभक्तांच्या पेहेरावात जो एक पेशवाई रुबाब आढळावयाचा तोही त्यांच्यात आढळत नसे.

त्यांच्या हातात नेहमी राहणारी छत्री समोरच्या टेबलावर ठेवून जेव्हा सावरकर व्याख्यानाला सुरवात करीत, तेव्हा पहिली काही मिनिटें हा वक्ता स्पष्टपणे काहीही घोटाळा न करता विषय सांगणार आहे व जें त्यास सांगावयाचें आहे तें त्याच्या मनाला बरोबर पटलेलें आहे अशी श्रोत्यांची समजूत होई. शब्दांचें अवडंबर न करता आवाजात शांतपणा आणून विशेष अभिनय न करता ते श्रोत्यांवर आपल्या भाषणाची मोहिनी पसरवीत व विषय प्रतिपादनाच्या भरात वक्तृत्वाच्या सहज वेगामुळे सावरकरांच्या भावना उद्दीपित होत व त्या उद्दीपित भावनांना शोभेल अशी भाषाशैली, उपमा, अलंकार, कोटचा त्यांना आपोआपच स्फुरू लागत. भाषणाच्या उत्कटतेमुळे त्यांना आवेशही चढे व वाणीची गतिही वृद्धिगत होई. मुद्रेचा आविष्कार, अभिनय इत्यादि रूपाने त्यांच्या मनातील आशयाचा आविष्कार प्रकट होई. अशा रीतीने श्रोत्यांना ते तन्मय करून सोडीत. सावरकर आपल्या वक्तृत्वाच्या भरात असताना काही लोकांना त्यांच्या वक्तृत्वात नाटकीपणाचा भास होत असे. परंतु सहस्रावधि लोकांना त्यांच्या भाषणामुळे जो चमत्काराचा प्रत्यय येई तो केवळ वक्त्याच्या तन्मयतेचाच परिणाम असे.

काही विशेष प्रसंगीं त्यांचीं व्याख्यानें फारच रंगत. त्यांच्या व्याख्यानापूर्वी त्यांच्या विचारसरणीविरुद्ध वातावरण निर्माण झालें असलें तर त्यांच्या वक्तृत्वाला विशेष धार येत असे. धुळयाचे कै. शंकर कृष्ण देव हे नाशिकला सार्वजनिक व्याख्यानाकरिता आले असताना १९०५-०६ चे सुमारास त्यांना मित्रमेळयाच्या म्हणजे अभिनव भारताच्या गुप्त बैठकीकरिता बोलाविण्यात आलें होतें. त्या वेळी अभिनव भारताच्या सदस्यांचा

मेळावा श्री. देवांचे विचार त्या वेळच्या राजकारणाबद्दल ऐकण्यासाठी उत्सुक होता. पुष्कळच गर्दी जमली होती. कै. धोंडभट विश्वामित्रांच्या घरात लहानशा जागेत पुष्कळ खेचाखेच झाल्यामुळे तंग वातावरण झालें होतें. उदबत्त्यांचा सुवास, शिवाजी महाराजांच्या तसबिरीस घातलेल्या फुलांचा सुगंध, यांमुळे वातावरण खुलून गेलें होतें. अशा स्थितीत श्री. देव यांचें व्याख्यान सुरू झालें. त्यांनी ब्रिटिशांची राजवट किती बळकट आहे व त्यांतून सुटणें किती अवघड आहे, ब्रिटिशांचें सामर्थ्य व हिंदुस्थानच्या प्रजेवर त्यांची अभेद्य छाप यांचें रसभरित वर्णन केलें, व त्या पारतंत्र्याच्या शृंखलांतून सुटण्याची शक्यता किती कमी आहे व त्या मानाने स्वातंत्र्याकरिता होणारे प्रयत्न किती क्षुल्लक आहेत यासंबंधी नैराश्य उत्पन्न करणारे विचार त्या सभेपुढे मांडले. त्यातून सुटण्याचा कोणताही निश्चित मार्ग त्यांनी दर्शित न केल्यामुळे श्रोतृसमुदायावर एक प्रकारची निराशेची छाप दिसू लागली. त्या वेळी त्यांचें भाषण संपल्यावर सावरकर बोलावयास उठले.

सावरकरांनी श्री. शंकरराव देवांच्या व्याख्यानाबद्दल आदर प्रदर्शित करून त्यांच्या भाषणाचा अर्थ काय करावयाचा व त्यांचा हेतु वस्तुतः काय आहे हें विशद करून सांगितलें. त्यांचें भाषण हें तरुणांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या विचारांना आव्हानच आहे, व तरुणांची त्याबद्दलची प्रतिक्रिया काय होते याची परीक्षाच पहाण्याचा त्यांचा विचार आहे, असें सांगून सावरकरांनी मॅझिनीच्या वेळची इटलीची परिस्थिति, व इटलीवर साम्राज्यशाहीचें किती दडपण होतें, याचें वर्णन करून, हल्लीच्या ब्रिटिश साम्राज्याच्या दडपणापेक्षाही तें जास्ती जुलमी होतें, व जास्त समर्थ होतें, व

असें असूनही तेथील मॅझिनी, गॅरिबाल्डी व काऊंट काव्हूर या देशभक्तांनी त्यातूनच मार्ग काढला व आता तर सबंध आशियाखंडात राज्यक्रांति सुरू झाली आहे, आता तिला कोणासही थांबविता येणार नाही हें जपानच्या उदाहरणावरून त्यांनी विशद करून सांगितलें. त्या बुटक्या, भातखाऊ राष्ट्रानें मांसखाऊ व अगडबंब रशियाला चीत केलें, तें या राज्यक्रांतीच्या जीवनावरच होय. जपानातून निघून तो प्रवाह आता चीनमध्ये शिरत आहे. चीनमध्ये ज्या भयंकर गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत, त्यामुळे आता सुदैवाने आशियामध्ये परतंत्रांना स्वातंत्र्य देणारी शक्ति असलेला एक राज्यक्रांतीचा प्रवाह सुरू झाला आहे. हा प्रवाह म्हणजे हिंदुस्थानची जागृति होय. ब्रिटिश साम्राज्याच्या शक्तीचा होत चाललेला क्षय, यामुळे ब्रिटनमधील विचारी माणसांना आता विवंचना वाटत आहे. इंग्रजांची अशक्तता दूर करण्यास काय युक्ति योजावी या विचारात ते आहेत. इंग्लिश लोक आता अगदी घाबरले आहेत. त्यातूनही आयर्लंडची चळवळ, इजिप्तमधील उत्क्रांति चळवळ, हिंदुस्थानातील स्वदेशो व बहिष्काराची चळवळ वगैरे चळवळींनी लंडनच्या उरात धडकी भरली आहे, ज्या प्रचंड आरमाराचें व सैन्याचें वर्णन श्री. देवांनी केलें, त्या आरमाराची व सैन्याची खरी योग्यता इंग्लंडच्या पूर्ण ध्यानात आलेली आहे. सभोवती सर्वत्रच अशा प्रक्षोभक घटना घडत आहेत, त्यावरून आपणांला निराश होण्याचें कारण नाही. अशा तऱ्हेचें आशादायक, स्फूर्ति देणारें व उत्साहजनक भाषण सावरकरांनी केल्यामुळे देवांच्या भाषणामुळे जी उद्विग्नता सभेमध्ये पसरली होती ती पार नाहीशी झाली व सर्व प्रेक्षकांमध्ये आनंदी व उत्साही वातावरण निर्माण झालें.

अशाच एका रंगलेल्या व्याख्यानाचें वर्णन कै. शि. ल. करंदीकर यांनी आपल्या सावरकर चरित्रात केलें आहे. अहमदाबादच्या हिंदुसभेच्या अधिवेशनानंतर तेथील महाराष्ट्रीय समाजाच्या वतीनें सावरकरांना मानपत्र अर्पण करण्यात आलें. त्या समाजाच्या पुढारी मंडळींपैकी प्रा. रामभाऊ आठवले यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात हेतुतःच काही प्रश्नांना चालना दिली व असें सुचविलें की, अशा सर्व प्रश्नांचीं समर्पक व सडेतोड उत्तरें सावरकरांनी द्यावीत, अशी श्रोत्यांचीं अपेक्षा आहे. त्या वेळचें सावरकरांचें व्याख्यान म्हणजे श्रोत्यांना मिळालेली पंचपक्वान्नांची मेजवानीच होती. सन १९४२ च्या ऑगस्ट महिन्यात काँग्रेस पुढाऱ्यांची धरपकड सुरू झाली. त्या वेळी हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांचा मेळावा जमला होता. त्याला सार्वजनिक सभेचें स्वरूप आलें होतें. त्या वेळी सावरकरांचें प्रकट व्याख्यान झालें. तें किती ओजस्वी होतें, हें पुण्यातील अनेक लोकांना स्मरत आहे. त्या सभेला आलेल्या काही काँग्रेसजनांनीही त्या दिवशी सावरकरांनी केलेला बिनतोड कोटिक्रम ऐकून माना डोल्याविल्या.

सावरकरांच्या उत्कृष्ट भाषणांपैकी त्यांचीं अभिनव भारत सांगता समारंभातील पुणें येथील व्याख्यानें व नाशिकच्या अभिनव भारत उद्घाटनाच्या समारंभाच्या वेळचीं त्यांचीं भाषणें हीं उदाहरणें म्हणून सांगता येतील.

१९६० मध्ये त्यांच्या मृत्युंजयदिनानिमित्त पुण्यात त्यांचें सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर व्याख्यान झालें. त्या वेळी त्यांनी अफाट जनसमूहापुढे जें भाषण केलें, तें सर्वोत्कृष्ट म्हणता येईल. ते त्या वेळी बसूनच बोलले, त्यांची प्रकृति अगदी

अशक्त झालेली होती. त्यांना सभास्थानी धरूनच आणावें लागलें. त्यांचा अशक्तपणा त्यांनी आरंभी जे उद्‌गार काढले त्यावरूनच श्रोतृवर्गाच्या ध्यानात आला! त्या वेळचें सावरकरांचें व्याख्यान आरंभी हलक्या आवाजात सुरू झालें. तरी दूरध्वनीची व्यवस्था चांगली असल्यामुळे तें भाषण त्यांच्या हलक्या आवाजातही लाखो लोकांच्या अफाट जनसमूहासही ऐकू आलें. त्यांची अशक्तता मात्र त्यांच्या क्षीग आवाजातून जाणवत होती. भाषणाच्या आरंभी त्यांनी सांगितलें की, माझी प्रकृति क्षीण झाल्यामुळे दहा पांच मिनिटांपेक्षा जास्त वेळ मला भाषण करता येणार नाही. परंतु जसजसें त्यांचें भाषण पुढे होऊ लागलें तसतशी त्यांच्या भाषणास उत्साहाची गति प्राप्त झाली व पुढे सुमारे तासभर त्यांचें भाषण झालें. त्या भाषणात हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्याबद्दल त्यांनी स्वतः समाधान व्यक्त केलें, व जरी देशाची विभागणी झाली असली तरी मिळवावयाच्या राहिलेल्या एक चतुर्थांश भागाचें स्वातंत्र्य मिळविण्याचें काम त्यांनी पुढील तरुण पिढीवर सोपवून आपलें भाषण संपविलें.

सावरकरांचें हिंदी वक्तृत्व हें हिंदीभाषेत संस्कृत शब्द बरेच उपयोगात आणल्यामुळे हिंदी जाणणाऱ्या लोकांना मात्र तें काहीसें निराळेंच वाटे. हिंदी भाषा त्यांनी शास्त्रोक्त रीतीने अभ्यासली नसावी असें त्यांच्या हिंदीतील वक्तृत्वामुळे लोकांच्या ध्यानात येई. परंतु आपले विचार श्रोतृवृंदांना नीट समजावून सांगणें हाच भाषेचा मुख्य उद्देश मानला तर तो उद्देश मात्र त्यांच्या हिंदी व्याख्यानांतूनही सफल होत असे. राष्ट्रीय दृष्टीने जे विचार ते लोकांपुढे मांडीत ते विचार श्रोतृसमाजाला पूर्णपणे पटतील अशा रीतीने आपल्या भाषणाची ते मांडणी करीत असत. उत्तर

हिंदुस्थानात त्यांचा दौरा झाला व काही ठिकाणी हिंदु सभेचीं अधिवेशनें झालीं. त्या बहुतेक सर्व ठिकाणी त्यांचीं भाषणें हिंदीतूनच झालीं. त्यामुळे सावरकरांचीं मतें लोकप्रिय झालीं. सावरकरांचें वैशिष्टय राजकारणात किती आहे हें जनतेस पूर्ण माहीत झालें. भागानगरच्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी अहमहमिकेने जे लोक प्रवृत्त झाले तो त्यांच्या भाषणाचा प्रत्यक्ष परिणाम होय. अखिल हिंदुस्थानात हिंदूंच्या मनातील न्यूनगंड लुप्त होऊन हिंदु लोकांनी संघटितपणे कार्य केल्यास कोणत्याही परिस्थितीत ते सामर्थ्यवान् होऊन त्यांच्यावरील अतिक्रमणाला यशस्वी रीतीने तोंड देऊ शकतात असें हिंदु जनमनावर ठसविण्याच्या कामी सावरकरांच्या हिंदी भाषणांचाही फार मोठा भाग आहे.

* * *

# (१०)

## नाटककार सावरकर

सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीत माझें साहित्य हें केवळ प्रचारात्मक स्वरूपाचें आहे हें सावरकरांचे उद्गार त्यांच्या नाटकांच्या संबंधात विशेषच अन्वर्थक आहेत. त्यांचें सर्वच वाङमय त्यांच्या जीवनदृष्टीचा, त्यांच्या देशसेवेचा व जीवनकार्याचा एक अपरिहार्य असा आविष्कार आहे. "अलंकार, कविता, तत्त्व, ह्यांची मलाही आवड आहे; परंतु जी अपथ्य आवड तेंच व्यसन, व जें अप्रासंगिक तेंच अपथ्य," अशी त्यांची भूमिका असल्यानें त्यांनी केवळ कलानिर्मितीच्या उद्देशाने वा नाट्य-कला-विलासाच्या हेतूने नाटकें न लिहिता आपल्या ध्येयसिद्धीचें, समाजजागृतीचें एक प्रभावी साधन, ह्याच दृष्टीने नाटकांचें लेखन केलें. त्यामुळे सावरकरांच्या नाटकांच्या विचाराच्या संदर्भात कलामूल्य व नाट्यमूल्य ह्यांना स्वाभाविकपणेच गौणस्थान मिळणें क्रमप्राप्त झालेलें आहे. "हे मातृभूमि तुजला मन अर्पियेलें । वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें । तूतेचि अर्पिलि नवी कविता रसाला । लेखाप्रती विषय तूचि अनन्य झाला ।" हें त्यांचें निवेदन त्यांच्या नाट्यलेखनालाही लागू पडणारें आहे. "मनुष्य जातीच्या अधिकात अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेंच साहित्य श्रेष्ठ व सुप्रासंगिक होय. आनंद व करमणूक हीं मानवहितास काही प्रमाणात हितकारक असल्याने त्यांचाही अन्तर्भाव योग्य त्या प्रमाणात वरील ध्येयात होतो. परंतु केवळ करमणूक हें काही कर्तव्य

नव्हे, " अशी त्यांची धारणा होती. आणि म्हणून कलाविलास व लोकरंजन ह्यांना अधिक महत्त्व न देता त्यांनी त्यांच्या दृष्टीनें लोकहिताला, हिंदुराष्ट्रहिताला व हिंदु समाजाच्या उद्‌बोधनाला प्राधान्य दिलें. राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हीच त्यांची व म्हणून त्यांच्या साहित्याचीही आद्य चिंता होती. राष्ट्रजीवन व साहित्य ह्यांच्या अन्योन्य संबंधाविषयीची आपली भूमिका ठामपणे स्वीकारून त्यांनी नाटक हें साधन आपल्या विचारांच्या प्रचारासाठी उपयोजिलें.

"समाजाला मंगलास्पद अशा ध्येयाकडे प्रवृत्त करण्यास, नाट्यकला जर ती उदात्ताशी समरस होईल तर तें एक अत्यंत उपयुक्त साधन आहे." हाच दृष्टिकोन स्वीकारून सावरकरांनी नाट्यलेखन केलें आहे. त्यामुळे साहजिकच कलात्मकतेपेक्षा ध्येयात्मकतेलाच, त्यांच्या नाटकात त्यांनी प्रतिष्ठित केलेलें दिसतें. सावरकरांच्या नाटकांचा परामर्ष घेताना, कलेचे निकष लावण्यापेक्षा राष्ट्रीय हितबुद्धीचा निकषच अधिक महत्त्वाचा ठरणार आहे ह्यात शंका नाही.

भारताच्या जीवन-मरणाशी निगडित असलेल्या आणि त्यांच्या दृष्टीने अटळ स्वरूपात स्वीकारार्ह असलेल्या विचारांचा, मनोभावांचा व वृत्तीचा पुरस्कार करून, राष्ट्रीय जागृतीसाठी व अभ्युत्थानासाठी आपल्या प्रिय तत्त्वांचा प्रसार करणें, हेंच त्यांच्या नाट्यलेखनाचें उद्दिष्ट होतें. तंत्रशुद्धता, स्वभावपरिपोष, कथानकाची कलात्मक गुंफण, संवाद, रचनाकौशल्य, इत्यादि कलेच्या अंगांपेक्षा परिणामकारक रीतीने प्रेक्षक-वाचकांच्या भावना उचंबळून सोडून, त्यांच्या मनावर आपला विचार ठसविणें, हीच गोष्ट नाटकांच्या यशासाठी त्यांनी आपल्यापुरती पुरेशी मानली व वैचारिक आणि भावनात्मक प्रबोधनाचीच मातबरी विशेष मानली.

उ:शाप, उत्तरक्रिया व संन्यस्त खड्ग, हीं सावरकरांची तीन नाटकें. हीं नाटकें सावरकरांनी सन १९२७ ते १९३२ ह्या कालावधीत रत्नागिरी येथील आपल्या स्थानबद्धतेच्या कालात लिहिलीं आहेत. हिंदुस्थानच्या तत्कालीन राजकारणाचें स्वरूप, त्या राजकारणामागील विचारप्रणालि, स्पृश्यास्पृश्य भेद व हिंदु-मुसलमान प्रश्न ह्यांना आलेलें महत्त्व, सत्य, हिंसा–अहिंसा ह्या संबंधीचा तात्त्विक ऊहापोह, तदनुरूप व्यवहार ह्या सर्वांचे, समाजमनावर होणाऱ्या व विशेषत: हिंदुसमाजावर होणाऱ्या परिणामांची सावरकरांना वाटणारी चिंता ह्या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तरच सावरकरांनी नाटकांसाठी, निवडलेले विषय व त्यांची मांडणी ह्यांचें स्वरूप स्पष्ट होईल. चिरंतन महत्त्वाचीं जीवनमूल्यें, मानवी मनाचे विस्मयकारक आविष्कार, जीवनाची विविधता व भव्यता ह्या सर्वांचें आवाहन पोहोचू शकेल, अशी काव्यात्मता, कलादृष्टि, चिंतनशीलता व रसिकता अंगी असूनही, सावरकरांनी त्या आवाहनापेक्षा तत्कालीन परिस्थितीने हिंदुसमाजाला दिलेलें आव्हान, जास्त महत्त्वाचें मानलें व आपले नाट्यविषय निवडले. मुमुर्षु हिंदुसमाज बलसंपन्न व विवेकनिष्ठ कसा होईल, आपली अस्मिता टिकवून तो जयिष्णु वर्धिष्णु कसा होईल, ह्या चिंतेनेच सावरकरांचें मन ह्या काळात ग्रस्त झालेलें होतें. स्वातंत्र्यलालसा पूर्वीसारखीच प्रखर असली तरी स्वातंत्र्याचा अर्थ केवळ ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वापासून मुक्त होणें एवढाच आता राहिला नव्हता. स्वत्वाचें संरक्षण व संवर्धन करणारें स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होतें. राजकीय घडामोडी व इतिहास, हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व ही निष्ठा चेतवीत होत्या. हिंदुसमाजाची आत्मघातकी रूढिप्रियता व परधार्जिणी वृत्ति आणि आत्मविस्मृति पराकोटीला गेली होती.

तिच्या दुष्परिणामांच्या जाणिवेने, अस्वस्थ व प्रक्षुब्ध झालेल्या सावरकरांच्या मनाचा आविष्कार व ह्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची परिस्थितिजन्य प्रतिक्रिया म्हणजे सावरकरांचीं नाटकें !

## उःशाप

उःशाप हें नाटक सन १९२७ सालचें, हिंदुजातीची अस्पृश्यतेच्या रूपाने मिळालेल्या शापातून मुक्तता व्हावी, अस्पृश्य जातीला स्पृश्यांसम सर्वाधिकार यापुढे मिळावा, आणि हिंदु जातीला हितकर असा समानतेचा उःशाप मिळावा ह्या तळमळीने चोखामेळा ह्या संताच्या कथानकाला अभिनीत करण्यासाठी सावरकरांनी हें नाटक रचिलें.

संत चोखामेळ्याची निःसीम व अंतःस्फूर्त भगवद्भक्ति, त्याचा केवळ अस्पृश्य म्हणून झालेला छळ, त्याची उदार मनस्कता व हिंदुधर्मनिष्ठा, प्रत्यक्ष परमेश्वराने—श्रीकृष्णाने अन्यायाचें परिमार्जन करून त्याचें आत्मीयतेने केलेलें रक्षण ह्या परिचित कथेचा आधार ह्या नाटकास आहेच; परंतु केवळ संत जीवनावर नाटक लिहून भाबड्या भक्तीला तृप्त करणें हें सावरकरांचें उद्दिष्ट नाही. ह्या कथानकापेक्षा कमलिनी व शंकर ह्या अस्पृश्य प्रेमिकांची कथा सावरकरांनी विस्ताराने रंगवून अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या विविध पैलूंवर स्वच्छ प्रकाश पाडला आहे. स्पृश्य वर्गाने केलेला भयंकर व आडमुठा अन्याय असह्य झाल्याने, शंकरने केलेला हिंदु धर्माचा त्याग आणि मुसलमान धर्माचा स्वीकार, आणि कमलिनीने, स्पृश्य वर्गाने केलेली सारी अवहेलना व छळ सोसूनही हिंदुधर्मावर ठेवलेली अविचलित निष्ठा,

आणि त्यासाठी आपल्या व्यक्तिगत प्रेमजीवनाचा होम करण्याची दर्शविलेली तयारी ह्यांचें परिणामकारक चित्रण सावरकरांनी ह्या नाटकात केलें आहे. स्पृश्यवर्गाने, अस्पृश्यता मानण्याचें पाप व अविचार करू नये, अस्पृश्यांनी वैतागाने, चिडीने वा प्रलोभनामुळे, हिंदुधर्माचा त्याग करू नये व हिंदूंनी माथेफिरू मुसलमानांच्या आक्रमक, स्वार्थी, कडव्या धर्मांधतेला खतपाणी घालून आपल्याच हाताने आपला नाश ओढवून घेऊ नये, हा संदेश देणें हें ह्या नाटकाचें उद्दिष्ट होय. संघर्ष हा नाटयाचा प्राण आहे, याची जाणीव नाटककाराला आहे. परंतु सावरकरांनी ह्या नाटकात उभा केलेला संघर्ष, मुख्यत: वैचारिक स्वरूपाचा आहे. हा संघर्ष खरा धर्म व रूढिग्रस्त आचार ह्यांतील आहे. धर्माच्या नावाने केला जाणारा आत्मघातकी अधर्म व अन्याय हा खऱ्या धर्मशीलतेचा विध्वंस कसा करतो, व लौकिक दृष्टयाही किती विनाशकारी होऊ शकतो हें सावरकरांनी ह्या नाटकात अत्यंत तळमळीने आणि बुद्धीला आवाहन करून, विविध प्रकारे दर्शविलें आहे. अस्पृश्याला जनावरापेक्षाही तुच्छ लेखणारी रूढिप्रियता, धर्मांतर केलेल्या अस्पृश्यांना मात्र लाचारीने मानाचे मुजरे करण्यात धन्यता मानते, हा विदारक अनुभव सावरकरांनी ह्या नाटकात प्रत्ययाला आणून दिला आहे. त्यासाठी स्पृश्य वर्गातील ब्राह्मण-क्षत्रियांची वृत्ति स्पष्ट करणारीं अनेक पात्रें व प्रसंग त्यांनी योजिले आहेत. नाटकातील पात्रांची व प्रवेशांची संख्या त्यामुळे ह्या पाच अंकी नाटकात खूपच व बरीचशी अनावश्यक अशी आहे. त्यामुळे त्याची बांधेसूद रचना साधलेली नाही. पात्रांचे स्वभाव देखील साचेबंद झाले आहेत. सावरकरांचीं अस्पृश्यताविषयक मतेंच हीं पात्रें बोलून दाखवितात. स्वत:ची वेदना,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्व
४५२६४ ... ...
११२५ ...


भावना, व मनोगतें व्यक्त करणाऱ्या स्वाभाविक संवादापेक्षा सावरकरांचींच मतें बोलून दाखविण्याचें कार्य करण्यासाठी निर्माण केलेल्या पात्रांच्या तोंडी घातलेलीं सावरकरांचीं भाषणेंच आपणांस ऐकावयास मिळतात. ह्या भाषणात सावरकरांच्या विचारांची ओजस्विता, तर्कशुद्धता व हिंदु समाजहिताची तळमळ आपल्या प्रत्ययास येते. पण कलापूर्ण नाट्यकृति पाहिल्याचा व वाचल्याचा आनंद मात्र लाभत नाही. पतित म्हणून मानल्या गेलेल्या वेश्येच्या वृत्तीत पावित्र्य दिसावें व धार्मिक म्हणून स्वतःस मानणाऱ्यांच्या वृत्तीत, विचारात व आचारात मात्र अपवित्रता दिसावी, हा विरोधही सावरकरांनी या नाटकात दाखविला आहे. गंगाजी ही वेश्या हें पात्र ह्यासाठी मुद्दाम योजिलेलें आहे.

विविध रसांचा आविष्कार नाटकात असावा. भिन्नरुचि लोकांचें रंजन व्हावें हा हेतुही सावरकरांनी दृष्टीआड केलेला नाही. त्यामुळे भक्तिरस, ध्येयवादी वृत्तीच्या आविष्कारातून प्रकट होणारा वीररस, प्रेमभावनेच्या छटांतून दृग्गोचर होणारा शालीन शृंगार व वर्णश्रेष्ठतेच्या व रूढिप्रियतेच्या आहारी गेलेल्या असंस्कृतांच्या कृतींमधून प्रकट होणारें उपहासगर्भ, उपरोधमिश्र हास्य या सर्व रसांचें दर्शन आपणांला या नाटकात होतें. एक गंभीर प्रवेश व एक विनोदी प्रवेश ह्या तत्कालीन रूढ रचना प्रकाराचाही अवलंब सावरकरांनी केला आहे. पण या सर्वांचा कलासुंदर व अपरिहार्य असा मेळ त्यांना साधलेला नाही. तो साधण्याला ते महत्त्वच देत नाहीत. संभाजी पाटील, त्याची तरुण पत्नी मालिनी, दयासिंह, नारंभट हीं पात्रें मुख्यतः विनोदासाठी नाटकात आणलेलीं आहेत. अर्थात् त्यातूनही अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे विविध पैलू दाखविण्याचा यत्न त्यांनी केला आहे, हें नाकारता

दो. ... १०१५९

येणार नाही. ज्या हिंदु धर्मावर आपण मनःपूर्वक प्रेम करतो त्याने आपणांस लाथाडावें; कुत्र्यापेक्षाही हीन मानावें त्याची दाहक यातना असह्य झाल्याने हिंदु धर्माचा त्याग करावयास सिद्ध झालेल्या शंकराला, ह्याही परिस्थितीत त्या हिंदुधर्माची ही नीच धूळही तुझ्या त्या बाडग्या अंबाऱ्यांच्या श्रीमंतीहूनही श्रेष्ठ आहे, हिंदूंच्या महारवाड्यात त्यांचा पायपोस होऊन राहीन, हिंदूंच्या रूढीच्या हत्तीखाली चिरडून जाऊन मरेन, पण हिंदु म्हणूनच मरेन " असें त्यास बजावणारा त्याचा मित्र किसन व त्याची प्रेयसी कमलिनी ह्यांच्या वृत्तीमधील अंतर सावरकरांनी फार प्रभावी रीतीने दर्शविलें आहे. चोखामेळ्याची विशुद्ध भक्ति, "अस्पृश्यांनी कितीही शुद्ध व पवित्र परोपकारी जीवन घालविलें तरी तें केवळ अमक्या जातीत जन्मले म्हणून त्यांस ह्या जन्मी उद्धार नाही." हें युक्त की अयुक्त, ह्या पापपुण्याच्या निर्णयाचें ओझें आपल्या दुर्बळ खांद्यावरून पांडुरंगाच्या चरणांपुढे टाकून देण्यासाठी व कर्म आणि कर्मसंन्यास ह्या दोन्ही गोष्टी श्रीपांडुरंगाच्या चरणी वाहून पापविसर्जन करण्याचा त्याचा निर्धार ह्याचें अतिशय प्रभावी शब्दांत सावरकरांनी दर्शन घडविलें आहे.

नाट्यरचना व कला या दृष्टीने सदोष असलें तरी आशयाच्या दृष्टीने हें नाटक परिणामकारक आहे. सर्वसामान्य रूढिप्रिय हिंदु माणसाला रंजनाच्या अनुपानाने सावरकरांनी ही प्रभावी विचार गुटिका दिली आहे. अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला ह्या नाटकाचा आजही हातभार लागू शकेल. अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे बघण्याचा परंपरागत स्पृश्य हिंदूंचा दृष्टिकोन व परधर्म-असहिष्णु अशा धर्मांध मुसलमानी वृत्तीचा स्वार्थी दृष्टिकोन ह्यांचें चित्रणही भडक असलें तरी डोळे उघडविणारें आहे. आततायी मुसलमानी

वृत्तीचें दर्शन सावरकरांनी त्यांच्या हिंदु-मुसलमानविषयक अनुभव-जन्य विचारसरणीशी अनुरूप अशा तऱ्हेने घडविलें आहे. बंगष, जाफर अल्ली, इब्राहीम हीं पात्रें रूढिग्रस्त मुस्लिम विचारसरणीचें प्रतिनिधित्व करतात. पण सावरकरांनी केवळ मुस्लिम द्वेषाने प्रेरित होऊन ह्या विचारसरणीवर प्रकाश पाडला आहे असें नाही. अस्पृश्यता इस्लामला मान्य नसल्याने आपण चोख्याचाच पक्ष घ्यावा. मनुष्य जातीच्या समानतेला ज्या हिंदु-रूढी विघातक आहेत, त्यांना उत्तेजन देणें हें इस्लामचें ब्रीद नाही. तें साधत नसेल तर निदान आपण राज्यकर्ते म्हणून निःपक्षपाती-पणे अलग राहून त्यांच्या रूढीचा वाद त्यांनीच मिटवावा असें सांगावें! जर सरकारला हिंदुनिष्ठांच्या रूढीत ढवळाढवळ करण्याची शक्ति नसेल तर आम्ही कोणाचाच पक्ष घेऊ नये असें सुभेदार बंगषखानाला बजावणारा मुल्लाही सावरकरांनी ह्या नाटकात दाखविला आहे.

उःशाप नाटकाचा काल बाह्यतः ऐतिहासिक दिसत असला, तरी सावरकरांनी त्या इतिहासाच्या झिरझिरत्या आवरणाखाली वर्तमान कालच वावरू दिला आहे. त्यामुळे शुद्धीकरण, महात्मा गांधींचा सत्याबद्दलचा आग्रह इ. गोष्टींचा निर्देश त्यात अप्रत्यक्ष-पणे आल्याशिवाय राहिला नाही. ह्या नाटकातील सत्यवान हें पात्र, ठेंग्य इ. त्याची शिष्यमंडळी, ह्या सर्वांची विचारसरणी व वृत्ति ह्यावरून सावरकरांचा रोख कशावर आहे हें स्पष्ट दिसतें. नाट्यदृष्ट्या हीं पात्रें व प्रवेश आवश्यक आहेत असें मुळीच नाही. तथापि परमतखंडन व स्वमतमंडन हें नाटकाच्या मध्यस्थीने करावयाचें, ह्या उद्देशातूनच त्यांना नाटकात स्थान मिळालें आहे.

कीचकवध ह्या नाटकात नाट्याचार्य खाडिलकरांनी पौराणिक

कथा, स्वकालीन राजकारण व चिरंतन स्वरूपाचीं मूल्यें ह्या सर्वांचा कसा कलात्मक मेळ साधला आहे, ह्याचा परिचय असलेल्या प्रेक्षकाला सावरकरांच्या नाटकात हें साधलेलें नाही ह्याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही.

## उत्तरक्रिया

उत्तरक्रिया हें सावरकरांचें दुसरें नाटक. त्यांनी तें १९३२-३३ साली लिहिलें. ह्या नाटकाचे प्रयोग 'भारत भूषण' संगीत मंडळीने महाराष्ट्रभर केले. पानिपतच्या प्रलयानंतर मराठ्यांनी माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत घडवून आणलेल्या तेजस्वी पुनरुत्थानाचें मराठी मनाला थरारून सोडणारें कथानक सावरकरांनी ह्या ऐतिहासिक नाटकासाठी योजिलें आहे. सावरकरांची अत्यंत उत्कट देशभक्ति, पूर्व पिढ्यांबद्दलचा त्यांचा ज्वलंत अभिमान, ओजस्वी इतिहासापासून आत्मविस्मृत व पराभूत मनोवृत्तीचें उच्चाटन करून हिंदु जातीला थोर परंपरेचा गौरवशाली वारसा संभाळणारा समर्थ समाज बनविण्याचा त्यांचा ध्यास, ह्या सर्व सावरकरी विशेषांचा ठसा ह्या नाटकात उमटला आहे. पानिपतची लढाई मराठे हरले, पण युद्ध हरले नाहीत. कारण अहमदशहा अबदालीचें आक्रमण त्यांनी रोखलें. दिल्लीचें तख्त बळकावण्याचा त्याचा डाव त्यांनी हाणून पाडला. इंग्रजांसारख्या परक्या सत्तेचे डावपेच उधळून लावले. हा सर्व इतिहास सावरकरांनी तल्लीनतेने ह्या नाटकात उभा केला आहे.

पानिपतची उत्तरक्रिया माधवरावांनी केली हें नाटकाचें मुख्य सूत्र व कथानक. सावरकरांनी रावराजे यशवंतराव ह्या सरदाराच्या कर्तृत्वाच्या कथेची जोड ह्या मूळ कथानकाला दिली.

मूळ शिद्यांच्या पदरचा हा एक राऊत पानिपतच्या युद्धात घायाळ झाला. मराठ्यांच्या स्वारीतील अंतःपुरात राजस्त्रियांची परिचारिका म्हणून त्या युद्धात सहभागी झालेली त्याची तरुण पत्नीही आपल्या आईबरोबर ह्या युद्धात घायाळ झाली आहे. ह्या तरुण सरदारास गुलाम करून काबूलला नेण्यात येतें. तेथून तो एका फ्रेंच सरदाराला विकला जातो. नंतर फ्रेंच सैन्यात प्रवेश करून नांव लौकिक मिळवून अमेरिका, इंग्लंड, चीन, जपान इत्यादि देशांत फिरून पांडेचरीस परत येतो, व गुलामीतून मुक्त होऊन श्रीमंत पेशव्यांच्या पदरी देशाच्या सेवेसाठी दाखल होतो. सुनीति व सुजाता ह्या दोघी बहिणी त्याच्याशी विवाहित झाल्या आहेत. त्यांतील एक सुनीति, सादुल्ला मुसलमान सरदारने बाटवून जबरीने आपल्याजवळ ठेवलेली असते. ह्या दोन बहिणी व मराठ्यांच्या अपमानाचा सूड घेण्याचें वेड लागलेली त्यांची वेडी आई ह्यांनी व यशवंतरावाने बजावलेली कामगिरी व मराठ्यांचा पुन्हा बसविलेला दरारा ह्या रहस्यमय उपकथानकास रंजकतेच्या दृष्टीने सावरकरांनी महत्त्व दिलें आहे. वेषांतर, रहस्यमयता इत्यादि साधनांचा भरपूर उपयोग त्यांनी केला आहे. पेशव्यांचे सरदार, इंग्रजांचे वकील, नजिबखान इत्यादि रोहिल्यांचे सरदार ह्यांचीं वाग्युद्धें व डावपेच ह्यांनाही अर्थात् महत्त्व आहेच.

विविध रसांचा आविष्कार करण्याच्या हेतूने हास्यरसाच्या निर्मितीसाठी कोंडण्णा व धोंडण्णा ह्या भेकड भटजींची दुक्कल नाटकात मुक्तपणाने वावरते. वीररसाला उठाव देणारी प्रणयभावनाही ह्या नाटकात खेळविली आहे. रंजकतेच्या दृष्टीने आवश्यक ती साधनसामग्री वापरून सावरकरांनी मराठ्यांच्या गौरवशाली पराक्रमाचा पोवाडा ह्या नाटकात गायिला आहे. व

त्यापासून हिंदूंनी स्फुरण घ्यावें असें मनोगत व्यक्त केलें आहे. पानिपतच्या पराभवामुळे महाराष्ट्राच्या मनाला होणाऱ्या यातनांचें प्रतीक म्हणून वावरणारी ह्या नाटकातील वेडी सुडाचा जो उद्-घोष करते तोच ह्या नाटकाचा जणू संदेश! "त्राटिकेचा वध करणाऱ्या आणि शूर्पणखेचें नाक-कान कापणाऱ्या पुरुषोत्तम रामचंद्राचा दुर्जन भंजक हिंदुधर्म आम्ही पाळला पाहिजे. हा दुर्जन-रंजक हिंदुधर्म नव्हे" असें बजावणाऱ्या सुनीतीचे उद्गार ह्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. आपणांस जबरदस्तीने बाटवून निका लावू पाहणाऱ्या पोलादखानाच्या छातीवर पाय रोवून घायाळ स्थितीतही उभी राहिलेली ही सुनीता आपल्या पतीस म्हणते, "आत्महत्येच्या पालापाचोळ्याच्या चितेवर मी कधीच जळायची. तो सुबुद्धि सुचून आज मराठ्यांच्या हाडवैऱ्यांचें वैर उगवीत, धर्मसमरी अभिमुख आघातांनी घायाळ होऊन मी आपल्या चरणांपाशी नित्याची निजत आहे. याहून सुखकर मरण तें कोणतें? शत्रूच्या स्पर्शाने मलिन केलेला माझा देह शत्रूच्या रक्ताने मी धुतला आहे. या माझ्या हिंदुधर्माच्या पवित्र ध्वजाखाली हिंदु म्हणून मलाही देह ठेवण्याची अनुज्ञा करा."

सावरकरांना ह्या नाटकातून कोणता संदेश द्यावयाचा आहे, हें आता वेगळें सांगायला नकोच. "चितोडची चिता दुष्टाची निराशा करू शकते. पण त्याचें निर्दालन करू शकत नाही." ह्या सारखी तरवारीच्या पात्यासारखी चमकून जाणारीं, उत्कटतेने प्रभावी झालेली व वस्तुस्थितीची परिणामकारकपणे भेदक जाणीव करून देत संदेश देणारीं अनेक सूक्तिरूप वाक्यें ह्या नाटकातील प्रमुख पात्रांच्या तोंडी आहेत. अर्थात् ह्या सर्व पात्रांच्या रूपाने व मुखाने सावरकरच नाटकात वावरत आहेत व बोलत आहेत

हें उघड आहे. स्वाभाविकपणे विकसित होणाऱ्या स्वतंत्र व्यक्ति-रेखा, त्यांचे नैसर्गिक व सहज वाटणारे संवाद कथानकाचा प्रमाण-बद्ध सुसूत्र विकास व त्याचा अनुरूप परिणाम इत्यादि गोष्टी नाटककार सावरकरांच्या दृष्टीने महत्त्वाच्या नाहीत. कला-विकासासाठी कलाविलास ही त्यांची वृत्तिच नाही. म्हणून त्यांची प्रमुख पात्रें ह्या सावरकरांच्या प्रतिकृति होऊन त्यांची विचार-धारा रसरसत्या भाषेत मांडतात ह्यात नवल नाही. मराठे, इंग्रज व मुसलमान सरदार दरबारात सावरकरांनी दर्शविलेल्या पद्धतीने एकमेकांच्या वर्मांवर प्रहार करीत आत्मप्रौढि गातील हें कितपत स्वाभाविक आहे हा प्रश्न नाट्यतंत्र, स्वभावरेखाटन इत्यादि गोष्टींना महत्त्व देणाऱ्यांनी उपस्थित करावा. सावरकरांना महत्त्व आहे तें त्यांच्या ध्येयवादाचें, विचारसरणीचें.

"बादशहा हें नांव तेवढें शहाआलमचें. बादशाही तेवढी श्रीमं-तांची" अशी वाटणी झाल्याचें वृत्त फडणीस माधवराव पेशव्यांना कळवितात. त्यावर माधवरावांनी काढलेले पुढील उद्‌गार महत्त्वाचे आहेत. "बादशहा ह्यापुढे जरी मराठ्यांशी वैर करणार नाही; तरी न जाणो हिंदु मुसलमान हे दोघेही ज्यांत बंधु-बंधूप्रमाणे समानतेने नांदू शकतील, असें एखादें खरेंखुरें सामाईक हिंदी साम्राज्य अशा बनावातूनच आविर्भूत होऊ शकेल. हिंदूंच्या संम-तीने आणि आम सत्तेनेच बादशहा बनू शकतो. तो धर्माने मुसलमान असला काय किंवा नसला काय सारखाच. जर मुसलमान यापुढे तरी भारतमातेस माता, आणि हिंदूस बंधु मानतील तर आम्ही हिंदूही त्यास बंधु मानू. त्यास एकी हवी असेल, तर ती अशी होईल. नाहीतर बेकीसही आम्ही भीक घालीत नाही."

हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व ह्या आपल्या आवडत्या सिद्धान्ताची गुंफण, सावरकरांनी ह्या नाटकात केली आहे, हें खरें आहे. तथापि माधवरावांच्या तोंडचे वरील उद्गार हें त्यांच्या विचारसरणीमागील बैठक स्पष्ट करणारे व आजही न विसरता येण्यासारखे आहेत. हिंदुसमाजाला जखडून ठेवणाऱ्या शृंखला, समुद्रबंदी, शुद्धीबंदी, पोथीनिष्ठा इत्यादि संबंधी सावरकरांचा त्यांच्या निबंधातील विचार व हिंदुपद-पादशाही, ह्या ग्रंथातील त्यांचा इतिहासविचार व हिंदुत्वविचार ह्यांचें दर्शन आपणांस नाटकरूपाने 'उत्तरक्रियेत' होतें.

उःशापच्या मानाने ह्या नाटकात पात्रांची व प्रवेशांची गर्दी नाही. विस्कळीतपणाही कमी आहे. नाटयतंत्राच्या दृष्टीने ह्या नाटकाच्या बाबतीत काहीसें अवधान बाळगल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. केवळ काही प्रवेशांची मालिका, असें स्वरूप ह्या नाटकाला येणार नाही अशी दक्षता घेतल्याचें दिसतें. पांच अंकांऐवजी हें नाटक चार अंकीच आहे हेंही लक्षात घेण्यासारखें आहे. एकाच विषयाची उदात्त व क्षुद्र बाजू दाखविण्यासाठी हास्यरसाचा अवलंब करण्याचेंही खाडिलकरी तंत्र ह्या नाटकात आढळतें. अर्थात् विनोदाचा दर्जाही खाडिलकरी वळणाचाच आहे.

## संन्यस्त खड्ग

संन्यस्त खड्ग हें सावरकरांचें १९३१ मधील नाटक आहे. सावरकरांच्या तीनही नाटकांत नाटयगुणांनी संपन्न असें हेंच नाटक होय. प्रचार व कलात्मकता ह्यांचा मेळ ह्या नाटकात यशस्वी झाला आहे. रंगभूमीवर बराच काळ गाजलेलें व अजूनही संस्मर-

णीय असलेलें हें नाटक सावरकरांच्या नाट्यनिर्मितिक्षमतेची खऱ्या अर्थाने साक्ष देते.

हिंसा व अहिंसा ह्यातील तात्त्विक संघर्ष, हा ह्या नाटकाचा केंद्रबिंदु आहे. भगवान् बुद्धाच्या अहिंसा तत्त्वज्ञानाची चिकित्सा करणाऱ्या ह्या नाटकात सावरकरांच्या प्रतिभेचा, त्यांच्या कल्पकतेचा, विचारसंपन्नतेचा व भाषाप्रभुत्वाचा रमणीय आविष्कार झालेला आहे. महात्मा गांधींच्या अहिंसा तत्त्वाला, तत्कालीन राजकारणात मिळालेल्या प्रतिष्ठेची प्रतिक्रिया ह्या नाटकातील तात्त्विक ऊहापोहात व्यक्त होणें अपरिहार्य असलें, तरी उःशाप ह्या नाटकाप्रमाणे वर्तमानाचें उघड व ढोबळ स्वरूपाचें चित्र ह्या नाटकात काढलेलें नाही. वाच्यार्थापेक्षा व्यंजनेचाच आश्रय सावरकरांनी ह्या नाटकात घेतलेला आहे. त्यामुळे ह्या नाटकातील हिंसा, अहिंसा ह्या द्वंद्वाच्या चर्चेला केवळ तत्कालीन परिस्थितीचा मर्यादित आणि नैमित्तिक परिवेष लाभलेला नाही. ह्या प्रश्नाला मानवी जीवनाच्या व्यापक संदर्भात, वरच्या पातळीवरची व तत्त्वजिज्ञासेची उदात्त बैठक लाभली आहे. ह्या नाटकाचें आवाहन केवळ एका विशिष्ट परिस्थितीला वा काळाला अनुलक्षून नाही. एक प्रकारे मानवी समाजाच्या शाश्वत स्वरूपाशी निगडित अशा प्रभावी प्रश्नाचें दर्शन सावरकरांनी बुद्धाच्या अहिंसा तत्त्वावर आधारलेल्या एका कथानकाच्या रूपाने घडविलें आहे.

हें नाटक तीन अंकी आहे. रचनेच्या दृष्टीने त्यांत बराच बांधेसूदपणा व रेखीवपणा आहे. विनोदासाठी त्यांनी शाकंभट, सुनासशेट, ताकंसिंह ह्या सारखीं पात्रें व त्यांचे प्रवेश ह्यांनी

बरीच जागा अडवली असली तरी गंभीर व विनोदी प्रवेश आलटून पालटून योजण्याच्या तत्कालीन नाटयलेखन पद्धतीचें तें अनुकरण आहे. हास्यरसाची प्रेक्षकांच्या दृष्टीने आवश्यकता लक्षात घेऊन सावरकरांनी ह्या पात्रांची हास्य निर्मितीसाठी योजना केली आहे. ह्यांतील विनोद हा बऱ्याच ठिकाणी बीभत्साकडे व ग्राम्यतेकडे झुकणारा असला तरी बुद्धाची स्त्रीविषयक व संसारविषयक मतांची एक प्रकारे काहीशी उपरोधिक टीकाही त्यात साधलेली आहे. नाटय विषयाशी विनोद संलग्न ठेवण्याची खटपट ह्या नाटकातही आहे. या दृष्टीने दुसऱ्या अंकातील तिसरा प्रवेश उल्लेखनीय आहे.

"हिंसात्मक यज्ञ वा देहदंडनात्मक तप हा निर्वाणाचा मार्ग नव्हे." हा विचार प्रस्थापित करून जगातून शस्त्रयुद्धाचा, हिंसेचा, यादवीचा व कलहाचा नायनाट करून आणि सर्वत्र शांतीचें धर्मराज्य स्थापन करावें यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा सिद्धार्थाचा निर्धार, शाक्य राष्ट्राचें राजपुत्रास व सेनानीसही बुद्धमताचे अनुयायी करण्याचा मानस व संसारासारखें दुःख नाही, हें मनुष्यमात्रास पटवून देण्याची तळमळ ह्यांवर ह्या नाटकातील कथानक उभें राहतें. पहिल्या अंकांतील सातव्या प्रवेशातील विक्रम व बुद्ध ह्यांच्या हिंसा-अहिंसाविषयक चर्चेतून एक विचारनाटय उभें राहतें. पंचवीस वर्षांनंतरच काय पण आजपासून पंचवीसशे वर्षांनंतरही या जगावर या जगाच्या दुर्दैवाने शस्त्रयुगाचेंच प्राबल्य दिसून येईल." बळी तोच कान पिळीत राहील. रक्तरंजित साम्राज्याचीच विजयश्री भूवर थैमान घालीत राहील आणि त्याच्या टापाखाली तेच अधिक आणि प्रथम चिरडले जातील की, जे या शांतियुगाच्या स्वप्नवाणीला भविष्यवाणी समजून तीवर विसंबून

सर्वांआधी शस्त्रसंन्यास करतील; दुसऱ्याच्या दयेवर अवलंबून राहण्याइतके दुबळे होऊन बसतील. अहिंसेच्या आमिषापायी हिंसेचा गळ घालतील" अशी निश्चिति असलेला आणि वाटेल त्याला संन्यासाश्रमात घेणाऱ्या आणि अशारीतींने लाखो लोकांस शस्त्र-संन्यासाच्या प्रतिज्ञेने हतवीर्य करून ठेवणाऱ्या ह्या भयंकर भुलीचे भीषण परिणाम पंचविसाव्या पिढीपर्यंत भारतास भोगावे लागतील ह्याची स्पष्ट जाणीव असलेला विक्रम केवळ भगवान् बुद्धाला, एका अलौकिक पुरुषाला ह्या पुण्यकार्यी साहाय्य मिळालें नाही म्हणून हा प्रयोग फसला असें पुढील पिढ्यांना वाटू नये ह्यासाठी तथागतांच्या इच्छेस अनुसरतो आणि भिक्षुसंघात समाविष्ट होतो. पहिल्या अंकातील हा सातवा प्रवेश सावरकरांची तर्कशुद्ध विचार-सरणी, ती पेलण्यास समर्थ अशी विषयानुरूप गंभीर, प्रौढ, डौलदार संस्कृतप्रचुर भाषा ह्याची साक्ष देतो. त्याचप्रमाणे त्यांच्या नाट्य-दृष्टीचेंही प्रत्यंतर देतो. विचारांच्या नाट्यमय संघर्षाचें मोठ्या परिणामकारकतेने सावरकरांनी ह्या प्रवेशात बीजारोपण केलें आहे.

प्रणयभावनेचा रमणीय आविष्कार हें संन्यस्त खड्ग नाटकाचें आणखी एक मनोहर वैशिष्ट्य आहे. सुलोचना व वल्लभ ह्यांच्या प्रेमभावनेला ध्येयवादाची जोड मिळाल्याने विशेष सौंदर्य प्राप्त झालें आहे. "शत जन्म शोधिताना । शत आर्ति व्यर्थ झाल्या। शतसूर्य मालिकांच्या दीपावलि विझाल्या" हें नितांत रमणीय काव्य ह्याच नाटकातलें!

दुसऱ्या अंकांतील दुसरा प्रवेश व पांचवा प्रवेश आणि तिसऱ्या अंकांतील सहावा प्रवेश हे ह्या नाटकातील यशस्वी प्रवेश आहेत. इंद्रियाचा नाश हा काही इंद्रियजय नाही. ह्या सर्व इंद्रि-

यांचे नैसर्गिक व्यापार सारखेच निर्दोष आहेत. समाजधारणेस ते आवश्यक आहेत. "लोककल्याणार्थ धारण केलेला खड्ग दुष्टास दंड देण्यास समर्थ आहे." यज्ञस्वरूपी जीवनयापनेत गृहस्थाश्रम हा पायास अडखळविणाऱ्या बेडचा न होता त्या यज्ञाची सांगता कर-णारें बलिदान होवो! असा संसार संन्यासाइतकाच पवित्र आहे—क्वचित् त्याहूनही श्रेयस्कर आहे. हा विक्रमाने आपल्या विवाहित झालेल्या पुत्रास वल्लभास दिलेला संदेश म्हणजे सावर-करांनी दिलेला समाजाला संदेश होय. वल्लभ व सुलोचना यांची अलौकिक हुतात्मता, व विक्रमाने संन्यस्त केलेल्या खड्गाचा पुन्हा स्वीकार हीं ह्या नाटकांतील ज्वलंत व थरारून सोडणारीं घटितें आहेत.

"दलित क्रोधाची प्रतिक्रियाच उन्मादाच्या हत्तीची धुरा असते. राष्ट्रीय किंवा जागतिक हिताहितापुढे व्यक्तीच्या सुखदुःखाचा प्रश्न गौण आहे. इंद्रियनाश म्हणजे इंद्रियजय नसून इंद्रियसुखें उपभोगीत असताही लोकहिताच्या साधनी व्यत्यय येताच त्या वैयक्तिक सुखांचा बळी देण्यास तत्काल सिद्ध होणें हाच खरा इंद्रियजय होय!"

"ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचें परित्राण व साधूंचा विनाश होतो, तो अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्मच आहे." "चोरास चोरी फसल्याचें दुःख होऊ नये म्हणून सावांना घराचीं दारें उघडीं टाकणें भाग पाडावयाचें काय?" "हिंसेचीं दंत-नखें शस्त्राने छाटून टाकणें तीच खरी अहिंसा." "अधिकांत अधिक सुष्ट प्राण्यांचे हितार्थ एका दुष्ट प्राण्यास दंडिणें हाच खरा धर्म." "दुष्ट शत्रूसही क्षमा करीत राहिले म्हणजे, ते आगळीक करणें सोडतील अशा वेडगळ आशेवर जें राष्ट्र अवलंबून राहतें तें राष्ट्र त्याच क्षमेला

ज्ञानभंग समजून अधिकच क्रुद्ध झालेल्या त्याच दुष्ट शत्रूकडून संधि सापडताच नायनाट करून टाकलें जातें." ह्यासारखी अनेक विचारगर्भ सुभाषितें सावरकरांच्या विद्युत्गर्भ भाषेने ह्या नाटकात नाट्यानुकूल रीतीने प्रकट केलीं आहेत. ह्याही नाटकांतील संवाद म्हणजे प्रदीर्घ भाषणेंच आहेत. परंतु यांतील विचारनाटयच इतकें प्रभावी वाटतें की, हीं प्रदीर्घ भाषणें सुसंगत व अनुरूप वाटावीत. भाषेची ओजस्विता व उत्कटता हीं सावरकर ह्या व्यक्तीचीं वैशिष्टयें न ठरता तीं नाटकातील प्रमुख पात्रांचीं स्वभाववैशिष्टयें वाटू लागतात. ओजस्वितेच्या प्रपाताच्या आवेगाने वाचक प्रेक्षक प्रभावित होतो.

सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला व नेतृत्वही केलें. अहिंसेच्या अतिरेकी आग्रहावर कडाडून टीका केली पण त्यांच्या निबंधात वा अन्य लेखनांत भ्रांत अहिंसेच्या पुरस्कर्त्यांवर त्यांनी ज्या पद्धतीने हल्ला चढविला आहे त्यापेक्षा कितीतरी वेगळ्या रीतीने त्यांनी संन्यस्त खड्ग ह्या नाटकात या प्रश्नाचा परामर्श घेतला आहे. गौतमबुद्धाच्या अहिंसेची व संन्यासमार्गाची कुठेही त्यांनी कुचेष्टा केली नाही. व्यक्तिगत टीकाही त्यांनी केलेली नाही. ह्या उलट बुद्धाच्या थोरवीचें अत्यंत उत्कटतेने त्यांनी वर्णन केलें आहे. विक्रम व बुद्ध यांचे संवाद व शेवटी धर्माचे उद्गार ह्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहेत. नाटयवस्तूला धक्का लागेल अशी वर्तमानकालीन घटनांची जाणीव त्यांनी नाटकात कुठेही रसापकर्षक स्वरूपात प्रकट होऊ दिलेली नाही. नाटकातील प्रमुख पात्रांना त्यांनी योग्य न्याय दिला आहे. आणि आपल्या प्रगल्भतेची, व कृतज्ञतेची व चिंतनशीलतेची साक्ष पटवून दिली आहे.

संन्यस्त खड्गातील विचारनाट्य हें सावरकरांनी फार कुशलतेंने व प्रभावी रीतीनें रंगविलें आहे.

सावरकरांचीं नाटकें हीं अशीं आहेत. त्यांत कलात्मक अलिप्तता नाही. नाट्य तंत्राच्या दृष्टीने त्यांत उणिवा आहेत. रचना, स्वभावचित्रण, संवाद, रचनाकौशल्य, नाटकांतील पात्रांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व न देता आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या दडपणाखालीच ठेवण्याची त्यांची पद्धति इत्यादि अनेक दोष नाटकांत दिसतील हें सर्व खरें, परंतु सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचें व त्याच धगधगत्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य अंग असलेल्या त्यांच्या साहित्याचें सामर्थ्य व सौंदर्य त्यांच्या नाटकातही दिसल्यावाचून राहत नाही.

सावरकरांचें वाङमय हें त्यांच्या जीवनयज्ञातील हविर्दान आहे. त्यांच्या लोकविलक्षण ज्वलंत व्यक्तित्वाचा व प्रखर हिंदुराष्ट्रनिष्ठेचा व बुद्धिनिष्ठेचा अपरिहार्य आविष्कार आहे, ह्याची साक्ष त्यांचीं नाटकेंही देतातच !

दा. क्र. १०७४५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्वकम
अनुक्रम........
नोंद ........
REFBK-0017745
REFBK-0017745